# स्मरणिका २०२२

# महाराष्ट्र फाउंडेशन
## अमेरिका
## पुरस्कार २०२१

Invest in future
of
those with no future...
so
they can
REINVEST

। साहित्य पुरस्कार ।    । समाजकार्य पुरस्कार ।

**महाराष्ट्र फाउंडेशन** (अमेरिका)
यांच्यासाठी
**महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम)**, पुणे
व **साधना ट्रस्ट** (पुणे)
यांनी
साहित्य आणि समाजकार्य
पुरस्कारांच्या (२०२१) निमित्ताने
या स्मरणिकेचे प्रकाशन मे २०२२ मध्ये केले आहे.
*(फक्त खासगी वितरणासाठी)*

□

संपादक
**मुकुंद टाकसाळे**
mukund.taksale@gmail.com / 9850817210

अंकनिर्मिती
**प्रदीप चंपानेरकर**

मुखपृष्ठ
**राजू देशपांडे**

अक्षरजुळणी
**मुग्धा दांडेकर,** श्रीडी ग्राफिक्स, पुणे

मुद्रितशोधन
**विजय जोशी**

मुद्रक
**रोहन प्रकाशन,** ४३० शनिवार पेठ, पुणे ४११०३०.

# पुरस्कारांचे मानकरी आणि स्वरूप

| साहित्य पुरस्कार | पुरस्काराचे स्वरूप |
| --- | --- |
| दिलीप वि. चित्रे स्मृती साहित्य जीवनगौरव पुरस्कार<br>**न्यायमूर्ती नरेन्द्र चपळगावकर** | दोन लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| विशेष पुरस्कार (डिजिटल पत्रकारिता)<br>**राम जगताप** 'अक्षरनामा' (वेबपोर्टल)मधील संपादकीय कर्तृत्वाबद्दल विशेष पुरस्कार | एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| वाङ्मय प्रकार पुरस्कार (पर्यावरण)<br>**संतोष शिंत्रे** | एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| ग्रंथ पुरस्कार (ललित)<br>**रमेश अंधारे** ('दगडीमक्ता' कादंबरी) | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |
| ग्रंथ पुरस्कार (अपारंपरिक)<br>**सिसिलिया कार्व्हालो** ('टिपंवणी' आत्मकथन) | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |
| रा. शं. दातार नाट्य पुरस्कार<br>**मुक्ता बाम** ('विपाशा', 'टिळा', 'ऑस्कर', 'रंग' या चार एकांकिकांच्या संहितेसाठी) | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |

| समाजकार्य पुरस्कार | पुरस्काराचे स्वरूप |
| --- | --- |
| समाजकार्य जीवनगौरव सन्मान<br>**प्रेमाताई पुरव** | दोन लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार<br>**अंशुल छत्रपती** | एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| कार्यकर्ता पुरस्कार (प्रबोधन)<br>**सुरेश सावंत** | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |
| कार्यकर्ता पुरस्कार (संघर्ष)<br>**सुनीता भोसले** | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |
| युवा पुरस्कार<br>**युवराज गटकळ** | पंचवीस हजार रुपये व स्मृतिचिन्ह |

# अंतरंग


- संपादकीय / ५
- पुरस्कार-प्रवर्तकाचं मनोगत : सुनील देशमुख / ८
- महाराष्ट्र फाउंडेशनच्या अध्यक्षांचं मनोगत : राजीव भालेराव / १०
- 'मासूमीयत' : डॉ. मनीषा गुप्ते, डॉ. रमेश अवस्थी / १३
- आदरांजली... □ प्रकाश विश्वासराव : जयप्रकाश सावंत / १७
  □ सतीश काळसेकर : जयप्रकाश सावंत / २५
- पुरस्कारप्राप्त मान्यवरांविषयी
  - □ सामाजिक बांधिलकी मानणारे न्यायमूर्ती : नरेंद्र चपळगावकर : डॉ. सुधीर रसाळ / २९
  - □ सामाजिक कार्याचा झरा : प्रेमाताई पुरव : रवींद्र ठिपसे / ४०
  - □ पिच्चर अभी बाकी है दोस! : संतोष शिंत्रे : सलील वाघ / ४५
  - □ अंशुल छत्रपतींना पुरोगामी महाराष्ट्राचा मानाचा मुजरा! : राहुल थोरात / ५३
  - □ शेतमजूर ते डिजिटल संपादक : राम जगताप : सोनाली नवांगुळ / ६३
  - □ वंचित समाजाच्या न्याय्य हक्कासाठी झटणारे : सुरेश सावंत : अश्विनी रानडे / ७१
  - □ गुंतुनि गुंत्यात साऱ्या... : सिसिलिया कार्व्हालो : ऊर्मिला पवार / ७८
  - □ व्यवस्थेला जाब विचारणारी रणरागिणी : सुनीता भोसले : राहुल खांडेकर / ८५
  - □ आत्मनिष्ठा कायम राखणारा जनाभिमुख लेखक : रमेश अंधारे : अक्षयकुमार काळे / ९३
  - □ व्यवस्थेला प्रश्न विचारणारी मुलगी : मुक्ता बाम : वंदना भागवत / १००
  - □ उद्याच्या चळवळीचा आश्वासक चेहरा : युवराज गटकळ : रमेश दाणे / १०८
- पुरस्कार सन्मानितांची व्हिडिओवरील भाषणे...
  - □ नरेंद्र चपळगावकर / ३६ □ संतोष शिंत्रे / ५० □ राम जगताप / ६८
  - □ सुरेश सावंत / ७६ □ सिसिलिया कार्व्हालो / ८२ □ सुनीता भोसले / ९०
  - □ रमेश अंधारे / ९६ □ मुक्ता बाम / १०६ □ युवराज गटकळ / १११
- निवड समिती / ११५
- महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) पुरस्कार सन्मानित व्यक्ती व संस्था / ११६
- पुरस्कार निवडीचे निकष / १२४
- 'महाराष्ट्र फाउंडेशन'विषयी / १२६

# संपादकीय



## निर्बुद्धीकरण हटाओ

स्मरणिकेचा हा अंक खरं तर आपल्या हाती जानेवारीतच पडायचा, पण कोरोनाच्या संकटाने याही वर्षी आमचं सारंच वेळापत्रक कोलमडून टाकलं. पुरस्कार जाहीर करण्यापासून ते ही स्मरणिका काढण्यापर्यंत सर्वच वेळा हुकत गेल्या. पुरस्कार सोहळाही झाला नाही. आमचा नाइलाजच होता. परंतु आता परिस्थिती बऱ्यापैकी निवळल्यासारखी वाटते आहे आणि पुढील वर्षी सारे कार्यक्रम नेहमीसारखे पार पडतील अशी आपण आशा करू शकतो.

या वर्षीचा दिलीप वि. चित्रे स्मृती साहित्य जीवनगौरव पुरस्कार औरंगाबाद येथे न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांना त्यांच्या घरी त्यांचे गुरू आणि ज्येष्ठ मित्र प्रा. सुधीर रसाळ यांच्या हस्ते एका घरगुती समारंभात देण्यात आला. हा छोटेखानी समारंभ अत्यंत हृद्य झाला. महाराष्ट्र फाउंडेशनच्या पुरस्कारांबद्दल दोघेही जण आपुलकीने बोलले. अलीकडच्या काळात महाराष्ट्रात पुरस्कार उदंड झालेले आहेत. त्यांचं जे राजकारण चालतं, त्यांपासून महाराष्ट्र फाउंडेशनचे पुरस्कार कसे मुक्त आहेत, हे दोघांनीही आवर्जून सांगितलं. त्यांच्यासारख्या अधिकारी व्यक्तींनी ही ग्वाही द्यावी, ही गोष्ट आम्हाला नक्कीच अभिमानास्पद आहे आणि त्याच बरोबर इथून पुढची आमची जबाबदारी वाढवणारीही आहे.

आमच्या महाराष्ट्र फाउंडेशनच्या संकेतस्थळाचं उद्‌घाटन दोन वर्षांपूर्वी प्रख्यात अभिनेते आणि चित्रपट निर्माते अमोल पालेकर यांच्या हस्ते झालं होतं. या संकेतस्थळावर ‘संवादिनी’ आणि ‘मंथन’चे जुने अंक, गेल्या २७ वर्षांत कुणाकुणाला महाराष्ट्र फाउंडेशनचे साहित्यिक आणि सामाजिक पुरस्कार प्रदान करण्यात आले याचा साद्यंत इतिहास, नंतरच्या काळातले ‘साधना’चे पुरस्कार विशेषांक आणि गेल्या दोन-तीन वर्षांतल्या ‘स्मरणिका’ आपल्याला पाहायला मिळतात. समारंभातील वक्त्यांच्या उपलब्ध ध्वनिचित्रफितींचा संपादित अंश, निवडक मुलाखती याही तिथे उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. या साऱ्या गोष्टी महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कारांच्या संकेतस्थळावर पाहायला मिळणं हे अपेक्षितच आहे.

पण अलीकडे ज्याला value addition म्हणतात, तसेही काही आम्ही या संकेतस्थळावर करू पाहतो आहोत. गेल्या शतकातले प्रखर बुद्धिवादी र.धों. कर्वे यांनी महाराष्ट्रात (खरं तर जगातच) लैंगिक शिक्षणाची सुरुवात केली. त्या काळातील त्यांचे या बाबतचे विचार हे ‘पुढारलेले’ मानल्या गेलेल्या ब्रिटिशांच्याही डोक्याला झिणझिण्या आणणारे होते. मग एतद्देशीय सनातन्यांनी किती गदारोळ उठवला असेल याची कल्पनाच केलेली बरी. हे

कार्य करण्यासाठी त्यांनी आपली प्राध्यापकाची नोकरी सोडून दिली. 'प्राध्यापकाच्या जागेवर त्यांना दुसरा माणूस मिळेल, परंतु या कार्यासाठी दुसरा माणूस मिळणं कठीण. तेव्हा मलाच या कार्यासाठी वाहून घेतलं पाहिजे' अशी त्यांची भूमिका होती. स्वत:च्या कार्याचं महत्त्व ओळखणाराच हा त्यांचा आत्मविश्वास आहे.

जुलै १९२७ मध्ये 'समाजस्वास्थ्या'चा पहिला अंक निघाला. या अंकात हे मासिक सुरू करण्यामागचा आपला उद्देश रघुनाथरावांनी सांगितला आहे. 'व्यक्तींच्या व समाजाच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची व त्यासंबंधी उपायांची चर्चा करणे हा या मासिकाचा उद्देश आहे. विशेषत: ज्या विषयासंबंधी लेख इतर पत्रकार छापत नाहीत असे विषय कितीही महत्त्वाचे असले तरी त्यासंबंधी माहिती मिळवण्यास सामान्य वाचकांस अतिशय अडचण पडते. ही अडचण दूर करण्याचा आमचा विचार आहे. यात तत्त्वज्ञानाचा खल न करता व्यवहारोपयोगी माहितीही दिली जाईल.' २६ वर्षे ४ महिने एवढे दीर्घकाळ हे मासिक चाललं आणि अखेर १९५३ साली त्यांच्या मृत्यूनंतर हे मासिक बंद पडलं.

डॉ. अनंत देशमुख यांनी संपादित केलेले र. धों.चं वाङ्मय 'पद्मगंधा प्रकाशना'तर्फे अरुण जाखडे यांनी प्रसिद्ध केलं. हा प्रयत्न नक्कीच स्तुत्य होता. परंतु कुठल्याही 'संपादकीय हस्तक्षेपाविना' 'समाजस्वास्थ्या'चे अंक वाचकांना आणि अभ्यासकांना उपलब्ध करून देण्याचं महाराष्ट्र फाउंडेशननं ठरवलं. पुरस्कार योजनेचे प्रवर्तक सुनील देशमुख यांचा अशा योजनांना भक्कम पाठिंबा असतो. आणि आता ३० मे २०२२ रोजी महाराष्ट्र फाउंडेशनच्याच संकेतस्थळाचा एक भाग असणारं (दुसरं एक) संकेतस्थळ आम्ही सर्वसामान्य वाचकांसाठी आणि अभ्यासकांसाठी खुलं करून देतो आहोत. 'सबकुछ र.धों.' असं या संकेतस्थळाचं स्वरूप असेल. या संकेतस्थळाचं उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांच्या हस्ते होणार आहे. र.धों.च्या बुद्धिवादाशी महाराष्ट्र फाउंडेशनचं नातं आहे, असं आम्ही मानतो. सध्याच्या महाराष्ट्रात किंवा एकूणच देशात निर्बुद्धीकरणाची जोरदार लाट आलेली आहे. अशा वेळी या संकेतस्थळांवरून व्यक्त होणारे रं.धों.चे सडेतोड विचार महाराष्ट्राला एक नवी दृष्टी देतील, असं आम्हाला वाटतं. हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यामागे 'निर्बुद्धीकरण हटाव' हाच आमचा प्रधान हेतू आहे.

सुरुवातीला आम्ही 'समाजस्वास्थ्य'चे सर्व अंक जसेच्या तसे, यथामूल स्वरूपात उपलब्ध करून देतो आहोत. खेरीज आम्ही विषयानुरूप सूचीही देतो आहोत. पुढे र.धों.चे इंग्रजी लेखनही मिळवून ते या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न राहील. त्यांच्या कार्याचं महत्त्व स्पष्ट करणारे काही अभ्यासपूर्ण लेखही नंतर आम्ही देऊच. पण आहे या स्वरूपातही हे संकेतस्थळ परिपूर्ण आहे आणि वाचकांना बरंच काही देणारं आहे.

र.धों.च्या कार्यातील त्यांच्या सहकारी शकुंतलाबाई परांजपे यांनी समाजस्वास्थ्याचे सारे अंक (त्या काळातील) पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयाला भेट दिलेले होते. हे अंक महाराष्ट्र फाउंडेशनच्या संकेतस्थळावर उपलब्ध व्हावेत, यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाचे अध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू प्रा. नितीन करमळकर यांची मोलाची मदत झाला आहे. जयकर ग्रंथालयाच्या प्रभारी संचालक अपर्णा राजेन्द्र यांनी सारे अंक स्कॅनिंगसाठी उपलब्ध करून दिले. एमकेसीएलच्या विकास चव्हाण यांनी स्कॅनिंगचं काम उत्साहात पार पाडलं. समाजस्वास्थ्यचे काही अंक डॉ. समीर कुलकर्णी यांनीही उपलब्ध करून दिले आहेत. संकेतस्थळाचं काम आम्ही एमकेसीएल (महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड) या संस्थेच्या मदतीनं सुरू केलं. एमकेसीएल संस्थेच्या स्थापनेपासून व्यवस्थापकीय संचालक राहिलेले आणि आता मुख्य सल्लागार असलेले डॉ. विवेक सावंत आणि एमकेसीएलचे मुख्य संचालक आणि अधिकारी उदय पंचपोर यांनी संकेतस्थळ आकाराला यावं म्हणून पुढाकार घेतला. परंतु कोरोनाने एमकेसीएलचा कर्मचारी वर्ग कमी झाला, कार्यालय बंद झालं त्यामुळे त्यांचाही नाइलाज झाला. आमचे मित्र सुश्रुत कुलकर्णी यांनी मग हे काम ‘निम्बल इ-सोल्यूशन’ संस्थेच्या नीता जोशी यांचं तांत्रिक साहाय्य घेऊन पूर्ण केलं. महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार योजनेचं संकेतस्थळ निम्बल इ-सोल्युशन या संस्थेनेच तयार केलेलं आहे. या सर्वांचेच मनःपूर्वक आभार.

स्मरणिकेची देखणी निर्मिती होण्यामागे ‘रोहन प्रकाशन’चे प्रदीप चंपानेरकर आणि त्यांचे सहकारी यांचा वाटा मोठा आहे. दर्जेदार मुखपृष्ठ नेहमीप्रमाणेच राजू देशपांडे यांचं आहे. पुरस्कारप्राप्त भाषणांचे व्हिडिओ करण्यासाठी ‘थिंक बँक’चे विनायक पाचलग आणि त्यांचे सहकारी ऋषीकेश यांची मोलाची मदत झालेली आहे. औरंगाबाद येथील छोटेखानी कार्यक्रमाचे व्हिडिओचे चित्रण, संपादन आणि छायाचित्रं यांची जबाबदारी दीपक हुलसुरकर यांनी व्यवस्थितपणे पार पाडली. या स्मरणिकेत पुरस्कार-सन्मानित व्यक्तींबद्दल ज्या ज्या लेखकांनी लिहिलं आहे त्यांचे मनःपूर्वक आभार.

स्मरणिकेबाबत आणि संकेतस्थळाबाबत आपल्या सूचनांचं सदैव स्वागतच आहे.

**मुकुंद टाकसाळे**

संपादक

९८५०८१७२१०

# पुरस्कार-प्रवर्तकाचं मनोगत



**विश्वबंधुत्वाचा नारा**

'Imagine All the People' या Beatles च्या गाण्याने विश्वबंधुत्वाचा नारा दिला होता. त्याला पन्नास वर्षे झाली. त्यापूर्वीच 'वसुधैव कुटुंबकम्' ही भारतीय संस्कृतीची शिकवण हजारो वर्षे होतीच. प्रत्यक्षात मात्र तंत्रज्ञान, दळणवळण, संवादसाधने आणि जागतिक अर्थव्यवस्था यांमुळे जग जवळ आले. पण लोकांची हृदये जवळ आली असे वाटत नाही. उलट या सर्व तंत्रज्ञानाचा उपयोग विषारी तत्त्वज्ञान, चिथावणीखोर खोट्या बातम्या आणि हेतुपूर्वक अपप्रचार करण्यातच झाला. परिणामी जगभर एकमेकांचा धर्म, जात, संस्कृती आणि इतिहास (खरा आणि खोटा) यावरून द्वेष आणि हिंसाचाराचा पुरस्कार करण्यातच झाला. जग एकत्र येऊन गुण्यागोविंदाने नांदण्याऐवजी युक्रेनसारख्या घटनाच जास्त घडत आहेत.

जग उदार लोकशाही मार्गाने जाईल असे वाटत असतानाच गेल्या २० वर्षांत एकाधिकारशाही व धंदा, राजकारण आणि माफिया यांचे विचित्र आणि विषारी रसायन करणारे तथाकथित उद्योजक (Autocrats and Oligrachs) यांची अभद्र युती जगभर फोफावत आहे. उदार मानवतावादी मूल्ये पायदळी तुडवून धर्म, हिंसा, दहशत आणि सरकारी यंत्रणांचा खुनशी वापर करणारे Autocrats बोकाळत आहेत.

एवढेच नव्हे, तर जग लोकशाही विरुद्ध एकाधिकारशाही असे दुभंगत आहे. सारे Autocrats तर भाई-भाईचा नारा देत आहेत. रशिया तर 'Autocrats of the World, Unite' असा प्रचार आणि आचार करत आहे. यात आणखी धोक्याची गोष्ट म्हणजे कित्येक चतुर Autocrats लोकशाहीचे कातडे पांघरून हुकूमशाहीच्या मार्गावर शिताफीने निघाले आहेत.

आश्चर्याची गोष्ट अशी की पूर्वी या सर्वांविरुद्ध उठणारा आणि प्रसंगी खडतर हालअपेष्टा सोसणारा सुशिक्षित मध्यमवर्गीय, बुद्धिजीवी वर्ग अत्यंत उत्साहाने या Autocrats व Oligrachs च्या घातक युतीचे समर्थन आणि पुरस्कार करताना दिसतो. हिटलरच्या काळात हेच घडले होते. मध्यमवर्गाचे हे Facism चे आकर्षण आणि धार्मिक वा जातीय द्वेष समाजाला मारक ठरतो आणि शेवटी त्यांच्याही मुळावर येतो, हे इतिहास सांगतो. Those who don't learn from history are doomed to repeat it हे प्रसिद्ध तत्त्व आहे, पण हे असे का होते आणि मुख्यत: सध्या भारतातील सुशिक्षित वर्ग असा प्रवाहपतित का झाला, हा गंभीर आणि चिंतनाचा मुद्दा आहे.

माझ्या मते, जेव्हा आदर्श क्षीण होतात, स्वातंत्र्य, समता, न्याय यांसारखी शाश्वत मूल्ये डळमळीत

होतात आणि धर्मांधतेच्या लाटेत वाहून जातील की काय अशी परिस्थिती येते तेव्हा नेहमीच मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारे समाजसेवक आणि लेखक पुढे येतात. ही प्रवाहाविरुद्ध पोहण्याची Uphill battle आपल्या विचार आणि आचाराच्या अहिंसक शस्त्रांनी ते हुकूमशहा, Autocrats, Oligarchs आणि धर्म व जातींच्या नावावर घोर सामाजिक अन्याय करणारे मूलतत्त्ववादी याचा सामना करतात. हे राजकारण्यांचे काम नाही. समाज परिवर्तनाची ही लढाई चढउतार, आशा-निराशा, हालअपेष्टा सहन करून निष्ठेने लढणाऱ्या, मानवी मूल्यांसाठी अविरत प्रयत्न करणाऱ्या, समाजसेवक व लेखकांचे विनम्रपणे ऋण मानण्यासाठीच आम्ही हे पुरस्कार ठेवले आहेत.

हे आदर्श समाजासमोर ठेवून नवीन तरुण त्यांच्याकडून स्फूर्ती घेतील आणि हा स्वातंत्र्य, समता, न्याय या मानवी मूल्यांची मशाल पुढे नेतील, ही यामागची भावना आहे.

पूर्वी कधी नव्हती, तेवढी या प्रगत मूल्यांची आणि त्यांच्यासाठी आयुष्य वेचणाऱ्या समाजसेवक व लेखकांची गरज आजमितीला आहे. 'रात्र असे वैऱ्याची' अशा काळात मानवी मूल्यांना धर्मांधता, जातीयता, एकाधिकारशाही, गुंडगिरी आणि सरकारी यंत्रणा यांनी घेरले असताना, तुमच्या कार्याचे महत्त्व आणि गरज सर्वांत जास्त आहे.

त्यात तुम्हाला हुरूप, नवा दम आणि निर्धार यावा यासाठी हे पुरस्कार हा आमचा खारीचा वाटा.

**सुनील देशमुख**
पुरस्कार-प्रवर्तक
sunild@aol.com/+1-203-952-8488

# महाराष्ट्र फाउंडेशनच्या अध्यक्षांचं मनोगत



सर्वप्रथम २०२१ च्या महाराष्ट्र फाउंडेशनच्या साहित्य आणि सामाजिक क्षेत्रांतील पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या साहित्यिकांचं आणि कार्यकर्त्यांचं मी मनापासून अभिनंदन करतो. उत्तरोत्तर कठीण होत चाललेल्या या काळात गेली २७ वर्षं पुरस्कार वितरणाचं कार्य एखाद्या व्रताप्रमाणे पुढे नेणाऱ्या सुनील देशमुख आणि त्यांच्या टीमचंही अभिनंदन करायला हवं.

महाराष्ट्र फाउंडेशन ही या पुरस्कार विभागाची मातृसंस्था आहे. या निमित्ताने आमच्या महाराष्ट्र फाउंडेशनच्या एकूण कार्याविषयी इथे सांगणं उचित ठरेल. महाराष्ट्र फाउंडेशनची पाच सूत्रं आहेत – शिक्षण, आरोग्य, महिला सबलीकरण, गरिबी निर्मूलन आणि पर्यावरणाचं संवर्धन. या पाच सूत्रांवर आधारित असा एक नवा गाव पातळीवरचा उपक्रम आम्ही हाती घेतलेला आहे. त्या प्रकल्पाचा मुख्य उद्देश गावांना सबल आणि सक्षम करणं हा आहे. पाच क्षेत्रांत एकात्मिक विकास घडवून आणण्याचं स्वप्न पाहणाऱ्या या प्रकल्पाचं नाव आहे ‘पंचम’. या उपक्रमांतर्गत आमची फाउंडेशन महाराष्ट्रातील गावांशी थेट संपर्क साधणार आहे आणि त्यांच्या समस्या समजून घेणार आहे आणि नंतर त्या आधारे त्या समस्यांचं निवारण करणारे प्रकल्प इतर स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्यानं कार्यान्वित करणार आहे.

या उपक्रमात महाराष्ट्र फाउंडेशन Resource and Support Center for Development (RSCD) या संस्थेचं सहकार्य घेणार आहे. RSCD प्रामुख्यानं ग्राम पंचायतीत महिला नेतृत्व घडवण्याचं काम करत आहे. त्यांच्या सहकार्यानं महाराष्ट्रातल्या दोन गावांची निवड करण्यात आली आहे – सातारा जिल्ह्यातील कसुंबी आणि गडचिरोली जिल्ह्यातील चार्मोशी तालुक्यातील मुटनूर हे आदिवासी गाव.

महाराष्ट्र फाउंडेशननं या गावांतील पंचायतींशी आणि लोक प्रतिनिधींशी ‘झूम’द्वारे संवाद साधला आणि त्यांच्या समस्या समजावून घेतल्या. आता त्या समस्या निवारण करणाऱ्या प्रकल्पांची बांधणी केली जात आहे.

ही सुरुवात आहे. भविष्यात या उपक्रमात अनेक गावं जोडली जाणार आहेत. गावांच्या सबलीकरणाच्या या प्रयोगात केवळ पैशांचीच नाही तर नवीन विचारांची, नवीन माहितीची आणि मुख्य म्हणजे नवीन कौशल्यांची गरज लागणार आहे. हे सर्व करत असताना नव्या दृष्टिकोनाची गरज लागणार हे नव्यानं सांगायला नकोच. सबलीकरणाची ही प्रक्रिया खरं तर गावांतील माणसंच पार पाडणार आहेत. महाराष्ट्र फाउंडेशन फक्त मदतीचा हातभार लावणार आहे.

एक चांगली गोष्ट आहे. आता बहुतेक ठिकाणी तोंडावर मास्क घालायचे निर्बंध मागे घेतलेले आहेत. त्यामुळे मोकळा श्वास घ्यायचा आनंद आपण नव्यानं अनुभवतो आहोत. पण हा आनंद लुटत असतानाच आपल्या पृथ्वीला आपण अशाच मास्कमध्ये कोंडतो आहोत. आपण निर्माण केलेल्या अति प्रदूषणामुळे कार्बन उत्सर्जनाचं प्रमाण अतोनात वाढलं आहे, वातावरणात एक कोंडी निर्माण झालेली आहे आणि त्यामुळे पृथ्वीवरचं तापमान अपेक्षेबाहेर वाढत चाललेलं आहे. त्याचाच परिणाम म्हणून हवामानामध्ये अनपेक्षित आणि हानिकारक बदल आपल्याला जाणवत आहेत. ही समस्या सर्वव्यापी आहे, जटील आहे. पृथ्वीचं भवितव्य धोक्यात आहे. जागतिक पातळीवर अनेक देशांचे नेते आपापल्या परीनं ही समस्या सोडवण्यासाठी उपाय शोधत आहेत. त्यांचे विविध पातळ्यांवर प्रयत्न चालू आहेत. पण विज्ञानाच्या आधारानं पर्यावरणाच्या समस्येला सामोरं जाऊन आपल्यात आणि वातावरणात काही सकारात्मक बदल करणं ही आपली सगळ्यांचीच जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर गेली पंचवीस वर्षं पर्यावरणावर अभ्यासपूर्ण लेखन करून समाजात जागृती निर्माण करण्याचं कार्य करणाऱ्या संतोष शिंत्रे यांचा महाराष्ट्र फाउंडेशननं २०२१चा साहित्य पुरस्कार देऊन सन्मान केला, याचा मला विशेष आनंद होतो आहे.

त्या दृष्टीने महाराष्ट्र फाउंडेशनने अमेरिकेचे माजी उपाध्यक्ष अल गोर यांच्या Climate Reality Project या संस्थेच्या सहकार्यानं 'रयत शिक्षण संस्थे'च्या शिक्षकांसाठी पर्यावरण जागरूकतेच्या अभ्यासवर्गांचं आयोजन करायचं ठरवलं आहे. आणि 'रयत'चे २०० परिसर हिरवेगार करून सोडायचे असं उद्दिष्ट्य डोळ्यांसमोर ठेवलेलं आहे.

शिक्षकांमध्ये पर्यावरणाबद्दल जागृती केली की आपोआपच शिक्षकांद्वारे ती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचेल आणि 'ज्योत से ज्योत जलाते चलो' या न्यायानं ही जागृती सर्वदूर पसरेल. त्यातूनच पर्यावरण समस्या-निवारण्याचे मार्ग सापडतील, असा महाराष्ट्र फाउंडेशनचा विश्वास आहे.

'रयत'च्या महाराष्ट्राभर पाचशेच्या आसपास शाळा आहेत. या शाळांचे परिसर Green Campus मध्ये बदलले गेले की महाराष्ट्रापुढं तो एक नवा आदर्श ठेवल्यासारखं होईल. शेवटी या पृथ्वीची 'वसुंधरा' करणं आपल्याच हाती आहे.

या दोन अभिनव प्रकल्पांमुळे महाराष्ट्र फाउंडेशन 'सर्वांसाठी सामाजिक आणि आर्थिक न्याय' ('Social and Economic Justice for all') या आपल्या ध्येयाकडं नव्या उत्साहानं, नव्या उमेदीनं वाटचाल करणार आहे.

२०२२ च्या ऑगस्टमध्ये 'बृहन महाराष्ट्र मंडळा'चं (बीएमएमचं) तीन दिवसांचं अधिवेशन ॲटलँटिक सिटी न्युजर्सी येथे साजरं होणार आहे. या अधिवेशनाला साधारणतः ५००० लोक उपस्थित राहतील असा अंदाज आहे. हे अधिवेशन पर्यावरण-स्नेही व्हावं म्हणून महाराष्ट्र फाउंडेशन बृहन महाराष्ट्र मंडळाशी सहकार्य करणार आहे. तेथील भोजन व्यवस्थेत आणि सजावटीत

प्लॅस्टिकचा कमीत कमी वापर करणं आणि वृक्षारोपण करणं याला प्राधान्य देण्यात येणार आहे. ही जाणीव-जागृती करणारे फलक सर्वत्र लावले जातील.

२०२२ सालासाठी महाराष्ट्र फाउंडेशननं चार सामाजिक संस्थांच्या प्रकल्पांची निवड केली आहे. लीला पूनावाला फाउंडेशन, मैना फाउंडेशन, जनविकास प्रतिष्ठान आणि लाइट ऑफ लाइट ट्रस्ट (Light of Light Trust.) या प्रकल्पांमुळे दहावी पास झालेल्या पंचवीस विद्यार्थिनींना नर्सिंगचं मोफत शिक्षण मिळणार आहे. त्यामुळे मागासलेल्या भागात 'फिरते वैद्यकीय पथक' (Mobile Medical Unit) चालवण्यास मदत होणार आहे. आर्थिकदृष्ट्या मागास आणि कोविड-पीडित कुटंबातील मुलांच्या शिक्षणाची सोय होणार आहे. याच प्रकल्पाच्या अंतर्गत ग्रामीण महिलांसाठी 'स्तनांच्या कर्करोगा'ची मोफत चाचणी होणार आहे.

१९७८ पासून अमेरिकेतल्या मराठी माणसांची सामाजिक जाणीव जपणारी महाराष्ट्र फाउंडेशन ही संस्था सतत नव्या विचारांच्या आणि नव्या प्रेरणांच्या शोधात राहिली आहे. आणि म्हणूनच पीडितांच्या सामाजिक आणि आर्थिक हक्कांसाठी नव्या उमेदीनं सतत नवनवे मार्ग शोधत राहणार आहे.

**राजीव भालेराव**
अध्यक्ष, महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका)
president@maharashtrafoundation.org/rajivpost@gmail.com/7324047408

## ‘मासूमीयत’





कोरोना काळातील ‘मासूमीयत’ जिंदाबाद आणि सबरंगी सलाम!

२०२२ साल उजाडले तरीसुद्धा कोरोनाचे सावट काही दूर होताना दिसत नाही. त्यामुळे या वर्षी सुद्धा प्रत्यक्ष कार्यक्रम घेता येणे शक्य नाही, याचा खेद आपणां सर्वांप्रमाणेच आम्हालाही होत आहे. गेल्या दोन वर्षांहून अधिक काळ कोरोनाने जगभर घातलेल्या थैमानामुळे आपण सर्वजण बेजार झालो आहोत. जसे अमेरिकेहून महाराष्ट्र फाउंडेशनचे सदस्य भारतात येऊ शकले नाहीत तसेच ज्यांची मुले-नातवंडे इतर राज्यांत किंवा परदेशी आहेत त्यांना भेटणे अनेकांना अशक्य झाले. कोणालाही प्रत्यक्ष न भेटता येणे आणि सतत वाटणारी चिंता, अनिश्चितता आपण सर्वांनीच अनुभवली आहे. कोरोनाच्या पहिल्या दोन लाटांमध्ये आपल्या ओळखीतले, नात्यातले अनेक जण आजारी पडले, काही दगावले. पण इतक्या दुःखाच्या प्रसंगीसुद्धा कुणाला भेटणे शक्य नव्हते. एकमेकांच्या दुःखात सहभागी होता न येणे याची रुखरुख आणि भावनिक पातळीवरील पोकळी आपण सर्व जण अजून अनुभवत आहोत.

‘नाही रे’ वर्गातले जे आहेत, ज्यांच्याकडे मुळातच पर्याप्त संसाधने नाहीत, त्यांचे या कोरोनाकाळात झालेले हाल शब्दांत वर्णन करणे कठीण. आमची ‘मासूम’ ही संस्था पुणे जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुरंदर तालुक्यात गेली पस्तीस वर्षे कार्यरत आहे. गावाकडून शहराकडे होणारे स्थलांतर आम्ही कायमच पाहत आलेलो आहोतच; परंतु इतक्या मोठ्या प्रमाणात आणि इतक्या दयनीय परिस्थितीमध्ये शहराकडून गावाकडे होणारे स्थलांतर मात्र कोरोनाच्या काळातच दिसून आले. रोजगार किंवा पगार बंद झाल्यानंतर जितके दिवस आठवडे शहरांमध्ये राहणे शक्य होते तेवढी धडपड करून थकल्यानंतर शहरात कामासाठी गेलेले लोक गावी परतू लागले. बस, आगगाडी, ट्रक, टेम्पो अशा मिळेल त्या वाहनाने, कधी तर बांधकामाच्या सिमेंट मिसळण्याच्या टँकरमधून प्रवास करण्याची करुण वेळ या श्रमजीवी वर्गावर आली. गावी तरी त्यांच्यासाठी असे काय ताट वाढून ठेवलेले होते? तिथेही अन्नधान्य, पिण्यासाठीचे पाणी किंवा रोजगार कुठे उपलब्ध होते? लहान घरात झालेली गर्दी, स्त्रियांवर वाढलेला कामाचा बोजा, मुलांचे अर्धवट राहिलेले शिक्षण आणि पैशाची चणचण बेजार करून टाकणारी होती. आधीच जिथे शिक्षणाचा दर्जा खालावलेला आहे तिथे दोन वर्षे अभ्यासात खंड पडला. घरात मोबाईल फोन नसल्याने ज्यांचे ऑनलाईन शिक्षण बंद पडले त्या सर्व मुला-मुलींना आयुष्यभर पुढे शिक्षण आणि नोकरीपासून वंचित राहावे लागणार आहे. आर्थिक परिस्थितीने कंबरडे मोडलेल्या या गावाकडल्या लोकांना आता

जातिभेदावर आणि लिंगभेदावर आधारित विषमतेशी सामना करावा लागणार आहे. हा लढा पुढील काळामध्ये अनेक पटींनी तीव्र होताना आपल्याला दिसून येणार आहे.

या काळात कौटुंबिक हिंसा सहन करणाऱ्या महिलांपर्यंत पोहोचणे फारच कठीण होऊन गेले होते. मुलींचे शिक्षण बंद झाल्यानंतर तातडीने त्यांची लग्न करून टाकली जात होती. वयस्क व्यक्तींचे हाल बघवत नव्हते. सर्वांत जास्त झळ पोहोचली ती स्थलांतरित मजुरांना. एकीकडे रोजगार बंद होणे, दुसरीकडे आपल्या जिल्ह्यात परत जाण्याची मुभा नसणे यामुळे त्यांची फारच फरपट झाली. कोविडकाळात वैद्यकीय सुविधा न मिळालेले आणि मृत्युमुखी पडलेले अनेक जण होते. त्यांच्या नातेवाइकांना काही प्रमाणात मदत मिळवून देणाऱ्या शासनाच्या ज्या योजना होत्या, त्या त्यांच्यापासून दूरच राहिल्या. परक्या जिल्ह्यात  किंवा राज्यात आवश्यक ती सरकारी कागदपत्रे ते आणणार कुठून? सरकारी अर्थसाहाय्यापर्यंत - कोविड रिलीफपर्यंत पोहचण्याची ताकदच नसल्याने त्यांची त्रिशंकूसारखी टांगती अवस्था निर्माण झाली. केवळ जगण्यासाठी म्हणून दहा टक्के मासिक व्याजाने (दर साल दर शेकडा १२० ते १५० टक्के) कर्ज घेऊन गुजारा करण्याची वेळ बहुतांश गरिबांवर आली. लॉक डाउनमुळे विस्कळित झालेल्या कुटुंबातील बाईवर, नवऱ्याच्या अनुपस्थितीत मुलांचे संगोपन करणाऱ्या बाईवर संशय घेणे हा तर नेहमीचाच प्रकार. लॉक डाउनमध्ये कमीत कमी खर्चात लग्न करता येते हे लक्षात आल्यावर अल्पवयीन मुलींचे लग्न उरकून टाकणे हे दुसरे भयाण वास्तव.

अर्थात अशी सामाजिक आव्हाने पेलण्यासाठी तर 'मासूम'सारख्या संस्था आहेत. लोकांपर्यंत अन्नधान्य आणि इतर गरजेच्या वस्तू पोहोचवणे, सरकारी योजना वंचित घटकांपर्यंत पोहोचतील असे पाहणे, मनाविरुद्ध ठरवलेल्या आणि घाईघाईने पार पाडत असलेल्या लग्नांमध्ये जमेल तितका हस्तक्षेप करणे, प्रसंगी मुलींना सुरक्षित ठिकाणी नेऊन ठेवणे आणि जमेल तसे फोनद्वारे कौटुंबिक हिंसाचारग्रस्त व्यक्तींपर्यंत पोहोचणे ही सर्व कामे 'मासूम'चे सहकारी तत्परतेने करत होते. अति गरीब, दलित तसेच एकल महिलांच्या मुलांचे शिक्षण बंद पडू नये यासाठी मुलांना अभ्यासासाठी आवश्यक असलेली सामग्री पोचवण्याचा प्रयत्न आमच्या संस्थेने विशेष शिष्यवृत्तीच्या रूपाने केला.

गेल्या सात-आठ महिन्यांपासून आझीम प्रेमजी फाउंडेशनच्या साहाय्याने भोर तालुक्यातील खेडोपाडी आणि महाराष्ट्र फाउंडेशनच्या साहाय्याने पुरंदर तालुक्यामध्ये लसीकरण पोचवण्याचा उपक्रम 'मासूम'ने हाती घेतला आहे. वयस्क आणि अपंग व्यक्ती तसेच वंचित घटकातील समूह यांच्यापर्यंत सरकारी लसीकरणाची सेवा पोहोचणे हे 'मासूम'चे उद्दिष्ट्य आहे. एकूण दहा प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आणि दोन ग्रामीण रुग्णालयांमध्ये लसीकरणासाठी आवश्यक असलेले सर्व साहित्य, मनुष्यबळ आणि वाहतूक व्यवस्था 'मासूम'ने पुरवली. दोन ते अडीच लाख लोकांपर्यंत पोहोचून त्यांच्यात लसीकरणाबाबतची जागृती केली, आरोग्य संवाद साधला. वेळीच शंकांचे निरसन केल्यामुळे, आणि लसीकरणापर्यंत सर्वांची समान पोहोच आणि संधी निर्माण केल्यामुळे पुरंदर आणि भोर या दोन्ही तालुक्यांमध्ये कोविड विरोधातील प्रतिकार शक्ती बऱ्याच प्रमाणात वाढलेली आहे. या

महत्त्वाच्या उपक्रमांमध्ये ‘महाराष्ट्र फाउंडेशन, अमेरिका’चे साहाय्य उल्लेखनीय असेच राहिले आहे. फाउंडेशनतर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कार प्रक्रियेचे भारताच्या पातळीवर नियोजन करत असताना आमच्या ग्रामीण भागात सुद्धा महाराष्ट्र फाउंडेशनचा या पद्धतीने सहयोग असणे हे ‘मासूम’साठी उत्साहवर्धक राहिलेले आहे.

महाराष्ट्र फाउंडेशनमार्फत दिल्या जाणाऱ्या सर्व पुरस्कारांसाठी सुयोग्य व्यक्तींची निवड अतिशय निरपेक्ष पद्धतीने होत असते हे अधोरेखित करणे गरजेचे वाटते. ही प्रक्रिया दर वर्षी नव्याने सात-आठ महिने काम करून पार पाडली जाते. राज्यभरातील जाणकार व्यक्तींना समाविष्ट करून साहित्य आणि समाजकार्य पुरस्कारांसाठी दोन स्वतंत्र समित्या गठीत केल्या जातात. वर्षभरात किमान दोन-तीन वेळा प्रत्येक समिती भेटते. संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या शिफारशी तपासल्या जातात. अर्थात स्वतःची शिफारस कोणी करू शकत नाही, तसेच कोणाच्याही वशिल्याची गरज नसते हेही सांगणे तितकेच आवश्यक आहे. शिफारशीमधून पुढे आलेल्या प्रत्येक नावाचा सन्मानपूर्वक विचार केला जातो. स्वतःच्या लिखाणातून किंवा सामाजिक कार्यातून पुरोगामी समाजपरिवर्तन घडवून आणणाऱ्या व्यक्तींची नावे निवडली जातात. प्रत्येक पुरस्कारासाठी तीन नावे नक्की करून, त्यांच्यावर टिपण्या तयार करून अमेरिकेतील निवड समित्यांकडे ही माहिती पाठवली जाते. पुरस्कारासाठी अंतिम निवड अमेरिकेत होते. त्यानंतर पुण्यामध्ये पत्रकार परिषद घेऊन नावे जाहीर केली जातात. आधीच्या वर्षाचे काम संपले की लागलीच पुढील वर्षाचे काम सुरू, असे हे आनंददायी ऋतुचक्र कायम सुरू असते.

मासूम संस्था, ज्येष्ठ साहित्यिक मुकुंद टाकसाळे आणि साधना ट्रस्ट यांच्या वतीने हे काम वर्षभर चालते. दर वर्षी स्मरणिका प्रकाशित करून सर्व पुरस्कार सन्मानित व्यक्तींच्याबद्दल माहिती राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचवली जाते. महाराष्ट्रात किती मोलाचे समाजकार्य आणि लेखन होत असते हे या निमित्ताने सर्वांपर्यंत पोहोचते. अतिशय बिकट वर्तमानात आपण जगत असताना हे आशेचे किरण आपल्याला नक्कीच स्फूर्तिदायक ठरतात. १९९४ पासून साहित्य पुरस्कार आणि १९९६ पासून समाज कार्य क्षेत्रातील पुरस्कार देण्याची समृद्ध परंपरा आमच्याकडे महाराष्ट्र फाउंडेशनने गेल्या तीन वर्षांपासून सोपविली याचा आम्हाला मनापासून आनंद झालेला आहे.

पुढील वर्षी कोरोनाचे संकट संपुष्टात आले असेल, आणि अमेरिकेतील महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कारांचे प्रवर्तक, संस्थेचे पदाधिकारी आणि सदस्य, तसेच अमेरिकेतील निवड समितीतील सदस्य भारतात येऊ शकतील अशी आपण आशा करू या. प्रत्यक्ष भेटण्यासारखे दुसरे सुख नाही हे कोरोनाच्या निमित्ताने का होईना पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

या पुरस्काराची निवडप्रक्रिया गेल्या दोन वर्षांपासून ‘मासूम’कडे आली असली तरीही अनेक व्यक्तींचा हातभार मोलाचा असतो. मुकुंद टाकसाळे यांचे असंख्य पातळ्यांवर मिळालेले सहकार्य आणि उत्साही योगदान शब्दांत सांगता येणे कठीण आहे. ‘स्मरणिके’चे ते संपादकही आहेत. ‘साधना’चे संपादक विनोद शिरसाठ यांचे अनुभवी मार्गदर्शन आम्हाला प्रत्येक टप्प्यात लाभत असते. रवींद्र

ठिपसे आणि मासूमचे इतर कार्यकर्ते पडद्यामागे राहून सतत अनेक छोट्या मोठ्या गोष्टींत सहभागी असतात. दोन ग्रंथ-पुरस्कार (ललित आणि वैचारिक / अपारंपरिक) निवडणारी भारतातील समिती, रा.शं. दातार पुरस्कारासाठीची निवड समिती आणि सामाजिक कार्याची (संघर्ष आणि प्रबोधन) पुरस्कार निवड समिती आणि अमेरिकेतील निवड समिती यांची नावे अंकात दिलेली आहेतच. त्यांच्या निवडीवर तर हा सारा डोलारा उभा राहतो. सर्व निवड समित्यांतील सर्व सदस्यांचे मन:पूर्वक आभार.

**डॉ. मनीषा गुप्ते** व **डॉ. रमेश अवस्थी**
संस्थापक आणि सहसमन्वयक
महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (MASUM – मासूम)
masumpune.mfa@gmail.com

**महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (MASUM - मासूम)**
४२ - बी१, कुबेरा विहार, गाडीतळ, हडपसर, पुणे ४११ ०२८
दूरध्वनी : ०२०-२६९९५६२५/२६९९५६३३

# कलावंत व व्यवस्थापक यांचा सुरेख समन्वय : प्रकाश विश्वासराव

**जयप्रकाश सावंत**



*(१९ मार्च १९५० - ४ नोव्हेंबर २०२१)*

सन १९८७ ते २०१५ अशी २८ वर्षं ‘लोकवाङ्मय गृह’ या प्रकाशन संस्थेची धुरा वाहणारे आणि मुद्रण व प्रकाशन क्षेत्रांतील एक तज्ज्ञ म्हणून गणले जाणारे प्रकाश विश्वासराव हे एक पूर्णपणे स्वयंशिक्षित व स्वबळावर उभं राहिलेलं असं व्यक्तिमत्त्व होतं. राजापूरमधल्या एका लहान गावात जन्मलेले विश्वासराव पाच वर्षांचे असतानाच त्यांच्या आईचं निधन झालं होतं. त्यांचे वडील लष्करात होते. तिथून निवृत्त झाल्यानंतर ते दहा वर्षांच्या प्रकाश विश्वासरावांना घेऊन मुंबईला आले. मुंबईतील एका टेक्निकल स्कूलमधून अकरावी केल्यानंतर विश्वासरावांनी गिरगावातल्या एका क्लासमध्ये चित्रकलेचं थोडंफार शिक्षण घेतलं. त्यानंतर केवळ हातातली चित्रकला, साहित्याची उपजत जाण आणि आत्मविश्वास या बळावर त्यांनी जी मजल मारली ती स्तिमित करणारी आहे. १९६०च्या दशकातल्या कनिष्ठ मध्यमवर्गातली बहुतेक मुलं अकरावीची शालान्त परीक्षा पास झाल्या-झाल्या, पुढे न शिकता, कुठेतरी बारीकशी नोकरी मिळवून कुटुंबाचा आर्थिक भार हलका करण्याच्या धडपडीत असत. विश्वासराव अशाच तऱ्हेने काही छोट्या-मोठ्या नोकऱ्या करत हळूहळू मासिकांतून चित्रसजावट, विविध प्रकाशनांसाठी पुस्तकांची मुखपृष्ठं तयार करणे अशा प्रकारची कामं करू लागले. या काळात

केव्हातरी त्यांनी नारायण सुर्व्यांचं लक्ष वेधून घेतलं आणि सुर्व्यांनी त्यांना लोकवाङ्मय गृहाच्या भूपेश गुप्ता भवनमध्ये काम करण्यासाठी एका टेबल-खुर्चीची सोयही करून दिली. मग काही काळ स्वतंत्र व्यवसाय करून पाहत कालांतराने ते लोकवाङ्मय प्रकाशनाचे सूत्रधार बनले. त्यांच्या उमेदीवर व धडाडीवर विश्वास असल्यानेच बहुधा, १९९४मध्ये अमेरिकास्थित महाराष्ट्र फाउंडेशनच्या वतीने मराठी साहित्य पुरस्कारांची जी योजना आकार घेत होती, तिच्या कार्यवाहीची जबाबदारी विश्वासराव यांच्यावर सोपवली गेली.

प्रकाश विश्वासराव यांनी हे काम अगदी पहिल्या वर्षापासून ते २००९पर्यंत, सलग १६ वर्षं अत्यंत यशस्वीपणे पार पाडलं. या कामगिरीअंतर्गत त्यांनी साकारलेल्या 'संवादिनी' व 'मंथन' या देखण्या स्मरणिका दृश्य स्वरूपात लोकांसमोर आल्या. पण त्या पलीकडे त्यांनी जे काही काम केलं, ते मात्र कधी इतरांच्या फारसं लक्षात आलं नाही.

विश्वासरावांचे दीर्घकाळ मराठीतील अनेक अग्रगण्य साहित्यिकांशी जसे जवळचे संबंध होते, तसेच इतर क्षेत्रांतल्या दर्जेदार कलावंतांशीही होते. त्यामुळे त्यांनी या प्रकल्पातील प्रत्येक गोष्ट त्या-त्या क्षेत्रातील उत्कृष्ट माणसं निवडून करून घेतली. त्यांनी प्रख्यात चित्रकार षांताराम पवार यांच्याकडून करवून घेतलेली पुरस्कारांची स्मृतिचिन्हं फाउंडेशनच्या कार्यकारिणीतील सर्वांच्याच पसंतीला तत्काळ उतरली. या पुरस्कार योजनेतील विश्वासरावांच्या कर्तबगारीची ही सुरुवात होती.

दर वर्षी फाउंडेशनच्या भारतीय व अमेरिकेतील निवड समितींतर्फे विविध पुरस्कार विजेत्यांची नावं ठरली की विश्वासरावांचं काम सुरू होई. त्यातली पहिली गोष्ट म्हणजे 'संवादिनी'साठी (नंतर 'मंथन'साठीही) पुरस्कार विजेत्यांची छायाचित्रं मिळवणं. यासाठी फाउंडेशनच्या वतीने एक नामांकित छायाचित्रकार पुरस्कार विजेत्यांच्या घरी पाठवून, त्यांच्या नेहमीच्या पर्यावरणात छायाचित्रं मिळवायची






प्रकाश विश्वासरावांची संपादकीय आणि सौंदर्यदृष्टी दर्शवणारे अंक

प्रकाश विश्वासराव यांनी
महाराष्ट्र फाउंडेशनसाठी षांताराम पवार
यांच्याकडून साकारून घेतलेली
हीच ती स्मृतिचिन्हं...




कल्पना विश्वासरावांची. यामुळेच या स्मरणिकांतील छायाचित्रांना एक आगळेपण प्राप्त झालं आहे. मात्र हे विजेते महाराष्ट्राच्या विविध भागांतले असल्याने छायाचित्रकाराच्या दौऱ्याची नीट आखणी करावी लागे. विश्वासरावांनी हे काम श्याम मणचेकर, विठोबा पांचाळ, संदेश भंडारे अशा कुशल छायाचित्रकारांकडून करवून घेतलं.

छायाचित्रकार दौऱ्यावर निघता-निघतानाच इतरही अनेक कामांना वेग येई. याच काळात स्मरणिकेच्या संपादकांकडून आलेल्या लेखांची संगणक जुळणी, मुद्रितशोधन आदी गोष्टी चालू असत. दुसऱ्या बाजूला फाउंडेशनच्या समितीने पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी निवडलेल्या सभागृहाची पाहणी करून तिथे व्यासपीठामागे, तसंच इतरत्र लावायचे फलक यांच्या रचनांचं काम सुरू होई. सभागृहाच्या सजावटीची आखणी होई. पुरस्कार विजेत्यांच्या पुस्तकांच्या प्रदर्शनाची जागा ठरवली जाई व ती पुस्तकं मिळवण्याची जबाबदारी सोपवली जाई. कार्यक्रमाच्या दिवशी कोणी काय करायचं, कुठलं सामान घेऊन जायचं याच्या नोंदी केल्या जात.

दुसरीकडे निमंत्रण पत्रिकांचं डिझाईन करून त्या छापायचं व पाठवायचं नियोजन केलं जाई. तोपर्यंत विजेत्यांची छायाचित्रं आलेली असत. त्यांतली हवी ती निवडून, त्यांची जागा ठरवून स्मरणिकेची रचना केली जाई. स्मरणिकेची मुखपृष्ठंही विश्वासरावांनी शांताराम पवार, सुनील महाडिक, संतोष क्षीरसागर अशा नामांकित कलावंतांकडून करून घेतली आहेत. पुरस्कारांची घोषणा आणि वितरण समारंभ या दरम्यान फार कालावधी नसे. त्यामुळे ही अनेकविध कामं वेळेच्या मर्यादेत करावी लागत. लोकवाङ्मय गृहातील आपल्या विश्वासू सहकाऱ्यांच्या व काही मित्रांच्या मदतीने विश्वासराव हे ज्या सहजतेने पार पाडत, ते पाहताना त्यांच्या नेतृत्व कौशल्याचं आश्चर्य वाटत राही.

रवींद्र नाट्य मंदिरात झालेल्या पहिल्याच पुरस्कार सोहळ्यापासून विश्वासरावांनी आणखी एका वैशिष्ट्यपूर्ण गोष्टीची रचना केली. त्यांनी आठेक फूट उंचीचे काही लाकडी स्टँड बनवून घेतले. प्रत्येक स्टँडवर एका पुरस्कार विजेत्याचा फोटो व त्याच्याविषयीचा मजकूर आकर्षक स्वरूपात छापलेलं मोठं

अशा कल्पक फलकांची संकल्पनाही विश्वासरावांचीच...






# एक गमतीशीर आठवण

१९९५ सालची ही गोष्ट. महाराष्ट्र फाउंडेशनचाच पहिलावहिला साहित्य पुरस्कार सोहळा मुंबईच्या रवींद्र नाट्यमंदिरात रंगलेला होता. सभागृह गर्दीनं खचाखच भरलेलं होतं. सभागृह वातानुकूलित असल्यानं ऐन मे महिन्याच्या उन्हाळ्याची झळ सभागृहातील कुणालाही जाणवत नव्हती. पहिले जीवनगौरव समारंभाचे मानकरी होते कविवर्य नारायण सुर्वे आणि ज्येष्ठ विचारवंत मे.पु.रेगे. साऱ्यांनाच या पहिल्या कार्यक्रमाबद्दल उत्सुकता होती. लोक मंत्रमुग्ध होऊन नारायण सुर्वे यांचे भाषण ऐकत होते. विश्वासराव आणि त्यांचे सहकारी यांनी हा भव्य सोहळा यशस्वी आणि दिमाखदार व्हावा, म्हणून अतोनात कष्ट घेतलेले होते. आता ते काहीशा निवांतपणे व्यासपीठावरील भाषणांचा आनंद घेत होते. एवढ्यात एक स्वयंसेवक घाईघाईने आला आणि विश्वासरावांच्या कानात कुजबुजला. विश्वासराव तडक उठले आणि त्याच्याबरोबर तरातरा चालत रंगमंदिराच्या मागल्या बाजूला गेले. तिथे एक वेगळीच समस्या अकस्मात उद्‌भवली होती. तो जुन्या एअरकंडिशनिंगचा काळ होता. त्याच्या कूलरसाठी एका मोठ्या टाकीतून पाणी आत जात असे. शिवाय कूलरही तसा मरतुकडा आणि अगदी कमी क्षमतेचा होता. त्या टाकीत मध्यंतरात टँकरने पाणी आणून भरावे लागत असे. तरच त्यात थोडी धुगधुगी यायची. आता ठरल्याप्रमाणे टँकर आला होता. पण कोणी तरी त्या टँकरसमोरच आपली नवी 'मारुती' उभी केलेली होती. टँकरचे होज पाइपही इतके तोकडे होते की टाकीजवळ गेल्याशिवाय पाणी भरणं टँकरला शक्यच नव्हतं.

आता त्या गाडीवाल्याला शोधणं अशक्य होतं. सारे स्वयंसेवक चक्रावले होते. आता टाकीत पाणी गेलं नाही तर दहा मिनिटांत वातानुकूलित यंत्रणा बंद पडणार होती आणि सभागृहातल्या कार्यक्रमाचा पूर्ण विचका होणार होता, हे भविष्य स्पष्ट दिसत होते. आतल्यांना बाहेरच्या या संकटाची कल्पनाही नव्हती. तो टँकरचा चालक (सभ्य भाषेत सांगायचं झालं तर) पायावर पाय टाकून 'आपण त्या गावचेच नाही' असा मख्ख चेहरा करून बाजूला बिड्या फुंकत बाजूला बसला होता. यातून लगेचच मार्ग काढणं आवश्यक होतं. अचानक तगड्या विश्वासरावांना एक अफलातून कल्पना सुचली. त्यांनी पाच-सहा स्वयंसेवकांना बोलावलं. आणि त्यांच्या मदतीनं ती 'मारुती' गाडी चारी बाजूंनी उचलून अलगत दुसऱ्या जागेवर ठेवली. बघणारे सारे थक्क झाले आणि त्यांनी उत्स्फूर्तपणे टाळ्या वाजवल्या. टँकरचा ड्रायव्हर दातातील बिडी विझवून धावत आला. टँकर टाकीजवळ नेऊन त्यानं पाणी ओतायला लगेच सुरुवातही केली. सर्वांचा जीव भांड्यात (की टाकीत?) पडला. नाट्यमंदिरा'च्या बाहेर घडलेल्या या 'नाट्या'ची आतल्यांना कल्पनाही नव्हती. विश्वासराव मिस्कील हसत नंतर शांतपणे आपल्या जागेवर येऊन बसले आणि पुढच्या नियोजनात मग्न झाले.

**सुनील देशमुख**



महाराष्ट्र फाउंडेशनच्या वतीने देण्यात आलेलं मानपत्र स्वीकारताना प्रकाश विश्वासराव

पोस्टर बसवून हे सर्व स्टँड कार्यक्रमाच्या दिवशी सभागृहाच्या आवारात उभे केले जात. कार्यक्रमाला येणारे रसिक गर्दी करून ही पोस्टर्स पाहताहेत हे दृश्य आनंददायक असे.

हे सर्व एखाद्या ऑर्केस्ट्राच्या कंडक्टरच्या कुशलतेने घडवून आणणाऱ्या विश्वासरावांकडे एक आत्यंतिक प्रसिद्धी-विन्मुखता होती. त्यामुळे ते कधीच लोकांसमोर येत नसत. त्यांनीच तयार करवून घेतलेल्या या सोळा वर्षांच्या स्मरणिकांमध्ये एक मुद्रकाच्या नावाची जागा वगळता कुठेही त्यांचं नाव नाही, कुठेही त्यांचा फोटो नाही. याची दखल घेऊन २००७ च्या पुरस्कार वितरण सोहळ्यात, महाराष्ट्र फाउंडेशनच्या वतीने त्यांना चांदीच्या तबकावर कोरलेलं एक मानपत्र देण्यात आलं. विश्वासरावांच्या स्वभावानुसार त्यांनी हे मानपत्र आणि ते स्वीकारत असतानाचं छायाचित्र यांनाही स्मरणिकेत जागा देण्याचं टाळलं.

त्यांच्या अकाली निधनानंतर महाराष्ट्र फाउंडेशनच्या संबंधांतील त्यांच्या आठवणींची उजळणी करताना या दोन्ही गोष्टी या स्मरणिकेत प्रकाशित करणं उचित ठरेल.

जयप्रकाश सावंत
९३२१७७६०५२

प्रकाश विश्वासराव यांच्या कर्तृत्वाचं योग्य मूल्यमापन करणारं मानपत्र त्यांना सन्मानाने प्रदान करण्यात आलं. त्या मानपत्राचा हा मजकूर...

# । मानपत्र ।

मित्रवर प्रकाश विश्वासराव.

आपणाविषयीचा स्नेह व्यक्त करण्यासाठी केवळ चार शब्द आम्ही उच्चारत आहोत. स्नेह हा फक्त शब्दांतून व्यक्त होत नसतो याचा प्रत्यय आपण नेहमीच देत आलेला आहात याची जाणीव आम्हाला आहे. रंगमंचाच्या मध्यावर असण्याइतके उदंड कर्तृत्व असूनही प्रसिद्धीच्या झोतापासून आपण स्वतःला कायमच दूर ठेवत आला आहात. त्यामुळेच हे चार शब्द उच्चारण्याची निकड आम्हाला वाटलेली आहे. हे चार शब्ददेखील आपणास रुचणार नाहीत याचीदेखील आम्हाला जाणीव आहे. आपण करीत असलेल्या कार्यावरच सारे लक्ष केंद्रित करणारी आणि त्यापासून मिळणाऱ्या प्रसिद्धीविषयी उदासीन असणारी पिढी हळूहळू नाहीशी होत चाललेली असताना आपणासारखे उदाहरण आमच्या आसपास वावरते आहे याचा आम्हाला रास्त गर्व आहे. आपण नेहमी पडद्यामागे वावरत असता, तथापि कुशल नेतृत्वाचे गुण आपणात आहेत. आपल्या नेतृत्वाचा इतरांना आभासदेखील होऊ नये अशी वागणूक ठेवून अत्यंत महत्त्वाची कामे आपण सुविहितपणे सिद्ध केलेली आहेत.

लोकवाङ्मय गृह या प्रकाशन संस्थेला आज जे मानाचे स्थान प्राप्त झालेले आहे त्यामागे आपले निरलस कर्तृत्व आणि शांत नेतृत्व आहे. आपल्या व्यक्तित्वामध्ये कलावंत आणि व्यवस्थापक यांचा सुरेख समन्वय साधलेला आहे. आपल्या कामांतून कलावंताची नवनिर्मितीक्षमता आणि व्यवस्थापकांची कार्यसिद्धीक्षमता या दोहोंचा प्रत्यय एकाच वेळी येत असतो. आपण कोणत्याही कामाकडे एक आरेखन, डिझाइन म्हणून पाहत असता असे वाटते. त्यामुळेच सम आणि व्यस्त अशा दोन्ही प्रवृत्तींच्या व्यक्तींची आपण चांगली जुळणी करू शकता. त्यांच्यामधल्या कार्यकुशलतेला विधायक अभिव्यक्तीचे विविध मार्ग उपलब्ध करून देत असता. हे जग म्हणजे संकल्पना आणि रूपसिद्धी यांचा अनुभव देणारी कृती आहे असा आपला दृष्टिकोन असावा की काय असे वाटते.

गेल्या काही वर्षांत आपण पूर्ण केलेल्या काही मोठ्या प्रकल्पांची या ठिकाणी सहजच आठवण होते. डॉ. पंजाबराव ऊर्फ भाऊसाहेब देशमुख यांचे अमरावती येथील स्मारक संग्रहालय हे आपणामधल्या नवनिर्माणक्षम प्रतिभेचे आणि व्यवस्थापन कुशलतेचे सुंदर प्रतीक आहे. मुंबई विद्यापीठाच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवप्रसंगी आपल्या संकल्पनेतून रूपसिद्ध लाभलेला 'मुंबई विद्यापीठ : शहराचे भूषण' हा डोळ्यांचे पारणे फेडणारा ग्रंथ म्हणजे आपल्या निर्मितीक्षम आयुष्यातला एक महत्त्वाचा टप्पा आहे. महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारालादेखील न शिवलेल्या आपणाकडून त्या गौरवशाली ज्ञानसंस्थेला केले गेलेले हे विलक्षण सुंदर असे अभिवादन आहे. आपल्या कार्यसंपन्न आयुष्यातला कळसाचा टप्पा म्हणजे लोकवाङ्‌मय गृहातर्फे साकार झालेला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या छायाचित्रात्मक चरित्रग्रंथाचा प्रकल्प. आपल्या युगातल्या या महान विभूतीचे त्यांच्या महानतेला शोभेल असे ग्रंथरूप सिद्ध करणे हे अत्यंत अवघड असे आव्हान आपण सहजतेने पेलले आहे. भारतातीलच नव्हे तर जगातील थोर पुरुषांमध्ये समाविष्ट झालेल्या या युगनायकाचे चरित्र महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या, जगाच्या कानाकोपऱ्यांत पोहचावे या हेतूने आपण मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषांतून हा ग्रंथ सादर केला आहे. भारतीय प्रकाशन व्यवसायाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद घ्यावी अशी ही घटना आहे. आम्हा सर्वांना अभिमान वाटावा अशीच ही घटना आहे.

आपल्या सर्जनशीलतेला सीमा नाही. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विश्वाला भूषणावह ठरतील अशी कामे आपणाकडून यापुढेही घडत राहतील, असा आम्हाला विश्वास आहे. यापुढच्या आपल्या नवनिर्माणक्षम आयुष्यासाठी आमच्या मन:पूर्वक शुभेच्छा आहेत.

**सुनील देशमुख, मृणाल गोरे**
महाराष्ट्र फाउंडेशन, केशव गोरे स्मारक ट्रस्ट

# सर्वांना सोबत घेऊन जाणारा माणूस : सतीश काळसेकर

**जयप्रकाश सावंत**



*(१२ फेब्रुवारी १९४३ - २४ जुलै २०२१)*

अमेरिकास्थित 'महाराष्ट्र फाउंडेशन' ही संस्था १९७८पासून महाराष्ट्रातील काही ध्येयवादी सामाजिक संस्थांना मदत करण्याचं कार्य करत होती. हे काम चालू असतानाच १९९४मध्ये, सुनील देशमुख यांनी दिलेल्या एक कोटी रुपयांच्या देणगीतून, फाउंडेशनने मराठी साहित्यात मोलाची भर घालणाऱ्या लेखकांना व पुस्तकांना पुरस्कार देण्याची एक योजना सुरू केली. महाराष्ट्र फाउंडेशनचे हे पुरस्कार अगदी पहिल्या वर्षापासून प्रतिष्ठाप्राप्त ठरले. ही प्रतिष्ठा केवळ हे पुरस्कार मोठ्या रकमेचे असल्याने लाभलेली नव्हती, तर ज्या विश्वासार्ह पद्धतीने पुरस्कार विजेत्यांची निवड होत राहिली त्यातून मिळालेली होती. ही निवड भारतातील व अमेरिकेतील सल्लागार समितींच्या संयुक्त विद्यमाने होत असे, अजूनही होते. अलीकडेच निधन पावलेले कवी सतीश काळसेकर हे अगदी पहिल्या वर्षापासून सलग दहा वर्षं या भारतातील सल्लागार समितीचे सदस्य होते, आणि नंतरची चार वर्षं त्यांनी या समितीचे निमंत्रक म्हणून काम पाहिलं.

महाराष्ट्र फाउंडेशनची साहित्य पुरस्कार योजना ही मानवी स्वातंत्र्य, समता व न्याय यांची प्रस्थापना करू पाहणाऱ्या प्रगतिशील व परिवर्तनवादी साहित्याला पाठबळ देण्यासाठी निर्माण झाली



सतीश काळसेकर यांच्यासोबत प्रकाश विश्वासराव

होती. सतीश काळसेकर यांचं सारं आयुष्य याच मूल्यांभोवती उभं होतं. त्यामुळे त्यांची या सल्लागार समितीवरची निवड ही पूर्णपणे यथोचित होती.

साठोत्तरी मराठी साहित्यातील एक महत्त्वाचे कवी, अनियतकालिक चळवळीतले अग्रणी, ट्रेड युनियनमधले एक लढाऊ, मात्र सर्वांना सोबत घेऊन जाणारे कॉम्रेड, मराठी-हिंदी-इंग्रजी भाषांतील ललित तसंच वैचारिक साहित्याचे जाणते वाचक आणि एक थोर ग्रंथसंग्राहक अशा अनेकविध रूपांत काळसेकर सर्वत्र परिचित आहेत. 'जातिवंत भटके' हे त्यांचं आणखी एक रूप. या भटकेपणातून त्यांनी जवळपास देश जसा पालथा घातला, तशाच तऱ्हेने ते कविता वाचनाच्या किंवा साहित्यिक कार्यक्रमांच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून फिरले. या सर्व भागांतल्या तरुण व नवोदित लेखक-कवींशी त्यांनी स्वत:ला जोडून घेतलं. मुंबईत परतताना या नवोदितांची हस्तलिखितं ते सोबत घेऊन येत. काळसेकर केवळ मोठे वाचक नव्हते, तर मोठ्या मनाचे वाचक होते. ज्या तन्मयतेने ते त्यांचा आवडता नोबेल पुरस्कार विजेता सारामागो वाचत, त्याच तन्मयतेने ते ही सर्व हस्तलिखितं वाचत, त्यांत सुधारणा करून घेत, ती प्रकाशित व्हावी म्हणून आस्थेने प्रयत्न करत. त्यांच्या या सर्व गुणवैशिष्ट्यांचा महाराष्ट्र फाउंडेशनच्या निवड समितीला निश्चितच मोठा फायदा झाला. त्यांच्यामुळे महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील गुणी तरुण साहित्यिकांची नावं निवड समितीसमोर येऊ शकली.

फाउंडेशनच्या पुरस्कारांमध्ये सुरुवातीपासून एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील कामगिरीसाठी एका



सतीश काळसेकर, सुनील देशमुख आणि प्रकाश विश्वासराव

साहित्यिकाला विशेष पुरस्काराने गौरवण्यात येत असे. काळसेकरांनी ते निमंत्रक असण्याच्या काळात विशिष्ट क्षेत्राचा आग्रह न धरता मनोहर शहाणे आणि महादेव मोरे या दुर्लक्षित राहिलेल्या साहित्यिकांना हा पुरस्कार देऊन सन्मानित केलं होतं. काळसेकरांच्याच पुढाकारातून घडलेल्या आणखी एका विशेष गोष्टीचा उल्लेख इथे आवश्यक आहे. त्यांनी महाराष्ट्र फाउंडेशनतर्फे अनुदान देववून मराठीतील सामाजिक दस्तऐवज ठरतील अशा महत्त्वाच्या पण दुर्लक्षित राहिलेल्या दोन कादंबऱ्या पुनर्प्रकाशित करून घेतल्या होत्या. 'दीनमित्र'कार मुकुंदराव पाटील यांची १९२७ साली प्रथम प्रकाशित झालेली 'ढढ्ढाशास्त्री परान्ने' ही कादंबरी आणि इंदिराबाई सहस्रबुद्धे यांची १९३१ सालची 'बाळूताई धडा घे' शीर्षकाची कादंबरी. या कादंबऱ्या या अनुदानाच्या साहाय्याने लोकवाङ्मय गृहातर्फे अनुक्रमे प्रवीण चव्हाण व विद्युत भागवत यांच्या अभ्यासपूर्ण प्रस्तावनांसहित प्रसिद्ध झाल्या होत्या. हा उपक्रम पुन्हा एकदा सुरू करावा, इतका मोलाचा आहे.

२४ जुलै २०२१ रोजी झालेल्या काळसेकरांच्या आकस्मिक निधनानंतर दहा-पंधरा दिवसांत एका श्रद्धांजली सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. कुठल्याही पूर्वतयारीशिवाय घेतलेल्या या सभेत मराठी व हिंदीतले अनेक नामवंत कवी-साहित्यिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. जागतिक कीर्तीचे विचारवंत एजाज अहमद बीजभाषणासाठी आले होते. या चार दिवसांच्या ऑनलाइन कार्यक्रमाला महाराष्ट्रभरातून सातत्याने सहा-सात हजारांची उपस्थिती लाभली. काळसेकरांविषयी सर्व स्तरांतील

लोकांना किती प्रेम वाटत होतं याचं हे निदर्शक आहे. अजूनही एखाद्या लहान गावातील कवीचा, ‘काळसेकरदादांमुळेच माझं पुस्तक प्रकाशित होऊ शकलं’ असं गहिवरून सांगणारा फोन येतो, किंवा चंद्रकान्त पाटील, अरुण खोपकर, विलास खोले यांसारखे समृद्ध वाचन असणारे त्यांचे मित्र, ‘आता एखाद्या पुस्तकाचा, मासिकाचा संदर्भ हवा असला, तर तो विचारायची जागा राहिली नाही’ म्हणत हळहळ व्यक्त करतात, तेव्हा काळसेकरांच्या जाण्याने आपण काय काय गमावलं आहे याची जाणीव होते.

जयप्रकाश सावंत
९३२१७७६०५२

# सामाजिक बांधिलकी मानणारे न्यायमूर्ती : नरेंद्र चपळगावकर

**डॉ. सुधीर रसाळ**



माझी आणि नरेंद्र चपळगावकरांची गेल्या पासष्ट वर्षांपासून मैत्री आहे. आम्ही एकमेकांना सुखदु:खाच्या अनेक प्रसंगांतून जाताना पाहिले आहे आणि एकमेकांना साथही दिली आहे. आमच्या जीवनातले अनेक महत्त्वाचे निर्णय आम्ही दोघांनी एकमेकांशी चर्चा करून घेतले आहेत. त्यामुळे चपळगावकर आतापर्यंत कशासाठी आणि कसे जगत आले, हे जवळून पाहणारा मी त्यांचा मित्र आहे. त्यांच्याबद्दल लिहिताना मी त्यांचा उल्लेख त्यांच्या सर्वपरिचित नावाने करणार नाही. कारण त्या नावाने संबोधित करून मी त्यांच्याविषयी लिहूच शकणार नाही. तेव्हा मी त्यांचा उल्लेख त्यांच्या घरगुती 'नाना' या नावाने करणार असून तो एकेरी स्वरूपाचा असेल.

नानाचे वडील पुरुषोत्तमराव हे बीड येथे वकिली करत. हैदराबाद मुक्तिसंग्राम सुरू झाल्यावर आपली वकिली गुंडाळून ते या लढ्यात सामील झाले. वकिली थांबल्यामुळे घरचे उत्पन्न कमी झाले.

नानाच्या कुटुंबाने दहा-एक वर्षं दारिद्र्याच्या झळा सोसल्या. हैदराबाद संस्थान मुक्त झाल्यावर काही वर्षे पुरुषोत्तमराव राजकारणात सक्रिय होते. परंतु आता आपल्यासारख्यांना राजकारणात स्थान नाही हे लक्षात येताच त्यांनी राजकारण पूर्णपणे सोडले. हैदराबाद संस्थानचा मुक्तिलढा महात्मा गांधींशी होणाऱ्या विचार-विनिमयाने चालवला जात होता. तेव्हा या लढ्यातल्या कार्यकर्त्यांवर महात्मा गांधींचा फार मोठा प्रभाव होता. पुरुषोत्तमरावही पक्के गांधीवादी होते. त्यामुळे त्यांची वकिली गांधीतत्त्वांनुसार चालत असे! अशील केस घेऊन त्यांच्याकडे आला की ते त्याला परस्परांत बोलणी करून तंटा मिटवण्याचा सल्ला देत. ज्याच्या केसमध्ये जर जिंकण्याचा अजिबात संभव नसेल तर ''तू खटला भरण्याच्या भानगडीत पडू नकोस,'' असे स्वच्छ सांगत. मग तो इसम दुसऱ्या वकिलाकडे जाई आणि प्रचंड पैसा खर्चून केस हरून येई. शाळेत शिकणाऱ्या नानावर वडिलांच्या वकिलीपद्धतीचा संस्कार झाला.

शाळेत असताना नानाचे लक्ष अभ्यासाव्यतिरिक्त इतर अनेक गोष्टींकडे असे. विशेषत: अभ्यास सोडून पुस्तके वाचण्यात तो रमून जात असे. त्याच्या इतर अनेक उद्योगांमुळे नाना मॅट्रिकची परीक्षा काठावर पास झाला. त्यामुळे कॉलेज शिक्षणासाठी त्याला वऱ्हाडात अमरावतीला जावे लागले. तेथून तो इंटर परीक्षा पास होऊन औरंगाबाद येथे आला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मिलिंद कॉलेजात बी.ए.साठी दाखल झाला. या कॉलेजात नाना कॉलेजच्या एक्स्ट्रॉ कॅरिक्युलर ॲक्टिव्हिटीजमध्येच अधिक रस घेत असे. एक प्रकारे विद्यार्थ्यांचे नेतृत्वच त्याच्याकडे आले होते. कॉलेजात त्याने वक्तृत्वकलेवर चांगलेच प्रभुत्व मिळवले होते. कॉलेजात असताना त्याने वक्तृत्व स्पर्धांत अनेक पारितोषिके मिळवली. याच काळात नाना लेखनही करू लागला आणि त्याची 'सत्यकथा' या प्रतिष्ठित वाङ्मयीन नियतकालिकात तात्काळ वर्णी लागली. त्याच्या कथा आणि कविता इतरत्रही प्रसिद्ध होऊ लागल्या. कॉलेजबाहेरही नाना इतर अनेक सार्वजनिक उद्योग करीत असे. काही वृत्तपत्रांचा बातमीदार म्हणून तो काम करीत असे. त्या निमित्ताने येथल्या राजकीय, सांस्कृतिक सभा-समारंभांना









हजर राहणे, गावात काही विशेष घडले की तेथे बातमीसाठी धावणे हे सुरू झाले. कॉलेजकाळात सतत कुठल्या ना कुठल्या सार्वजनिक कामात स्वत:ला गुंतवून घेणे, त्या निमित्ताने लोकांत वावरणे हे तो करीत राहिल्यामुळे आजही जर त्याच्याभोवती माणसे नसतील तर तो अस्वस्थ होतो. तो फार काळ एकटा राहू शकत नाही. तीच गोष्ट व्याख्यानांची. ही त्याची खास आवड आहे. तो व्याख्यानांची आमंत्रणे सहसा नाकारीत नाही.

कुठलेही काम त्याने मनावर घेतले तर ते तडीला लागेपर्यंत त्याला चैन पडत नाही. हैदराबाद संस्थान विलीन झाल्यावर भारत सरकारने औरंगाबादचे आकाशवाणी केंद्र पुण्याला हलवले. आम्ही भारतात विलीन झाल्यावर आम्हाला तर काही दिलेच नाही, उलट आमचे असलेले येथून नेले, हा मराठवाड्यावर अन्याय असल्याचे नानाला जाणवले. मग नानाने गणपती उत्सवातल्या मेळ्यातून या अन्यायावर गीते लिहून लोकांत याबद्दल जागृती करण्याचे काम केले. तो प्रत्येक साहित्य संमेलनाला हजर राहून तेथे औरंगाबाद आकाशवाणीसंबंधीचा ठराव मांडू लागला. शेवटी नाना म्हटले की आकाशवाणी, अशी नानाची एक ओळख रूढ झाली!

नाना बी.ए. झाला आणि एकाच वेळी लॉ आणि मराठीमध्ये एम्.ए. करू लागला. दोन्ही ठिकाणी तो प्रथम वर्गात उत्तीर्ण झाला. आतापर्यंतच्या त्याच्या अनेक क्षेत्रांतील चळवळींमुळे त्याचे आस्थाविषय पक्के झाले होते. त्याला मराठीचा प्राध्यापक व्हायचे होते; त्याला वृत्तपत्रव्यवसायात यायचे होते आणि वकिलीही करायची होती! आता यातला कोणता व्यवसाय स्वीकारावा हा त्याच्यापुढे यक्ष प्रश्न होता. खरे म्हणजे मुळात त्याला राजकारणात सर्वाधिक रस होता. राजकारणात यशस्वी होण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सर्व हत्यारांवर त्याचे प्रभुत्व होते. कॉलेजात असल्यापासून त्याने अनेक निवडणुका जिंकल्या होत्या. मराठवाडा साहित्य परिषदेच्या निवडणुकीत तो प्रत्येक वेळी प्रथम क्रमांकांची मते मिळवून निवडून आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यकारिणीवर तो प्रथम









क्रमांकाची मते मिळवून निवडून आला आहे, बीड म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीत तो एका वार्डातून नगरसेवक म्हणून निवडून आला. तेथे तो वयाने सर्वांत लहान नगरसेवक होता. समाजवादी पक्षात त्याने रीतसर प्रवेश घेतला होता. या पक्षाच्या युवा सभेचा तो सरचिटणीस होता. परंतु आपणास राजकारणात वावच दिला जाणार नाही हे लक्षात आल्यावर त्याला नाइलाजाने हे क्षेत्र सोडावे लागले. असे असले तरी त्याचे नेतेपण मात्र अजूनही टिकून आहे. आजही त्याने दिलेले आदेश सर्वांना पाळावे लागतात. दुसऱ्याचे आदेश पाळायची त्याला सवय नाही!

उरलेल्या तीन आस्थाविषयांत काम करण्याची इच्छा मात्र त्याला थोडी थोडी पूर्ण करता आली. एम्.ए. झाल्यावर लातूरला तो मराठीचा प्राध्यापक म्हणून रुजू झाला. या काळात त्याचे कविता, कथा आणि समीक्षा लेखन चालू होते. वर्षभरानंतर तो वडिलांना वकिलीत मदत करायला बीडला आला. 'किर्लोस्कर' मासिकात प्रथम तो लिहू लागला आणि नंतर तो मुकुंदराव किर्लोस्करांच्या परिवाराचा सदस्यच झाला. किर्लोस्कर नियतकालिक समूहाच्या तिन्ही नियतकालिकांच्या संपादनात जसा तो रस घेऊ लागला तसेच या समूहाच्या धोरणविषयक प्रश्नांतही त्याचे मत घेतले जाऊ लागले.

हळूहळू नानाच्या आस्थाविषयात आणि कार्यकक्षेत बदल झाले. त्याची वकिली इतकी वाढली की त्याला अन्य आस्थाक्षेत्रांत लक्ष घालायला वेळच मिळेनासा झाला. आपल्या वकिली पेशात त्याने वडिलांची परंपरा पुढे चालवली. अशिलाला त्याच्या खटल्यात काही जीव आहे की नाही या विषयी तो योग्य सल्ला द्यायचा. समाजाचे आपण देणे लागतो, हे तो कधीच विसरला नाही. वकिलीचा त्याने 'धंदा' केला नाही. गरीब-दीनदुबळे, शाळामास्तर, मजूर अशा वर्गांचे खटले तो पैसे न घेता चालवत असे. वकिलीतल्या त्याच्या ज्येष्ठ मित्रांनी त्याला मुंबई हायकोर्टात वकिली करायला बोलावले. नाना बीडहून मुंबईत गेला. तेथेही हायकोर्ट वकील म्हणून तो यशस्वी झाला.

वकिली करीत असताना तर नाना आपले सामाजिक दायित्व मानतच असे, पण उच्च न्यायालयात न्यायमूर्ती झाल्यानंतरही तो हे कधी विसरला नाही. गोव्यातल्या हायकोर्टात वरिष्ठ न्यायमूर्ती म्हणून









काम करीत असतानाची ही हकिगत आहे. ‘गोव्यात घातक स्वरूपाचा मलेरिया वाढत असून मेंदूला मलेरियाची लागण होऊन गोव्यात काही मृत्यू झाले,’ अशी वृत्तपत्रात बातमी आली. याबाबत गोवा सरकार काहीही करीत नाही, असेही त्यात म्हटले होते. नानाने इतर न्यायमूर्तींशी सल्लामसलत करून ही बातमीच पिटिशन म्हणून दाखल करून घेतली आणि मुख्य शासकीय सचिवांना हजर राहण्याची नोटीस पाठवली. ते हजर झाल्यावर शासनाने यासंबंधी काहीच केले नसल्याचे कोर्टाच्या लक्षात आले. नानाने आपल्या चेंबरमध्ये गोव्यातील सर्व नगरपालिकांच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या साथीसंबंधी नगरपालिका काय काय करीत आहेत याची चौकशी केली. कुठेही काहीही होत नाही हे लक्षात आल्यावर, शासनाने आणि नगरपालिकांनी कोणकोणत्या उपाययोजना अमलात आणाव्या, यासंबंधी सविस्तर असा लेखी आदेश हायकोर्टामार्फत त्याने दिला. काही दिवसांतच ही साथ नाहीशी झाली. शासनाने करायचे काम न्यायपालिकेने हातात घेऊ नये असा जरी संकेत असला तरी जेथे माणसांच्या जिवाला धोका होईल, अशी गंभीर परिस्थिती असते आणि शासन आपले काम बरोबर करीत नसल्याचे लक्षात येते, तेथे न्यायपालिका दखल देऊ शकते. जनहितार्थ नानाने हेच केले.

मुंबई उच्च न्यायालयाची शाखा औरंगाबादी निघाल्यावर तो औरंगाबादी, म्हणजे त्याच्या ‘घरी’ परतला. येथेच वाङ्मय, संगीत, राजकारण, समाजकारण अशा विषयांत ॲकॅडमिक रस घेणाऱ्या



न्या. नरेन्द्र चपळगावकर यांना डॉ. सुधीर रसाळ यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान...
डावीकडून : मुकुंद टाकसाळे (समन्वयक), डॉ. सुधीर रसाळ, न्या. नरेन्द्र चपळगावकर व नंदिनी चपळगावकर, आणि श्रीधर नांदेडकर (अध्यक्ष, भारतातील साहित्य निवड समिती)

त्याच्या समानधर्मीय मित्रांचा परिवार होता. मुख्यत: अनंत भालेराव होते. आता नानाची वकिली अशी चालत होती की रात्री बारा-एकपर्यंत अशील हटतच नव्हते. वकिलीबरोबरच त्याला वाङ्मयादी क्षेत्रातही काम करायचे होते, पण वकिलीतून उसंत मिळत नव्हती. मग नानाने एक निर्णायक पाऊल उचलले. चालून आलेले हायकोर्टाचे न्यायमूर्तीपद स्वीकारण्याचा निर्णय त्याने घेतला.

आता नानाला फुरसतीचा अधिक वेळ मिळू लागला. हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा इतिहास सांगणारा मराठीत एकही ग्रंथ नव्हता. गोविंदभाई श्रॉफ, अनंत भालेराव यांना तसे म्हणावे तर 'आम्ही असं केलंच काय म्हणून त्याचे ढोल पिटवावे!' असे उत्तर मिळत असे. शेवटी अनंत भालेरावांना पटविण्यात आम्हा मंडळींना यश आले. त्यात अर्थातच नानाही होता. अनंत भालेरावांचे पुस्तक तयार झाले. पण हे पुरेसे नव्हते. त्यात अनंतरावही अचानक गेले. आता या मुक्तिसंग्रामावर अधिकृतपणे लिहिणार कोण? नानाने जरी या आंदोलनात भाग घेतला नव्हता तरी पुरुषोत्तमराव चपळगावकरांमुळे त्याला पुष्कळच माहिती होती. ही सर्व नेतेमंडळी त्यांच्या घरी वारंवार येत; तेथे चर्चा होत. यातून नानाही राजकारणात तयार झाला होता. प्रत्यक्ष लढ्यात सहभागी लोक जर लिहीत नसतील तर आपणच अभ्यास करून हे काम केले पाहिजे. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली हा लढा लढला गेला होता. त्यांचे जर साधार चरित्र लिहिले तर या संग्रामातील अनेक अज्ञात घटना, समरप्रसंग ज्ञात होतील आणि या



न्या. नरेन्द्र चपळगावकर व त्यांच्या पत्नी नंदिनी चपळगावकर

संग्रामाचा इतिहास पूर्णतेच्या अधिक निकट जाईल. नानाने रामानंद तीर्थांचे साधार चरित्र लिहिले, अनंतरावांच्या पुस्तकाबरोबरच नानाचे 'कर्मयोगी संन्यासी' हेही पुस्तक अधिकृत समजले जाते. त्यानंतर नानाने हैदराबाद लढ्यातील व्यक्तींच्या आणि हैदराबादमधील निजामाच्या पदरी असणाऱ्या अनेक नवाबांच्या, अधिकाऱ्यांच्या व्यक्तिरेखा लिहिल्या. स्वत:च्या वडिलांकडून आत्मकथा लिहून घेतली. आपल्या जीवनातील आठवणी लिहून त्यांच्याद्वारे मराठवाड्यातील लोकजीवनाचे आणि संस्कृतीचे अनेक पदर उलगडले. मराठवाड्याच्या बाहेरील महाराष्ट्राला हे सर्व अज्ञात होते. या पुस्तकांमुळे मराठवाडा समजून घेण्याची एक सोय झाली.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात ज्यांनी अतिशय मौलिक कार्य केले अशांचे समाजाला विस्मरण होत असल्याचे नानाला जाणवत होतेच. अशांच्या कार्याचा परिचय करून देऊन त्याचे मोल समाजापुढे ठेवले पाहिजे, या जाणिवेतून नानाने भारतीय पातळीवरील विस्मृत झालेल्या ज्या पुढाऱ्यांच्या कार्याबद्दल आणि ज्या पुढाऱ्यांमधील संबंधांबद्दल गैरसमज प्रसृत झाले होते ते सप्रमाण दूर करण्यासाठी लेखन केले. नेहरू, पटेल, राजाजी, राजेंद्रप्रसाद, सुभाषचंद्र बोस असे भारतीय पुढारी आणि शंकरराव देव, केशवराव जेधे, काकासाहेब गाडगीळ, अच्युतराव पटवर्धन, नानासाहेब गोरे, एस्. एम्. जोशी असे महाराष्ट्रातले पुढारी यांच्या कार्याचा परिचय करून देणाऱ्या व्यक्तिरेखा लिहिल्या. आपल्या लेखनातून, व्याख्यानांतून लोकशिक्षण देऊन नवा समाज घडवणारे आचार्य स.ज. भागवत, आचार्य जावडेकर, विठ्ठल रामजी शिंदे असे अनेक विचारवंत होऊन गेले. त्यांनाही आजचा महाराष्ट्र विसरला आहे. त्यांच्या कार्याचे दस्तावेजीकरण करणारे पुस्तक आता येऊ घातले आहे. आजकाल पंडित नेहरूंवर अनैतिहासिक टीका होत आहे. त्यांच्या व्यक्तिगत चारित्र्यावर जाहीरपणे शिंतोडे उडवणे सुरू आहे. आधुनिक भारताचा पाया घालणाऱ्या या राष्ट्रपुरुषाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक कार्याचे स्वरूप आणि मोल निश्चित करणारा नानाचा ग्रंथही लवकरच प्रकाशित होत आहे.

कुठल्याही क्षेत्रात काम करीत असो, नानाने आपली सामाजिक दायित्वाची भावना जागृत ठेवली. म्हणूनच लेखन करीत असताना आपण सामान्य वाचकासाठी लिहितो आहोत याचे भान नानाने ठेवले. या भानातूनच नानाची भाषाशैली आणि लेखाची मांडणी सिद्ध झाली आहे. हे लेखन वैचारिक असूनही ते उत्कटपणे वाचनीय असते. नानाचे साहित्य लेखन वाचक पूर्ण वाचूनच खाली ठेवतो. अतिशय सोपे पण अर्थसमृद्ध अशा शैलीत नाना लिहितो. संशोधनपर लेखनाची शिस्त तो काटेकोरपणे पाळतो. हे लेखन सत्यविन्मुख कधीही होत नाही. तरीही ते ललित लेखनाइतकेच वाचनीय असते.

ज्या लेखनाचे केवळ ऐतिहासिकच नव्हे तर सांस्कृतिक मोलही फार मोठे आहे असे लेखन महाराष्ट्राला सादर करणारे न्या. नरेंद्र चपळगावकर महाराष्ट्रात लोकशिक्षण करणाऱ्या विचारवंतांच्या मालिकेतले आजचे प्रमुख विचारवंत आहेत.

डॉ. सुधीर रसाळ
९८८१४००३५०

व्हिडिओवरील भाषण...

# समतामूल्यं समाजजीवनातही हाडीमाशी रुजावीत...

महाराष्ट्र फाउंडेशनचा वैचारिक क्षेत्रातील लेखनाबद्दल दिला जाणारा यंदाचा 'जीवन गौरव पुरस्कार' नम्रतापूर्वक स्वीकारत असताना मला आनंद होत आहे हे कबूल केले पाहिजे. मी महाराष्ट्र फाउंडेशनचे आणि या पुरस्कारासाठी माझी निवड करणारांचे मन:पूर्वक आभार मानतो. विचारवंत आणि प्रबोधक म्हणून महाराष्ट्र ज्यांची आजही आदरपूर्वक आठवण काढतो त्या मेघश्याम पुंडलिक रेगे यांना प्रथमत: आपण हा पुरस्कार दिला होता. आज तो स्वीकारताना रेग्यांसारख्या ज्ञानऋषीचे स्मरण झाले म्हणजे त्या तुलनेने आपण किती लहान आहोत याचीही जाणीव मला मनोमन होते व मनावरचे ओझे आणखी वाढते. आज मला आठवण होते आहे ती माझ्या वडिलांची. हैदराबाद संस्थानच्या मुक्तिलढ्यात भाग घेताना त्यांना मुख्यत: ज्या शिक्षा झाल्या त्या होत्या त्यांनी केलेल्या भाषणाबद्दलच्या. निजामाच्या



डॉ. सुधीर रसाळ व न्या. नरेन्द्र चपळगावकर

राज्यातील अनिर्बंध कारभार, जुलमी कायदे यांच्याविरुद्ध लोकमत जागृत करण्यासाठी ते काम करत होते. ज्यांना ते संबोधित करू इच्छित होते तो समाज त्या काळात लिखित आणि मुद्रित शब्दव्यवहाराशी एवढा परिचित झालेला नव्हता. मुख्य भर बोलण्यावरच होता. संस्थानात अनुभवास येणारे सत्य ते सांगत होते. पण सत्य सांगण्याचे स्वातंत्र्य त्या वेळी नव्हते. तुरुंगात असताना सत्याग्रही तरुण मुलांना ते विविध राजकीय प्रवाहांची ओळख करून देत. हुकूमशाही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अस्तित्वात असते तेव्हा वातावरणात एक प्रकारचे कोंदलेपण असते. तसे ते त्या वेळी होते. हे वातावरण खुले करण्याचा प्रयत्न स्वातंत्र्याचे आणि स्वतंत्र विचारांचे समर्थक त्या वेळी करत होते. त्यात अल्पसा भाग असणाऱ्या माझ्या वडिलांची आठवण मला होणे स्वाभाविक आहे.

महाराष्ट्रात विचारवंतांची एक मोठी परंपरा आहे. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, न्या. महादेव गोविंद रानडे, म. जोतिराव फुले, गोपाळ गणेश आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक विचारवंतांनी नवे विचार मांडले, समाजाला मार्गदर्शन केले आणि काहींनी तर त्याचे कृतिशील नेतृत्वही केले. नंतरच्या काळात समाजाच्या स्थितिगतीचा विचार करावयाचा आणि आपली मते स्पष्टपणे मांडावयाची ही परंपरा राखणारे अनेक विचारवंत झाले आणि त्यांनी ही परंपरा कायम ठेवली. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, विठ्ठल रामजी शिंदे, श्रीधर व्यंकटेश केतकर, विनोबा भावे, आचार्य शं. द. जावडेकर, आचार्य स. ज. भागवत अशी काही नावे सहज आठवतात. त्यांनी समाजहिताचा विचार केला आणि परखड मार्गदर्शन केले आणि पुन्हा सत्तेची किंवा कोणत्याच अधिकाराची लालसा बाळगली नाही. त्यांचे सगळेच विचार सगळ्यांनीच स्वीकारले असे झाले नाही, परंतु या विचारांनी वाट मोकळी केली. प्रत्येक माणसाला स्वतंत्रपणे विचार करण्याचा अधिकार आहे, तो विचार सांगण्याचाही त्याला अधिकार आहे. प्रत्येक विचार किंवा विधान तपासून घेऊन, त्याची चिकित्सा करूनच त्यावर विश्वास ठेवावा असे ठरवण्याचाही त्याला अधिकार आहे. समाजाच्या स्थितीविषयी आणि पुढच्या मार्गक्रमणाच्या दिशेविषयी एक विचारमंथन चालू असावे आणि त्यात आपणही सहभागी असावे, असे त्याला वाटण्याचा अधिकार आहे. विचारांचे खुले आदानप्रदान ही समाजाच्या आरोग्याची एक खूण आहे.

विचारांची ही देवाणघेवाण काहींना नको असते. ती थांबवण्याचा साधा-सरळ उपाय म्हणजे विशिष्ट विचारांना आणि ते प्रकट करणाऱ्या माध्यमांना बंदी करणे. अनेक वेळा सत्ताधारी हा उपाय योजतात. पण कायद्याने असा प्रतिबंध करणे ही नाही म्हटले तरी लोकांत अप्रिय होणारी गोष्ट आहे. लोक स्वखुशीने विचार करण्याचा आपला अधिकार सोडून देतील, असा उपाय काही हुकूमशाह अवलंबितात आणि लोक अत्यंत आनंदाने विचार करणे सोडून देतात. वंश, धर्म, जात, भाषा किंवा एखादे सांस्कृतिक वैशिष्ट्य याचा अतिरेकी अभिमान लोकांच्या मनात रुजवला, त्याला खतपाणी घातले म्हणजे त्याच्या आधारे सामान्य माणसे विचार करण्याचा आणि इतरही अधिकार स्वखुशीने सोडून देतात. हिटलरने जर्मन आर्यवंशाबद्दलचा अभिमान पराकोटीला नेला, त्याचबरोबर ज्यूद्वेषाचे विष भिनवले. परिणाम असा झाला की, वांशिक अहंतेत खोल बुडालेल्या लोकांनी स्वतंत्र विचार करण्याचे थांबवले. ते सगळे काम हिटलर आणि त्याच्या सहकाऱ्यांना सुपूर्द केले. हे सगळे निवडणुकीच्या मार्गाने सत्तेवर येऊन नाझींनी साध्य केले. मानवी स्वभावातील दुरभिमान आणि द्वेष या स्वभावदोषांचा

वापर करून लोकांना स्वखुशीने आपले समर्थक कसे करता येते याचे एक उदाहरणच त्यामुळे जगाला पहायला मिळाले. आपल्या सुदैवाने सर्व दिशांनी नवे विचार येऊ द्या, असे उदारपणे सांगणाऱ्या भारतीय संस्कृतीची आपल्याला परंपरा लाभली आहे आणि तिचे स्मरण आपण सतत केले पाहिजे.

सार्वजनिक जीवनाविषयीच्या कुतूहलामुळे यात निर्माण झालेली अनेक मोठी माणसे मी आदराने पाहिली. त्यांना जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांचे निष्ठापूर्ण जीवन, सत्तेसारख्या मोहापासून किंवा सुखवस्तू जीवनापासून दूर राहण्याची त्यांची वृत्ती, एखाद्या ध्येयासाठी समर्पण वृत्तीने काम करीत राहण्याची त्यांची तयारी या सर्वांचा एक खोल परिणाम माझ्या मनावर झाला. या माणसांचे जीवन जाणून घेताना माझ्या मनात काही प्रश्न निर्माण होत. लोकशाही व्यवस्थेत आपल्याला सत्तास्थाने मिळणार नाहीत, हे माहीत असूनही लोकशाहीचा आग्रह काहींनी का धरला? स्वातंत्र्यानंतरसुद्धा समतेच्या लढ्यात संघर्षाचे खडतर जीवन काहींनी का स्वीकारले? आपल्या धर्मावरील अतूट श्रद्धेने देशापासून हजार मैल दूर येऊन प्रतिकूल परिस्थितीत आपले आयुष्यही प्रॉटेस्टन्ट मिशनऱ्यांनी का धोक्यात घातले? या प्रश्नांची उत्तरे देणारी कारणे स्वतंत्रपणे सांगता आली असती, परंतु मला या माणसांच्या व्यक्तित्वाचा शोधा घ्यावा म्हणजे त्यांच्या जीवननिष्ठा आपोआप स्पष्ट होतील, असे वाटले आणि मी त्यांची व्यक्तिचित्रे लिहिली.

ही व्यक्तिचित्रे त्या त्या माणसांचा शोध आहे तसाचा तो त्यांनी अंगीकारलेल्या विचारपरंपरेचाही शोध आहे, असे मला वाटले.

राजकारणात पुष्कळ वेळा सोयीचा इतिहासच आपण पुन:पुन्हा सांगतो. ज्या एकोणिसाव्या शतकाने आधुनिक महाराष्ट्राच्या वैचारिक जीवनाचा पाया रचला, त्या शतकात झालेल्या अनेक विचारवंतांच्या कामाला आपण विसरूनच गेलो आहोत; म्हणून मी 'तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ' लिहिले. सर्वसंगपरित्याग केलेल्या संन्याशाला स्वातंत्र्याच्या लढ्यात आपण उतरावे असे का वाटले याचा शोध घेण्यासाठी मी 'कर्मयोगी संन्यासी' लिहिले. धर्माच्या चौकटीत राहूनसुद्धा सुधारणांचा प्रयत्न कसा केला गेला याचा विचार करण्यासाठी मी गांधीजींपासून प्रेरणा घेणाऱ्या केवलानंद आणि तर्कतीर्थ या गुरुशिष्यांबद्दल लिहिले.

आज महाराष्ट्राची वैचारिक परंपरा फार क्षीण झाली आहे, अशी तक्रार आपण नेहमी करतो आणि









ती खरीही आहे. समाज जेव्हा जखडलेला असतो, त्याची प्रगती अशक्य झालेली असते किंवा पुढील मार्गक्रमणाबद्दल जेव्हा त्याच्या मनात संभ्रम असतो, अशा वेळी समाजाबद्दल विचार करणारे (ज्यांना आपण विचारवंत म्हणतो) नवे विचार मांडतात, विरोधाला धैर्याने तोंड देतात. आज समाजापुढचे प्रश्न संपलेत असे नाही, पण मग वैचारिक वाङ्मय कमी का झाले आहे? कोणाचेही नवे विचार ऐकण्याची इच्छाच आता समाजात उरलेली नाही का मिळालेल्या सुखासीनतेत किंवा आत्मसमाधानात तो एवढा गर्क आहे की त्याला नवा विचार करण्याची गरज वाटत नाही? की समाजाने आपल्या खऱ्या प्रश्नांचा विचारच करू नये, म्हणून अनेक भावनिक प्रश्न मुद्दाम निर्माण करून या वैचारिक प्रक्रियेला थांबवण्यात आले आहे? ज्यांनी समाजाला नवे आणि हितकारक विचार सांगितले त्या विचारवंतांचे लौकिक जीवन समृद्ध झाले नाही, परंतु त्यांच्याबद्दल समाजाच्या जाणत्या वर्गात अतीव आदर होता. आज असे का होत नाही? पूर्वी होऊन गेलेल्या थोर माणसांच्या तोलामोलाची माणसे प्रत्येक काळात निर्माण होत नसतात. समाजात जर खुले वैचारिक वातावरण आणि सहिष्णुता असेल तर नवेनवे विचारवंत निर्माण होण्याची प्रक्रिया मात्र चालू राहते.

समता हे मूल्य आपण मानले आहे. प्रत्येक माणसाला विचार करण्याचे व तो प्रकट करण्याचे स्वातंत्र्य आहे, हा समतामूल्याचाच एक भाग आहे. राज्यघटनेत तर ते आहे, पण ते आपल्या जीवनात हाडीमाशी रुजले पाहिजे. न आवडणारे विचारसुद्धा शांतपणे ऐकून घेतले गेले पाहिजेत. हिंसा किंवा दहशत यांमुळे ते विचार दडपून टाकण्याचा मोह होऊ नये असा स्वतंत्र विचारांचा आदर करणारा उदार समाज निर्माण व्हावा, ही इच्छा माझ्याप्रमाणेच तुम्हा सगळ्यांचीसुद्धा असणार. हा पुरस्कार या दिशेने काम करीत राहण्याची मला आठवण देणारा आहे, असे मी मानतो.

मित्रहो, मी आपला खूप खूप आभारी आहे.

**नरेन्द्र चपळगावकर**
*२६ मार्च २०२२*
९४२२७१२१२१

# सामाजिक कार्याचा झरा : प्रेमाताई पुरव

**रवींद्र ठिपसे**



राष्ट्रपती के. आर. नारायणन यांच्या हस्ते प्रेमाताई पुरव यांना 'पद्मश्री' प्रदान...

महाराष्ट्र फाउंडेशनचा (अमेरिका) 'समाजकार्य जीवन गौरव सन्मान २०२१' हा प्रतिष्ठेचा पुरस्कारप्राप्त करणारी महिला म्हणजे गोवामुक्ती संग्रामातील सर्वांत तरुण कार्यकर्ती प्रेमा तेंडुलकर होय. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांच्या लेकीने (डॉ. मेधा सामंत पुरव) सुरू केलेला 'अन्नपूर्णा परिवार' प्रेमाताईंच्या पुरस्काराचा सह-मानकरी आहे.

पद्मश्री प्रेमाताई पुरव यांचा जन्म भारताला स्वातंत्र्य मिळायच्या बारा वर्षे आधी, म्हणजेच १५ ऑगस्ट १९३५ रोजी गोव्यात झाला. प्रेमाताईंनी वयाच्या बाराव्या वर्षी आपला भाऊ काशिनाथ याच्यासोबत स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली. ब्रिटिशांचा मार खाल्ला, त्यांच्या बंदुकीतून सुटलेल्या गोळ्या पायावर झेलल्या. त्यामुळे त्यांचा एक पाय अधू झाला, मारामुळे एका कानाने कमी ऐकू येऊ लागले. कित्येक सहकारी डोळ्यादेखत मेलेले पाहिले तरी त्या डगमगल्या नाहीत. जंगलात लपतछपत, उपाशीपोटी दिवस काढले, स्फोटकांची वाहतूक केली.

गोवा मुक्ती आंदोलनातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तेव्हाचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी पोर्तुगीज राजवट संपुष्टात आणून गोवा मुक्त करण्यासाठी ठोस भूमिका घ्यावी हे सांगण्यासाठी दिल्लीत गेलेल्या शिष्टमंडळात प्रेमाताईंचा समावेश होता.

गोवा पोर्तुगीजांच्या जोखडातून मुक्त झाल्यानंतर प्रेमाताईंनी आपले सारे आयुष्य महिलांना उद्योगिनी बनवून त्यांचे आर्थिक सबलीकरण करण्याच्या कार्यात झोकून दिले. त्यांची जन्मभूमी गोवा आणि कर्मभूमी महाराष्ट्र राहिली. स्वातंत्र्य संग्रामात स्वत:चा पाय अधू झालेला असताना इतर महिलांना मात्र प्रेमाताईंनी स्वत:च्या पायावर उभे राहण्याची ताकद आणि आत्मविश्वास दिला. प्रेमाताई म्हणजे सामाजिक कार्य, महिलांचे शिक्षण, पर्यावरण रक्षणासाठी कटिबद्ध असणाऱ्या धडाडीच्या कार्यकर्त्या. समाजात महिलांना बरोबरीचे स्थान मिळाले पाहिजे यासाठी त्या आग्रही राहिल्या.

आर्थिकदृष्ट्या संपन्न महिलांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन त्यांनी बदलवण्याचा प्रयत्न केला. 'महिला कामगार चळवळीतील लढवय्यी कार्यकर्ती' अशी त्यांची ओळख आहे. महिलांसाठी सूक्ष्म कर्ज योजनेच्या (मायक्रो क्रेडिट स्कीम) जनकांपैकी त्या एक आहेत. आर्थिक आणि सामाजिक भेदभावाविरुद्ध तसेच अन्यायाविरुद्ध त्यांनी अनेक वेळा लढे उभारले. महिलांचे शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबन यामुळेच समाजात परिवर्तन घडून येऊ शकते यासाठी त्यांनी पाठपुरावा केला. महिलांसाठी झोकून देऊन कार्य करणाऱ्या मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, तारा रेड्डी, प्रमिला दंडवते इत्यादींच्या बरोबर 'महागाई प्रतिकार संयुक्त महिला समितीत' प्रेमाताईंनी झोकून देऊन काम केले. प्रेमाताईंचे खरे शिक्षण हे भिंतींच्या आत घेतलेल्या शिक्षणाच्या ऐवजी त्यांनी केलेल्या अनेक चळवळींतून भक्कम झाले आहे.

महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्या पाहिजेत यासाठी प्रेमाताईंनी सुरुवातीस काही महिलांना बरोबर घेऊन १९७५मध्ये 'अन्नपूर्णा महिला मंडळा'ची स्थापना केली आणि 'अन्नपूर्णा' सेवेद्वारा भाजीपोळी डबे पुरवायला सुरुवात केली. नोकरदार वर्गासाठी रुचकर, ताजे आणि माफक दरात जेवण उपलब्ध करून दिले. सध्याची 'हेल्दी फूड टिफिन सर्व्हिस' म्हणजे प्रेमाताईंच्या त्या उपक्रमाचा आधुनिक अवतार म्हणायला हरकत नाही. प्रेमा पुरव म्हणजे 'अन्नपूर्णा' हे एक समीकरणच बनून गेले. त्यामुळे त्यांचे नाव घेतले गेले की मुंबईतल्या हजारो चाकरमान्यांचा जेवणाचा प्रश्न सोडवणारी 'अन्नपूर्णा संस्था' नकळत डोळ्यासमोर येते. प्रेमाताईंची गोवा मुक्ती संग्रामातील भूमिका, पुरोगामी राजकारणातील त्यांचा वाटा, कामगार चळवळीतील त्यांचा सहभाग या गोष्टी मात्र लोकांच्या थोड्या विस्मरणात गेल्या. त्यांना नव्याने उजाळा देण्यासाठी हा 'जीवन गौरव पुरस्कार' महाराष्ट्र फाउंडेशन देत आहे.

अशिक्षित आणि परित्यक्ता महिला व मुले यांच्यातील कौशल्य ओळखून त्यांचे सबलीकरण करण्याच्या उद्देशाने त्यांनी १९७५मध्ये महिलाकेन्द्रित 'अन्नपूर्णा महिला मंडळा'ची स्थापना केली. प्रत्येक गरीब महिलेच्या चेहऱ्यावर हास्य आणि महिलांचे आर्थिक स्वावलंबन हे ध्येय त्यांनी उराशी बाळगले. १९८२मध्ये गिरणी कामगारांच्या अभूतपूर्व संपानंतर मुंबईतील गिरण्या बंद पडल्या. तेव्हा कामगारांच्या घरातील स्त्रियांना खाणावळ चालवण्यासाठीचे स्वयंपाकशास्त्राचे धडे द्यायला त्या पुढे सरसावल्या. त्याचप्रमाणे त्यांचे पदार्थ बँका, शाळा, महाविद्यालये, रुग्णालये अशा ठिकाणी विकले जावेत म्हणून त्यांनी योग्य ते विक्री व्यवस्थापनही केले. पुढे 'अन्नपूर्णा महिला मंडळ' खाद्यपदार्थांसाठीच प्रसिद्ध झाले.

अन्नपूर्णा महिला मंडळाच्या माध्यमातून प्रेमाताई पुरव यांनी निराधार महिलांना आणि त्यांच्या



मुलींना शिक्षण देऊन आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवले. 'अन्नपूर्णा महिला मंडळा'त सहभागी होणाऱ्या प्रत्येकास प्रेमाताईंची महिला सबलीकरणाची तळमळ आणि सामाजिक बांधिलकी जाणवत असते.

'अन्नपूर्णा' महिलांना सुरुवातीला महात्मा जोतिबा फुले आणि क्रान्तिज्योती सावित्रीबाई फुले यांना स्मरून शपथ घ्यावी लागते. या शपथेचा आशय असा आहे -

- महिला आणि मुलीच्या सबलीकरणास प्रोत्साहन.
- 'हुंडा देणार नाही आणि घेणारही नाही' हा निश्चय.
- लिंगनिदान करून स्त्रीलिंगी गर्भसमापन करणार नाही, ही प्रतिज्ञा.
- महिलांवरील सामाजिक अथवा कौटुंबिक हिंसा सहन करणार नाही, हा खंबीर दृढनिश्चय.
- मुलींना शिक्षण देऊन त्यांना त्यांच्या पायावर उभं करीन, हे आश्वासन.
- महिलांच्या आणि मुलींच्या आरोग्याची काळजी.

प्रेमाताईंनी स्थापन केलेल्या 'अन्नपूर्णा महिला सहकारी सोसायटी मर्यादित' या सोसायटीमार्फत स्वयंरोजगारासाठी गरजू महिलांना आणि पुरुषांना संयुक्त जबाबदारीवर विनातारण कर्ज उपलब्ध करून दिले जाते. तसेच छोटा व्यवसाय, शिक्षण, घर दुरुस्ती, जुने कर्ज फेडणे यासाठी सूक्ष्म कर्ज (मायक्रो फायनान्स लोन) दिले जाते. आर्थिक साक्षरतेचे वर्ग घेतले जातात. 'महिला प्रामाणिकपणे कर्ज फेडतात' असा प्रेमाताईंचा अनुभव आहे. या उपक्रमात १०० टक्के कर्जवसुली साधलेली आहे.

अन्नपूर्णा महिला मंडळाने २०१६मध्ये 'अन्नपूर्णा परिवार विकास संवर्धन' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी 'आधारपूर्ण' हा उपक्रम सुरू केला. या उपक्रमाद्वारे महिलांना विम्याची जरुरी आणि विमा व्यवसायाची ओळख करून देण्यात आली. मृत्यू, अपघात, शारीरिक हानी यांवर मात करून पुढे

जाण्यासाठी विमा सुरू केला. दिवसभर घराबाहेर राहून काम करणाऱ्या झोपडवस्तीतील महिलांच्या लहान मुलांची काळजी घेण्यासाठी 'वात्सल्यपूर्ण सेवा सहकारी सोसायटी' हे केंद्र चालवले जाते. या केंद्रामुळे महिला स्वत:च्या पायावर उभ्या राहण्यासाठी मुलांना केंद्रात सोडून कामासाठी बिनधास्त घराबाहेर पडू शकतात.

गेल्या दोन दशकांहून अधिक काळ प्रेमाताईंची ज्येष्ठ कन्या डॉ. मेधा सामंत-पुरव 'अन्नपूर्णा परिवारा'तील सहा सहयोगी संस्थेची धुरा सांभाळत आहेत. त्यासाठी त्यांनी 'बँक ऑफ इंडिया'तील आपली सुखासीन नोकरी सोडून दिली. मेधाताईंचे मुंबईतील बालपण पुरोगामी वर्तुळात गेले. दहावीचा अभ्यास सांभाळून हिशोब लिहिणे, वर्गणीच्या पावत्या बनविणे अशी मदत त्या आईला करत असत. स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्या प्रेमाताई पुरव यांच्या दिवंगत पतींना, म्हणजेच नरेंद्र (दादा) पुरव यांना सामान्य नागरिकांसाठी देशाच्या स्वातंत्र्याबरोबरच आर्थिक स्वातंत्र्यदेखील महत्त्वाचे आहे, हे लक्षात आल्यानंतर त्यांनी बँकेच्या कर्मचाऱ्यांना एकत्र आणून, 'ऑल इंडिया बँक एम्प्लॉयी असोसिएशन'ची स्थापना केली. सर्वसामान्य जनतेच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी प्रयत्न सुरू केले. प्रेमाताई आणि दादा पुरव यांच्यापासून प्रेरणा घेऊन मेधाताई त्या दोघांचे कार्य आई-वडिलांच्या जवळच्या सहकाऱ्यांच्या आणि इतर तज्ज्ञांच्या सहकार्यानं नेटानं पुढे नेत आहेत. 'बँकेत होणारे घोटाळे जरी बँकांसाठी घातक ठरत असतील तरी यासाठी सरकारने त्यांचे खासगीकरण करणे हा उपाय नाही, तर मोठ्या उद्योजकांनी बुडवलेले पैसे त्यांच्याकडून वसूल करणे आणि बँका जास्त लोकाभिमुख करणे हा आहे', अशा मौलिक विचारांचा प्रसार करत असलेल्या दादा पुरव यांच्या ज्येष्ठ कामगार मित्रांचे मार्गदर्शन त्यांना कायम लाभत गेले आहे.

दादा पुरव सातत्याने कष्टकरी स्त्रियांच्या आर्थिक शोषण व सक्षमीकरणाबद्दल बोलत असत. १९६९ ला भारतातील बँका राष्ट्रीयीकृत झाल्या तेव्हा बँकिंग सेवा खेडोपाडी, सर्वसामान्यांपर्यंत पोचल्या पाहिजेत हा त्यामागील उद्देश होता. अशा चर्चा कानावर पडत पडत मेधाताई लहानाच्या मोठ्या झाल्या. म्हणूनच पुढे जाऊन त्यांनी 'अन्नपूर्णा लघुवित्त'ची मुहूर्तमेढ पुण्यात रोवली. आपल्या आईच्या विचाराला नवीन आर्थिक संकल्पांची जोड देऊन कामाची व्याप्ती वाढवली. 'अन्नपूर्णा परिवार'तर्फे कष्टकरी स्त्रियांच्या मुलांना सांभाळण्याच्या प्रश्नापासून ते आकस्मिक आजारपणं, घरातल्या मुख्य व्यक्तीचे निधन अशा अनेक संकटप्रसंगांमध्ये तसेच इतर अनेक आघाड्यांवरही मदत केली जाते. सध्या 'अन्नपूर्णा महिला क्रेडिट को ऑप. सोसायटी' या संस्थेचे काम पुण्यातील ६०० झोपडपट्ट्यांत तर मुंबईतील ५०० झोपडपट्ट्यांमध्ये जोमाने चालू आहे.

अन्नपूर्णा परिवारातील सर्व प्रकल्पांचे नेतृत्व सहभागी महिलांकडेच राहील याकडे संस्था काटेकोरपणे लक्ष देत आहे. एकल मातेच्या मुलांना शिक्षण घेऊन भविष्य घडविता यावे यासाठी 'विद्यापूर्ण प्रकल्प' सुरू करून त्यामार्फत होतकरू मुलांना शिष्यवृत्ती दिली जाते. 'अन्नपूर्णा महिला मंडळा'चे सहसंस्थापक असलेल्या दादा पुरव यांच्या स्मरणार्थ 'दादा पुरव संशोधन आणि प्रशिक्षण संस्था' ही संस्था जन्माला आली. या संस्थेत 'मायक्रो फायनान्स' आणि 'मायक्रो इन्श्युरन्स' या विषयांत संशोधन केले जाते, विद्यार्थ्यांना त्यातील प्रशिक्षण दिले जाते. त्यांच्यासाठी विशेष अभ्यासक्रम आखले जातात, प्रकाशने आणि माहिती प्रसारण या स्वरूपाचे कार्यही केले जाते.

प्रेमाताईंच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना २००२मध्ये तत्कालीन राष्ट्रपतींच्या हस्ते 'पद्मश्री' सन्मान देऊन गौरविले. 'अखिल भारतीय महिला शिक्षण निधी संस्थे'ने (AIWEFA) २००२मध्ये त्यांचा 'स्त्री रत्न' पुरस्कार देऊन गौरव केला. प्रेमाताई सध्या ८६ वर्षांच्या असल्यामुळे वयोमानानुसार येणाऱ्या काही शारीरिक तक्रारी येऊ लागल्या आहेत. प्रेमाताईंच्या आणि अन्नपूर्णा परिवाराच्या आजवर केलेल्या महिलांविषयक सामाजिक कार्याला मनापासून सलाम आणि प्रेमाताईंना आरोग्यसंपन्न आणि आनंददायी आयुष्य लाभो, यासाठी सदिच्छा.

रवींद्र ठिपसे
९५२७२३४४११

# पिच्चर अभी बाकी है दोस! : संतोष शिंत्रे

**सलील वाघ**



संतोष आम्हाला थोडा सिनिअर. 'कट्टा' नावाच्या तत्कालीन 'संशोधन-पत्रिकेच्या' वाचकोत्तमांपैकी एक. १९८४-८५च्या सुमाराला, म्हणजे संतोषच्या खांद्यावर हात टाकायचा अधिकार प्राप्त व्हायच्या आधीच त्याच्या खांद्यावर हात टाकायला लागलो ते त्याच्या दिलेरीमुळे. तेव्हापासून, गेल्या तीनहून अधिक दशकांत एकमेकांविषयीच्या कुतूहलयुक्त आणि अचंबायुक्त जिव्हाळ्याला आणि मैत्रीला खंड नाही. तोडही नाही. याचं रहस्य (खरं तर श्रेय) एकमेकांच्या वांडपणाविषयी एकमेकांना असलेल्या नितांत आणि नि:संकोच आदरभावातही आहे. इतकी वर्षं, वर्षानुवर्षं आम्ही अनेकदा नियमित, कधी अनियमित भेटलो, बोललो. मधेमधे कुठेकुठे पुण्याबाहेर उधळलो. कामात आणि धामात अडकलो. त्यामुळे त्यात तात्पुरते खंडही पडले. पण परत भेटत गेलो तेव्हा जाणवणारही नाही इतक्या 'मागील पानावरून पुढे' पद्धतीने सहजपणे बोलत राहिलो. टिपिकल सांस्कृतिकगिरी आणि पांढरपेशे कार्यक्रम टाळून अनंत अतरंगी ठिकाणी भेटत कमालीच्या वेगळ्यावेगळ्या आणि भलत्याभलत्याही विषयांवर कल्पनातीत गांभीर्याने आम्ही चर्चा करत राहिलो. आपल्याला मराठीत काय मोलाची भर घालायची आहे किंवा जगाचं काय एकंदरीत भलं करून टाकायचं आहे असल्या चिंता अजिबात न वाहता

जगत्या जगण्याला जमेल तशा धडका देत राहिलो. तेच आपसात बोलतही राह्यलो. एकमेकांचे सल्ले घेतले, प्रशंसा केली, एकमेकांना येड्यातही काढलं, डोळ्यात पाणी येईपर्यंत हसलो. यात, कधीतरी एकाच दगडावर ठेचकाळून जखमी होण्याचे प्रसंगही आले पण त्यातूनही हातावरचं बोटावर निभावत सहीसलामत बाहेर पडलो. एकमेकांच्या मदतीने बचावलो.

संतोषला हा पुरस्कार मिळणं हे फार वरवरचं निमित्त. त्याच्याविषयी बोलावं तितकं थोडं, इतकं अफाट काम त्याच्या हातात आहे. आठवणी थोड्या मागेपुढे होत जातात या सगळ्याबद्दल बोलताना. वृत्तपत्रांच्या कथालेखन स्पर्धा हा खरं तर पुण्यात चेष्टेचा विषय. पण खूप वर्षांपूर्वी संतोषने त्यात भाग घेतल्याने आणि वर पुन्हा प्रथम पारितोषिक मिळाल्याने आम्हा लोकांना त्यातलं गांभीर्य लक्षात आलं. नंतर संतोषलाही ते लक्षात आलं असावं. पर्यावरण-पत्रकारिता हा मराठीतला खास दुर्लक्षित प्रांत. एक सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ म्हणून कारकिर्दीला सुरवात केलेल्या आणि पर्यावरणाच्या अभ्यासाची कृतिशील पॅशन ह्यातच आपल्या जगण्याचा मक्सद सापडलेल्या माणसाच्या आयुष्याची तार्किक परिणती ही पर्यावरण-पत्रकारितेत व्हावी यात काहीही नवल नाही. मात्र त्याच वाटेवर पुढे चालत त्या विषयवस्तूंचा कथात्म (फिक्शनीय) आविष्कार पर्यावरण-कथांमध्ये व्हावा आणि मराठीत विज्ञानकथांप्रमाणे (सायन्स-फिक्शन), पर्यावरणकथा (एनव्हॉयरमेंटल फिक्शन) हा एक अनोखा जॉनर त्याच्या लिखाणाने सुरू व्हावा हे नवलाचे आणि तितकेच आनंदाचेही आहे.

ठरवलं असतं तर, आमचे अनेक वर्गमित्रं किंवा समकालीन जसे संशोधनात किंवा नोकरी व्यवसायात गुंग होत कालांतराने ह्या देशातून काढता पाय घेते झाले (आणि नंतर इथल्या रयतेचे अनिवासी उंटावरून अतिनिवासी प्रबोधन करते झाले!) तसं करणं संतोषला जराही अशक्य नव्हतं. पण सर्जकतेचा रेटा असा असतो की तो माणसाला स्थितिशील बनू देत नाही. त्यामुळे तसं अघटित काही घडलं नाही. पण दुसरीकडे, नुसती सर्जकता कामाची नसते, एकांगी सर्जकतेने माणूस निव्वळ उग्र कलावादी आणि बेजबाबदार बनतो. नैतिक जबाबदारीची टोचणी असेल तर सामाजिक-राजकीय


















गोष्टींकडे बघताना माणसाला डोळसपणा असतो. अशा माणसाला कोणताही पक्ष किंवा विचारसरणी घोळात घेऊन येडा बनवू शकत नाही. तो स्वत:च्या नजरेने जग बघतो, दुसऱ्यालाही दाखवतो. पर्यावरण विषयातल्या अनेक सरकारी निर्णयांचे आणि धोरणांचे अभ्यासपूर्ण आकडेवारीनिशी वाभाडे काढणारे संतोषचे चिकित्सक पण संतुलित लेख ह्या नैतिक जाणिवेचाच आविष्कार आहेत. वर्तमानपत्रातल्या लिखाणाचे आयुष्य जेमतेम एक दिवसाचे असते पण काही लेखक आपल्या लेखनामुळे त्या दिवसाच्या आवृत्तीला संदर्भसामग्रीच्या उंचीवर नेऊन ठेवतात. संतोषचे अनेक संदर्भसंपृक्त लेख हे असे भारतीय पर्यावरण-पत्रकारितेच्या वर्तुळात संदर्भमूल्य म्हणून मान्यता पावलेले आहेत. पर्यावरणवादी माणूस हा पिंडधर्माने आपोआपच सचोटीचा लोकशाहीवादीही असतो कारण लोकशाहीचा तत्त्वज्ञानात्मक मूलाधार हा जीवविविधतेत किंवा जैविक वैविध्यात आहे. मामुलीतल्या मामुली जीवाला/ जीवनालाही मौलिक मानून व्यवस्थेने चालावं, जगातला प्रत्येक जीव हा निजगुणविशिष्ट आणि जीवनाधिकार असलेला असा स्पंद आहे आणि त्या प्रत्येक स्पंदाला त्याच्या वैशिष्ट्यांसकट अस्तित्वाचा आणि अस्तित्वविस्ताराचा अधिकार आहे, हे बायोडायव्हर्सिटीचे मूळ तत्त्वज्ञान. ते मानवी व्यवहारांनाही लागू होतं. मानवी भाषाव्यवहारालाही हे लागू होतं. भाषिक लोकशाहीच्या अस्तित्वासाठी छोट्यातली छोटी भाषाही तिच्या फुलोऱ्यासकट टिकली पाहिजे. प्रत्येक भाषेचे स्वत:चे असे अनन्यसाधारण अवकाश असतात, स्वर, व्यंजनादी मूलघटकांची आंतरसंबंधयुक्त वैशिष्ट्यपूर्ण रचना असते आणि परंपरेने सिद्ध झालेली आविष्कारप्रकृती असते. त्या सगळ्या संचिताचं तिच्या वैविध्यांसह जतन होणं म्हणजेच लोकशाही. एखादी गुंड भाषा अनैसर्गिकरीत्या राष्ट्रीय वगैरे ठरवून तिचा रोडरोलर (अडाण्याचा गाडा) अन्य भाषांवर फिरवून त्या भुईसपाट करणं हे जेसीबी लावून, माफियांच्या मदतीने केलेल्या अवैध खाणकामाइतकंच अनैतिक आणि लोकशाहीविरोधी असतं. संतोष शिंत्रे आणि त्याच्या पर्यावरणकर्मी सहप्रवाशांकडे हे सर्व जाणणारा डोळसपणा असतोच आणि त्यांच्या कृतिशीलतेतूनही तो वेळोवेळी व्यक्त होतो. जीववैविध्य- पर्यावरणवाद- लोकशाही ही एकमेकांत स्वाभाविकपणे गुंफलेल्या संकल्पनांची साखळी आहे. संतोषने वेळोवेळी मांडलेल्या भूमिकांमधून आणि ललित लेखनातूनही पर्यावरणवाद-जैविक वैविध्यतावादाची ही एकात्मिक जाणीव ठाशीवपणे दिसून येते. इंडिया ग्रीन्स पार्टीतला त्याचा सक्रिय

## वाङ्मयप्रकार पुरस्कार टिपण
## संतोष शिंत्रे
## पर्यावरण-केंद्रित साहित्य

संतोष शिंत्रे या लेखकाला 'पर्यावरण-पत्रकारिता आणि तत्संबद्ध विविध साहित्यप्रकार-लेखन' यासाठी हा पुरस्कार सन्मानपूर्वक द्यायलाच हवा.

सध्याच्या काळात पर्यावरणातील अनेक प्रश्न ऐरणीवर आल्यामुळे त्यासाठीची जनजागृती करणे याला पर्याय नाहीच. या सर्वंकष विषयाचे महत्त्व सर्व अंगांनी जाणून घेऊन, साहित्यातील विविध प्रकार माध्यम म्हणून समर्थपणे वापरून अतिशय जाणीवपूर्वक तो विषय सतत समाजोन्मुख करण्यामध्ये संतोष शिंत्रे यांचे काम मला सर्वाधिक महत्त्वाचे म्हणून निश्चित पुरस्कारार्ह वाटते.

कथा किंवा कविता या एकाच साहित्यप्रकाराची कास धरून अनेक वर्षे निर्मिती करणारे बाकीचे दोघेजण जरी आघाडीचे लेखक म्हणून मान्यता पावलेले असले, आणि मलादेखील त्यांचे साहित्य वाचायला त्या त्या वेळी वेगवेगळ्या कारणांनी कौतुकास्पद वाटले असले, तरी महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार लाभण्यासाठी जे निकष आहेत, त्या संदर्भात या त्रयीपैकी संतोष शिंत्रे यांच्या साहित्यातील अजोड आणि भरीव योगदानाची दखल आपण वेळेवर घेतलीच पाहिजे.

'अरण्यरुदन' आणि 'तरंग-अंतरंग' यांतील भारतीय निसर्ग-संबद्ध गंभीर समस्यांचा ऊहापोह जसा नि:संशय महत्त्वाचा आहे, तसेच मनेर मानुषेर इंद्रजाल आणि गुलाबी सिर - या दोन्ही कथासंग्रहांतील संतोष शिंत्रे यांच्या कथा निव्वळ कथा-साहित्यातदेखील अव्वल दर्जेदार आहेत. त्यामुळे, केवळ पत्रकारिताच नव्हे, तर सांगोपांग अभ्यास करून सतत सर्व प्रकारचे पर्यावरण-संबद्ध समाजोन्मुख आणि परिणामकारक लेखन यासाठी संतोष शिंत्रे यांची निवड आम्ही करीत आहोत.

**विद्युल्लेखा अकलूजकर**
(साहित्य पुरस्कार निवड समिती, अमेरिका, यांच्या वतीने)
+1(778)953-5346

सहभाग हे त्या बांधिलकीच्या भावनेचे राजकीय पर्यवसान!

संतोषचं काम अनेक क्षेत्रांना स्पर्श करणारं आहे. वैज्ञानिकांना संशोधन-लेखनासाठी मार्गदर्शन करणाऱ्या आज्ञावलीपासून ते पत्रकार मित्रांना दैनंदिन लेखनासाठी चटकन हाताशी असावा अशा लेखनमित्र सारख्या लेखनकोशापर्यंत; शेल सिल्व्हरस्टाईनच्या भन्नाट कवितांपासून ते ‘राजा शिवछत्रपती’, ‘छत्रपतींचे आरमार’, ‘सरिता कोश’ आदींच्या अनुवादकामापर्यंत; चालू शतकातले जागतिक व भारतीय निसर्ग पर्यावरण यांसारख्या माहितीपूर्ण ग्रंथांपासून ते ‘पिंक हेडेड डक’ किंवा ‘मनेर मानुषेर इंद्रजाल’सारख्या पुस्तकाच्या रूपाने वाचकाभिमुख कथनसाहित्यापर्यंत त्याचा संचार आणि आवाका आहे. ‘इन्स्टिट्यूट ऑफ पावटालॉजी’ ही कथा तर शिक्षणमाफियांनी ओरबाडलेल्या समाजाच्या व्यंगविश्वरूपदर्शनाची अतिशय भेदक मांडणी आहे. स्वातंत्र्योत्तर काळात पाटील-वतनदारांच्या नवमोगलाईत साखर कारखानदारीच्या जोडीनं महाराष्ट्रात शिक्षण कारखानदारी बोकाळली आणि मूल्याधारित ध्येयवादी शिक्षणाच्या ज्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या, त्याची धग ह्या लेखनात अचूक पकडली आहे.

अर्थात आता ह्या सगळ्या गोष्टींनाही काळ उलटला आहे. आता पावट्यांची जागा नवपावट्यांनी घेतली आहे, नागरिकांची नवनागरिकांनी आणि नालायकांची नवनालायकांनी घेतली आहे. सगळ्या मूल्यांची पुनर्रचना होण्याचा, होत्याचं नव्हतं आणि नव्हत्याचं होतं होण्याचा हा काळ आहे. सगळं काही घरंगळत जाण्याचा हा काळ. ह्या अपलापकाळाला त्याच्यातला पर्यावरणकर्मी, ललितलेखनातून आणि विश्लेषणात्मक मांडणीमधून व्यक्त होणारा तो भविष्यात कसा सामोरा जातोय याविषयी मला जाम उत्कंठा आहे. हा तर नुसता एक इंटरव्हल आहे. पिच्चर अभी बाकी है - दोस!

सलील वाघ
९४२२५११२३८

व्हिडिओवरील भाषण...

# सही आपुली ठोकून जा...



मी संतोष शिंत्रे. लेखक आणि पर्यावरण पत्रकार. पुण्यात राहतो. 'ग्रे सेल्स' ही माझी कंटेण्ट क्रिएशन कंपनी. आजवर मी केलेलं पर्यावरणविषयक लेखन भारतातील आणि अमेरिकेतील निवड समित्यांना पुरस्कारासाठी योग्य वाटलं, हा आनंद मोठा आहे. निवड समितीतीतल सदस्यांचा मी ऋणी आहे.

गेली बावीस वर्षं मी लिहीत आहे. बावीस वर्षांच्या आपल्या कामाकडे कुणाचं लक्ष जातं आहे की नाही, की आपण एकटेच अरण्यरुदन करतो आहोत असं मधूनच वाटून जायचं. हे वाटणं ह्या पुरस्कारामुळे कायमचं संपलं. नवा हुरूप, नवा उत्साह आला.

तीस भाषांमध्ये भाषांतरित झालेला एक वैश्विक कवी आहे - शेल सिल्वरस्टाईन. मी त्याच्या कवितांचा स्वैर मराठी अनुवाद केलेला आहे. त्यातली एक कविता मी इथं उद्धृत करतो. पर्यावरण-लेखन-पत्रकारितेची अनवट वाट मी का निवडली?

*कॅनव्हासवर मार चार फराटे,*
*उमटव काही अद्भुत रेषा*
*अथवा कर तू काही कविता,*
*अलग, वेगळ्या, फक्कड ऐशा*
*लाव जरासा सूर स्वत:चा*
*गाऊन घे तू आपले गाणे,*
*तना-मनाने धुंद नृत्य कर*
*थांबव सत्वर ते रडगाणे*
*येडपट परी ते असेल अस्सल*
*असे काही तरी निर्मून जा,*
*अथांग पडद्यावर काळाच्या*
*सही आपुली ठोकून जा...*

आणि हाच खटाटोप मी गेली बावीस वर्षं करत राहिलो आहे. कारण फक्त हेच-की भारतीय निसर्ग-पर्यावरणातली आर्थिक, सामाजिक आणि राजकीय गुंतागुंत लोकांना समजावी. भारतातील मानवेतर प्रजाती आज भारतातील भूभागाच्या ५.०२% इतक्या कमी क्षेत्रफळावर, म्हणजे संरक्षित प्रदेशात कशी तरी तग धरून आहेत.

नैसर्गिक मूलस्रोत – म्हणजे नद्या, डोंगर, माती, पाणी, समुद्रकिनारे सरकारच्या भांडवली विकासोन्मादात अपरिवर्तनीयरीत्या संपत चालले आहेत. सर्वांत कमी उत्पन्न असणारी आणि कार्बन उत्सर्जने सर्वांत कमी असलेली भारताची लोकसंख्या आहे ९०%. पण दहा टक्के अतिश्रीमंत धनदांडग्यांनी केलेल्या उत्सर्जनांचे चटके तिलाच सर्वाधिक सोसावे लागत आहेत. काही कोटी भारतीयांना सामाजिक आणि पर्यावरणीय न्याय नाकारला जातो आहे. लक्षावधी लोक आंधळ्या विकासापायी विस्थापित होत आहेत. कैक वन-क्षेत्रपाल, वन मजूर कर्तव्य निभावताना शहीद होत आहेत.

ह्या सर्वांविरुद्ध पर्यावरण पत्रकार म्हणून मी यथाशक्ती आवाज उठवत आलो आहे, माझ्या सर्व प्रकारच्या लेखनातून. माझ्या ललित लेखनातही हा धागा कुठेतरी उमटत राहतोच. आता 'निसर्ग-पर्यावरण' हा फक्त निसर्ग सौंदर्य वर्णन करण्याचा विषय उरलेला नाही.

शासकीय धोरणं, विकासाची प्रतिमानं, केंद्राचे विनाशकारी निर्णय; अर्थसंकल्पातील निसर्ग-पर्यावरणासाठीच्या अत्यंत किरकोळ तरतुदी; वन्यजीव तस्करीची जगभर अब्जावधी डॉलर्समध्ये पोचलेली गुन्हेगारी; जंगलं, शेती आणि मासेमारी ह्यांचा पारंपरिक जीडीपी मधला असणारा फक्त १७ टक्के वाटा, पण ह्याच गोष्टी देशातील ३५.२ कोटी जनतेला त्यांच्या जीवनमानातील ४७% सेवा पुरवून जीवनदायी ठरतात.

निव्वळ एक गिधाड आपल्या आयुष्यक्रमात, सफाई कामगाराच्या आठ लाख पंचाण्णव हजार रुपये इतक्या वेतनाइतकी सफाई करतं, तर एकूण जैविक विविधतेचं आर्थिक मूल्यमापन किती होईल? आपल्या एकूण जीडीपीच्या ६% नुकसान पर्यावरणीय हानीमुळे होते आहे. भारतातल्या वार्षिक बाल मृत्यूंपैकी २३% पर्यावरणीय कारणांमुळे होतात. मराठी वाचकांपर्यंत ह्यातले कोणतेच विषय पोचतच नव्हते. मी हे विषय मांडायला सुरुवात केली. यांतले कित्येक विषय मराठीत अजूनही मी












एकटाच मांडत राहिलो आहे, हे दुर्दैव.

आणखी एक दुष्टचक्र भेदण्याचा मी प्रयत्न केला.

भारतातील ८०% जनतेला निसर्ग-पर्यावरणाचे प्रश्न कळतात, ते मुद्रित माध्यमांद्वारा.

भारतीय मुद्रित माध्यमांमध्ये या प्रश्नांचं स्थान एकूण बातम्यांच्या फक्त १.५% इतकं अत्यल्प आहे. गेल्या काही वर्षांत ०.२% इत्यादी सुधारणा झाली असेल.

दृक-श्राव्य माध्यमांमध्ये तर ते एकूण बातम्यांच्या ०.०३५% इतकं कमी असतं.

परिणामत: या धगधगत्या प्रश्नांबद्दल सार्वजनिक स्तरावर विलक्षण औदासीन्य, अज्ञान आणि निष्क्रियता साकळली आहे. कोणीही राजकारणी लोकमताचा दबाव आल्याशिवाय एखाद्या विषयाला हात घालत नाही. वार्तांकनच न झाल्याने, लोकमानसात हे प्रश्न मतप्रभावी (इलेक्टोरल मेरीट असणारे)च ठरत नाहीत.

मग राजकारणी लोकांच्या अग्रक्रमांमध्ये त्यांच्या सोडवणुकीला शून्य महत्त्व दिलं जातं. मी हे दुष्टचक्र माझ्या परीनं भेदण्याचा प्रयत्न करत असतो.

यातली निदान पत्रकारांसाठी संसाधन नसणं ही उणीव नाहीशी करण्याचा मी माझ्या पर्यावरण पत्रकारितेवरील इंग्रजी आणि मराठी पुस्तकांद्वारा प्रयत्न केला.

आज अनेक पत्रकार इंग्रजी आणि मराठीत ते संदर्भ म्हणून वापरत आहेत हे समाधान आहे. हवामानबदल, ध्वनी-प्रदूषण, वन्य जीव संरक्षण ह्या विषयांना वाहिलेली मराठीतली पहिलीवहिली पुस्तकं लिहिता आली हेही समाधान आहे.

पुढच्या काळात पर्यावरण प्रश्न मतप्रभावी होण्यासाठी हरित राजकारणाद्वारे प्रयत्न करण्याची सुरुवात कशी होईल हे पाहायचं आहे. पर्यावरण पत्रकारांसाठी मराठीत काही प्रशिक्षणाची व्यवस्था करण्याची इच्छा आहे, आणि थेट शोध पत्रकारिता करण्याचीही इच्छा आहे.

पत्रकार पितामह जोसेफ पुलित्झरने सांगितलेला पथदर्शी मंत्र लक्षात ठेवूनच ही कामं करायची आहेत.

*Put it before them, so they will read it*
*Clearly, so they will appreciate it*
*Picturesquely, so they will remember it, and*
*Above all, accurately*
*So, as to be guided by its light.*

महाराष्ट्र फाउंडेशनला धन्यवाद आणि शुभेच्छा.

**संतोष शिंत्रे**
९८२२०१२९४८

# अंशुल छत्रपतींना पुरोगामी महाराष्ट्राचा मानाचा मुजरा!

मुलाखत : **राहुल थोरात**



डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी आयुष्यभर बुवाबाबांच्या विरोधात सनदशीर मार्गाने लढा दिला. या लढाईत त्यांना आपले प्राण गमवावे लागले. तसाच लढा हरियाना राज्यातील सिरसा या गावचे एक निर्भीड पत्रकार रामचंद्र छत्रपती यांनी २० वर्षांपूर्वी सुरू केला होता. महाबलाढ्य बाबा रामरहीम याची आणि त्याच्या 'डेरा सच्चा सौदा'मधील कृष्णकृत्ये ते आपल्या दैनिकातून प्रसिद्ध करत असत. एक प्रकारे ते डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचेच कार्य करत होते. या लढाईत त्यांनाही डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या सारखीच प्राणाची आहुती द्यावी लागली. रामचंद्र छत्रपतींच्या खुनाचा अत्यंत जिद्दीने सलग सतरा वर्षे पाठपुरावा करून बाबा रामरहीमला जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्याला कारणीभूत ठरला त्यांचा सुपुत्र अंशुल छत्रपती! 'संविधान मूल्यांवर अपार विश्वास असल्यामुळेच बाबा रामरहीम विरोधातील लढाई जिंकू शकलो!' असे अंशुल छत्रपती म्हणतात. या निर्भीड तरुणाच्या बुवाबाजी विरोधी संघर्षाला डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या नावाचा पुरस्कार 'महाराष्ट्र फाउंडेशन' देत आहे हे अगदी उचित आहे. अंशुल छत्रपतीच्या संघर्षाला महाराष्ट्रातील पुरोगामी जनतेने केलेला मानाचा मुजराच म्हणता येईल.

समाजसुधारणेचे काम किती कष्टप्रद असते, हे सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,

''समाजाकडून होणाऱ्या छळाचे स्वरूप, तुरुंगातल्या हालांपेक्षा अधिक व्यापक असते. राज्यकर्त्यांविरुद्ध चळवळ करणाऱ्या देशभक्तांच्या वाट्याला कीर्ती येते. समाज सुधारकाला मात्र निंदा, अपमान, धिक्कार अशा छळाचे धनी व्हावे लागते आणि त्यासाठी लागणारे धैर्य तुरुंगात जाणाऱ्यांच्या धैर्यापेक्षा जास्त कणखर असावे लागते.'' आजच्या काळात पुरोगामी विचार मांडणाऱ्यांना समाज माध्यमातल्या ट्रोलधाडीकडून जी गलिच्छ शिवीगाळ वाट्याला येते ती पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकर जे म्हणतात, त्याचे महत्त्व विशेषत्वाने ध्यानात येते.

एकतर समाजात प्रागतिक विचारांची माणसे अल्प असतात आणि या कारणांमुळे उघडपणे भूमिका घेणारी, लढणारी माणसे त्याहून अल्प असतात. या धैर्यवान अत्यल्प माणसांमध्ये हरियाना राज्यातील 'दैनिक पुरा सच'चे संपादक शहीद रामचंद्र छत्रपती आणि त्यांचे चिरंजीव अंशुल छत्रपती यांचा उल्लेख आवर्जून करावा लागेल.

अंशुल छत्रपती यांच्याशी अंधश्रद्धा निर्मूलन मासिकाचे संपादक राहुल थोरात यांनी साधलेल्या संवादातून त्यांचा संघर्ष आपण जाणून घेऊयात.

राहुल थोरात : आपण ज्या मूल्यांचा उच्चार करतो, ती मूल्ये जगणाऱ्या अंशुल छत्रपतींसोबत बोलण्याची संधी मिळाली, यांचा आनंद वाटतो. आपल्या जवळच्या व्यक्तीला गमावण्याचे दु:ख आम्ही समजू शकतो. जेव्हा व्यवस्था, पोलीस यंत्रणा सहकार्य करण्याऐवजी त्रास देतात, तेव्हा लढाई लढणे किती अवघड असते, हे 'अंनिस'चा प्रत्येक कार्यकर्ता डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खून प्रकरणात जाणतो आहे. आज डॉ. नरेंद्र दाभोलकरांची हत्या होऊन आठ वर्षे झालीत, त्यांचे केवळ संशयित मारेकरी पकडले गेलेत; मात्र मुख्य सूत्रधार अजून मोकाट आहेत. आपण रामरहीमसारख्या बड्या बाबाच्या विरोधात सतरा वर्षे विनासंघटन उभे राहिलात, लढलात. तुमचा हा लढा आम्हाला प्रेरणा देतो. जेव्हा रामरहीम विरोधात कोणी लिहायला तयार नव्हते, तेव्हा रामचंद्र छत्रपती यांनी लिहिले, त्यांच्याविषयी आम्हाला अत्यंत आदर वाटतो. रामचंद्रजींनी घालून दिलेल्या निर्भयतेच्या मार्गावर पुढील अनेक पिढ्या चालतील, अशी आम्हास आशा आहे.

■ राहुल थोरात : अंशुलजी मला सांगा, रामचंद्र छत्रपतींची जडणघडण कशी झाली, कौटुंबिक पार्श्वभूमी काय होती?

□ अंशुल छत्रपती : माझे वडील रामचंद्र छत्रपती यांचा जन्म शेतकरी पार्श्वभूमी असलेल्या एका सर्वसाधारण कुटुंबात झाला. माझे आजोबा पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील होते. ते राहत असलेला भाग फाळणीनंतर पाकिस्तानात गेला. मग आजोबांनी सर्व कुटुंबाला भारतात स्थलांतरित केले. आमच्या कुटुंबाला सिरसा येथे शेतजमीन भरपाई म्हणून सरकारने दिली.

माझे वडील रामचंद्र छत्रपती हे लहानपणापासूनच धाडसी वृत्तीचे होते, त्यांच्यातील धाडसीपणा व नेतृत्वगुण पाहून त्यांचे शिक्षक एकदा त्यांना म्हणाले, ''तुझ्यात छत्रपती शिवाजी महाराजांसारखी निर्भयता दिसते. त्यामुळे तुझ्या नावापुढे छत्रपती लाव.'' त्यानंतर मग ते आपल्या नावासोबत 'संधू'ऐवजी 'छत्रपती' असे अभिमानाने लावू लागले. या नावामुळे आमचे संबंध महाराष्ट्राशी जोडले

आहेत याचा अभिमान वाटतो.

कॉलेजमध्ये असताना रामचंद्र छत्रपती यांनी आर्यसमाज, स्वामी अग्निवेश यांच्यासोबत काम केले. आर्य समाजाच्या एका मासिक पत्रिकेचे काम करण्यासाठी ते दिल्लीत राहिले होते. तिथे त्यांची पुरोगामी विचारांशी ओळख झाली. धर्म, जाती यांमुळे माणसाचे शोषण होते. देवा-धर्माच्या नावाखाली काही चतुर लोक इतर लोकांना फसवतात हे त्यांच्या लक्षात आले.

पुढे त्यांनी कायद्याचे शिक्षण घेतले. सिरसा कोर्टात वकिली चालू केली. मात्र त्यांचे मन त्यात रमेना. त्यांचा कल पत्रकारितेकडेच होता. त्यांनी दिल्लीहून प्रकाशित होणाऱ्या 'हिंदुस्थान टाइम्स' या वृत्तपत्रामध्ये वार्ताहर म्हणून काम सुरू केले. त्यासोबत काही स्थानिक दैनिकांत स्तंभलेखन सुरू केले. पत्रकारितेत काम करताना संपादकाला आवडेल, रुचेल ते लिहावे लागते, अनेकदा आपण लिहिलेल्या मजकुराला संपादकाची कात्री लागते, असा त्यांना अनुभव आला. मग त्यांनी स्वत:चे 'पुरा सच' हे वर्तमानपत्र चालू केले. हे वर्तमानपत्र सुरू करताना त्यांनी शपथ घेतली होती की, 'पूरा सच में पूरा सच ही छपेगा' त्यात त्यांनी तत्कालीन चौटाला सरकार आणि आमच्याच गावात असणाऱ्या 'डेरा सच्चा सौदा'च्या दहशती विरोधातल्या बातम्या छापायला सुरुवात केली.

■ राहुल थोरात :तुमच्या सिरसा गावात बाबा रामरहीमने ऐवढे मोठे साम्राज्य कसे निर्माण केले?

□ अंशुल : १९९०च्या दशकात नववी पास असलेल्या राजस्थानमधून आलेल्या रामरहीमने बंदुकीच्या जोरावर डेऱ्याचे प्रमुखपद मिळवले असे म्हणतात. त्यानंतर त्यानं सिरसा भागात आपली दहशत पसरवली, लोकांच्या जमिनी जबरदस्तीने हडप केल्या. इतकी प्रचंड संपत्ती, हजारो एकर जमिनी 'डेरा सच्चा सौदा'ने कशा लाटल्या, याची चौकशी कोणत्याच सरकारने कधी केली नाही. लोकांच्या विरोधामुळे तत्कालीन मुख्यमंत्री चौधरी बन्सीलाल यांनी तपास चालू केला. मात्र त्यांचे सरकार लगेच पडले आणि पुढे काहीच झाले नाही. अर्थात याच बरोबर हरियाना, पंजाबातील अज्ञानी गरीब लोक डेरा सच्चा सौदाचे प्रस्थ तयार करण्यास कारणीभूत ठरले.

■ राहुल थोरात :रामचंद्र छत्रपती आणि बाबा रामरहीम यांचा संघर्ष नेमका कशामुळे सुरू झाला?

□ अंशुल : बाबा रामरहीम आपल्या आश्रमातील मुलींचे लैंगिक शोषण करीत आहे, यासंदर्भात डेऱ्यातील अज्ञात मुलीचे पत्र अचानक एके दिवशी बाहेर आले, त्याच्या झेरॉक्स सगळीकडे मिळायला लागल्या. लोक कुजबूज करायला लागले, पण समोर येऊन कोणीही बाबा विरोधात बोलत नव्हते.

सिरसामध्ये डेरा सच्चा सौदा आश्रमाने शाळा, कॉलेजेस काढली, तेथील भक्त मंडळी आपल्या मुलांना ॲडमिशन घेऊ लागली. त्यातही मुला-मुलींची शाळा-कॉलेजेस वेगळी होती.

आश्रमात असणाऱ्या शाळा-कॉलेजमधील सुंदर मुलींना 'पित्या'ने म्हणजे रामरहीमने सेवेसाठी बोलवले आहे, असे सांगून त्याच्या गुहेत नेले जात असे. तिथे त्यांचे बाबा रामरहीमकडून लैंगिक शोषण केले जात असे. अशा पीडित मुलींनी 'रामरहीमने काय गैरकृत्य केले' हे आपल्या घरी सांगितले तर बाबाचे भक्त असलेले पालक त्या मुलींवरच अविश्वास दाखवत. बाबाविरोधी बोलणाऱ्या काही



अशुंल छत्रपती यांना डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार प्रदान करताना तुषार गांधी...
सोबत डावीकडून डॉ. हमीद दाभोलकर, डॉ. मनीषा गुप्ते, दीपक गिरमे आणि मिलिंद देशमुख

## अंशुल छत्रपती यांना डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार प्रदान

हरियाना राज्यातील सिरसा येथील लढाऊ कार्यकर्ते अंशुल छत्रपती यांना महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका)चा २०२१ सालचा 'डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार' यांना ज्येष्ठ विचारवंत तुषार गांधी यांच्या हस्ते २९ एप्रिल रोजी प्रदान करण्यात आला. अनेक मुलींचे लैंगिक शोषण करणाऱ्या बाबा राम रहीमला तुरुंगात पाठविण्यासाठी अंशुल छत्रपती यांनी मोठा संघर्ष केला होता.

या वेळी बोलताना महात्मा गांधी यांचे पणतू आणि प्रख्यात विचारवंत तुषार गांधी म्हणाले, 'हरियानातील पत्रकार रामचंद्र छत्रपती यांच्या मारेकऱ्यांचा शोध घेऊन त्यांना शिक्षा झाली. मात्र, डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या मारेकऱ्यांना शोधण्यात दिरंगाई झाली आहे. ज्या विचारधारेतून खून करण्यात आला, ती विचारधारा आणि त्यासंबंधित संस्थांचा तपासामध्ये विचार का केला गेला नाही?'

पुरस्काराला उत्तर देताना अंशुल छत्रपती म्हणाले, 'माझे वडील रामचंद्र छत्रपती यांनी सच्चा डेराचे गुरमित रामरहिम याच्या विरोधात आवाज उठविला. हा आवाज दाबण्यासाठी त्यांचा खून करण्यात आला. मात्र आम्ही घाबरलो नाही. १७ वर्षे आम्ही आमचा लढा सुरूच ठेवला. शेवटी न्याय मिळाला. गुरमित रामरहिमला शिक्षा झाली. डॉ. दाभोलकरांच्या मारेकऱ्यांनाही शिक्षा झाली पाहिजे. सूत्रधार पकडले गेले पाहिजेत. मला मिळालेला सन्मान रामचंद्र छत्रपतींच्या बलिदानाचा आणि अन्यायाविरोधात लढणाऱ्या चळवळीचा आहे.'

या कार्यक्रमात अमेरिकेतून सुनील देशमुख यांनी ऑनलाईन संवाद साधला आणि डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या आठवणी जागवल्या.

मुलींना डेऱ्यात मारझोड केली जात असे. त्यांना आश्रमातही धड जगता येणार नाही; बाहेरही जगता येणार नाही, अशी त्यांची असहाय अवस्था केली जात असे.

सन २००२मध्ये 'डेरा सच्चा सौदा'चा भांडाफोड करणारे एक निनावी पत्र एका पीडित मुलीने लिहिले. ते पत्र छापण्याचे धाडस कोणीही करेना. तेव्हा ते पत्र रामचंद्र छत्रपतींनी आपल्या 'पुरा सच' या सायंदैनिकात जसेच्या तसे छापले, त्यामुळे पंजाब-हरियानात मोठी खळबळ उडाली. लोक बाबा रामरहीमच्या विरोधात कुजबूज करू लागले. त्यामुळे काही प्रमाणात का होईना पण पहिल्यांदाच बाबा रामरहीम याच्या विरोधात वातावरण तयार झाले. त्यामुळे पंजाब-हरियाना हायकोर्टानं त्या मुलीच्या 'पत्रा'ची आपण होऊन (suo moto) दखल घेतली. या प्रकरणाची चौकशी करण्याचे जिल्हा न्यायाधीशांना आदेश दिले.

रामचंद्र छत्रपती या पत्र-प्रकरणाचे रोजचे अपडेट आपल्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध करू लागले. डेऱ्याने जमिनी बळकवल्याबद्दल लिहू लागले. या रामचंद्र छत्रपतीच्या पत्रकारितामुळे आपल्या धार्मिक, आर्थिक साम्राज्याला हादरा बसू शकतो, हे चतुर रामरहीमने ओळखले, तो छत्रपतींच्यावर हरप्रकारे दबाव टाकू लागला. भक्तांकरवी 'अॅट्रॉसिटी'चे खोटे गुन्हे त्यांच्यावर दाखल केले, जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या; पण माझे वडील दबले नाहीत. याची परिणती त्यांच्या खुनात झाली.

■ राहुल थोरात : बाबा रामरहीमच्या भक्त गुंडांनी रामचंद्र छत्रपतींवर राजरोस हल्ला केला?

□ अंशुल : हो ना... २४ ऑक्टोबर २००२च्या संध्याकाळी घराबाहेर आमच्या वडिलांना कोणीतरी मोठ्याने हाक मारली. कोण आले आहे ते पाहण्यासाठी वडील बाहेर गेले तेव्हा दोन तरुणांनी त्यांच्यावर पिस्तुलातून गोळीबार करत पाच गोळ्या झाडल्या. गोळीबाराच्या आवाजाने आम्ही भावंडे बाहेर पळत आलो तर गेटजवळ वडील रक्ताच्या थारोळ्यात पडलेले होते, गोळीबार करणारे युवक पळून जात होते, तेव्हा आम्ही भावंडांनी मोठ्यानं आरडाओरडा केला. त्यामुळे आमचे शेजारी गोळा झाले. शेजाऱ्यांच्या कारमधून वडिलांना तातडीने आम्ही सिरसा सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नेले.

आमच्या घरापासून जवळच पोलीस चौकी आहे. आमचा आरडाओरडा ऐकून तेथील तैनात पोलीस सावध झाले. त्यांच्या समोरूनच ते हल्लेखोर पळून जात होते. एका धाडसी पोलीस शिपायाने त्यांचा पाठलाग करून तिथेच एका हल्लेखोराला पकडले, पण दुसरा निसटला. त्याच्याजवळील बंदूक, वॉकीटॉकी, गाडी आणि इतर सर्व वस्तू सापडल्या. या सर्व वस्तू म्हणजे बंदूक, वॉकीटॉकी 'डेरा सच्चा सौदा'च्या मॅनेजरच्या नावाने रजिस्टर होत्या, त्यामुळे या खुनात बाबा रामरहीमचा हात आहे हे प्रथमदर्शनी स्पष्ट दिसत होते.

■ राहुल थोरात :मग सरकारने रामरहीम विरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला का?

□ अंशुल : अजिबात नाही, कारण तत्कालीन हरियाना सरकार मतांसाठी रामरहीमच्या बाजूने होते. या सरकारचे रामरहीमला आतून सहकार्य होते. पोलीस आम्हाला सहकार्य न करता उलट त्रासच देत असत. रामरहीमचा आमच्यावर दबाव होता. नैतिक आणि विचारी जनांची ताकद सोडली तर



पूरा सच
सांध्य दैनिक
Email:- purasach@rediffmail.com
फोन : 23230, फैक्स 32514
• मूल्य 1.00 रुपया
• सिरसा, शुक्रवार
• 25 अक्तूबर, 2002 ई.
• अंक 284
छत्रपति पर कातिलाना हमला, हालत चिंताजनक
डेरे की प्रबन्धक समिति सदस्य ने दिया था उड़ाने का आदेश • अभियुक्त ने स्वीकारा वारदात में प्रयुक्त असला डेरे से मिला
अमितकृष्ण तिवाड़ी/नरेश अरोड़ा
सामान्य अस्पताल की अव्यवस्था उजागर
हमले के विरोध में कल सिरसा बंद
वरिष्ठ पत्रकार रामचन्द्र छत्रपति पर हुए हमले को लेकर आज नगर की विभिन्न सामाजिक, राजनीतिक, स्वयं सेवी व धार्मिक संगठनों की आज सुखाब पर्यटन
डेरा सच
हमारे संवाददाता
पूरा सच
सांध्य दैनिक
Email:- purasach@rediffmail.com
फोन : 23230, फैक्स 32514
• अंक 146
• सिरसा, गुरुवार
• 30 मई, 2002 ई.
...क के हठ ने खोल दिया धार्मिक डेरे का कच्चा...
धर्म के नाम पर किए जा रहे हैं साध्वियों के जीवन...
...यंती मनाई गई
सिरसा शहर के टीवी दर्शकों से अपील
पुरानी रंजिश के चलते युवक पर हमला
पूरा...
• अंक 173
• वर्ष 3
साध्वी की चिट्ठी को लेकर ड...
प्रेमियों ने किया वकील के चेम्बर का...
वकीलों के प्रतिनिधि मंडल ने प्रशास...




आमच्याकडे कोणतीच ताकद नव्हती. आम्हाला लोकशाही मार्गाने सगळे करायचे होते.

या खुनानंतर सिरसामध्ये 'जन संघर्ष मंच' आणि 'पुरोगामी तर्कशील संघटनां'नी मोठे आंदोलन पुकारले. वकिलांनी संप पुकारला. पत्रकार संघटनाही या आंदोलनात उतरल्या. बाबा रामरहीम विरोधात मोठे जनआंदोलन संपूर्ण हरियाना आणि पंजाब राज्यात उभे राहिले. तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री चौटाला वडिलांना भेटायला हॉस्पिटलमध्ये आले. त्या वेळी मुखमंत्र्यांनी 'या खुनामध्ये कितीही मोठी व्यक्ती असली तरी त्याचेवर सरकार नक्की कारवाई करेल' असे आश्वासन दिले. पण त्याप्रमाणे मुख्यमंत्री वागले नाहीत.

हल्ला झाल्यानंतरही माझे वडील १५ दिवस हॉस्पिटलमध्ये जिवंत होते. मृत्यूशी अखेरची झुंज देत होते. या वेळी आम्ही पोलिसांकडे मागणी करूनही या खून खटल्यात अत्यंत महत्त्वाचा ठरला असता असा माझ्या वडिलांचा ऑन रेकार्ड न्यायालयीन जबाब पोलिसांनी शेवटपर्यंत नोंदवला नाही. आम्ही मागणी करूनही एफआयआरमध्ये डेरा सच्चा सौदा आणि बाबा रामरहीम याचे नाव पोलिसांनी नोंदवलं नाही.

■ राहुल थोरात :खुनातील मूळ सूत्रधारावर कारवाई व्हावी म्हणून तुम्ही जो न्यायालयीन लढा दिला त्याच्याविषयी सांगा!

□ अंशुल : हरियाना सरकार व पोलीस हे संपूर्णपणे बाबा रामरहीमला अप्रत्यक्षपणे पाठीशी घालत होते हे आम्ही पाहत होतो, त्यामुळे त्यांच्याकडून आम्हाला न्याय मिळणार नव्हता. डेऱ्याचे भक्त असणाऱ्या हल्लेखोरांची ओळख पटूनही डेऱ्याचा प्रमुख रामरहीम याची साधी पोलीस चौकशी होऊ शकत नव्हती. त्यामुळे आम्ही या विरोधात पंजाब-हरियाना हायकोर्टात जायचे ठरवले. त्यानुसार वडिलांच्या वकील मित्रांकडून चंडीगढ हायकोर्टात मी एक याचिका दाखल केली. या याचिकेत आम्ही अशी मागणी केली केली, 'हरियाना पोलीस या प्रकरणात पक्षपातीपणा करत आहेत, प्राथमिक पुरावे बाबा रामरहीमच्या विरोधात असूनही त्याला आरोपी केले जात नाही, तेव्हा हे प्रकरण हरियाना पोलिसांकडून काढून घेऊन ते सीबीआयकडे द्यावे.'

आम्ही कोर्टात गेल्याचा राग मनात धरून पोलिसांनी हे प्रकरण रामचंद्र छत्रपतींच्या सासुरवाडीतील एका जमिनीच्या वादातून घडले आहे असं धादांत असत्य पत्रकार परिषद घेऊन सांगितले. या प्रकरणाला अशा रीतीने वेगळे वळण देण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला.

या अगोदर १० जुलै २००२ रोजी 'डेरा सच्चा सौदा'चे मॅनेजर रणजित सिंग यांचा खून झाला होता. त्यानेच ते पत्र बाहेर काढले होते असा त्याच्यावर संशय असल्याने त्याला संपवण्यात आले. आमच्या प्रकरणामुळे बाबा रामरहीम विरोधात वातावरण तयार झाले होते, तेव्हा मॅनेजर रणजित सिंगच्या वडिलांनी आपल्या मुलाच्या खुनाची सीबीआय चौकशी व्हावी म्हणून हायकोर्टात याचिका दाखल केली. या दोन्ही याचिका हायकोर्टात एकत्र सुनावणीला आल्या, तेव्हा रामरहीमने दिल्लीतील सुप्रिम कोर्टातील मोठमोठे वकील प्रचंड फी देऊन आमच्या विरोधात उभे केले, पण मेहेरबान कोर्टाने योग्य साक्षीपुरावे तपासून सीबीआय चौकशीची जॉईंट ऑर्डर दिली.

■ राहुल थोरात :सीबीआय चौकशीवेळी ही मोठमोठे अडथळे आणले गेले त्याविषयीही सांगा -

□ अंशुल : हायकोर्टाने सीबीआयकडे तपास सोपविण्याच्या या निर्णयाविरोधात बाबा रामरहीम सुप्रीम कोर्टात गेला. तेव्हा सुप्रीम कोर्टाने हायकोर्टाच्या या निकालावर स्टे दिला. तेव्हा तेथील अवघड लढाईत सुप्रसिद्ध विधिज्ञ राजेंद्र सच्चर यांनी आमचे वकीलपत्र घेऊन मोठे सहकार्य केले. विनामोबदला त्यांनी ही केस सुप्रीम कोर्टात लढवली व आमच्या बाजूने निकाल लागला. आता सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार बाबा रामरहीमची सीबीआय चौकशी सुरू झाली.

तपास यंत्रणेवर सरकार आणि बाबाचा दबाव होता. 'डेरा'चे भक्त तपासात अडथळा आणत असत. साक्षीदारांच्या गावी सीबीआय पोलीस गेले की बाबाचे हजारो भक्त त्या गावात जमा होऊन पोलिसांचीच नाकाबंदी करत. पोलिसांना त्या गावातून बाहेर पडू देत नसत. जमाव पांगवण्यासाठी सीबीआय राज्य पोलिसांना विनंती करत परंतु राज्य पोलीस सीबीआयला सहकार्य करत नसत, तरीही सीबीआयचे निर्भीड अधिकारी सत्यपाल सिंगजी, सतीश डागरजी आणि त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी उत्तम काम केले. या केसच्या मुळापर्यंत जाऊन तपास केला. रामचंद्र छत्रपती यांचा खून बाबा रामरहीम यांच्या सांगण्यावरून केला गेला असा निष्कर्ष सीबीआयने काढला आणि तो कोर्टात सिद्धही झाला. कोर्टाने बाबा रामरहीमला आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली.

केवळ सीबीआयमुळे वडिलांची हत्या, मॅनेजर रणजितसिंह यांची हत्या आणि साध्वीवरील लैंगिक अत्याचार या प्रकरणांच्या मुळाशी जाऊन अंतिम निष्कर्षापर्यंत पोचता आले. हे सगळे घडत असताना कोर्टात रामरहीमचा ड्रायव्हर खट्टरसिंग यांची साक्ष महत्त्वाची ठरली. कारण त्यांच्या समोरच खुनाचा कट रचला गेला होता.

(ही मुलाखत घेत असतानाच एक बातमी येऊन थडकली. 'बाबा रामरहीमला तुरुंग प्रशासनाने ३ आठवड्यांची रजा (फर्लो) मंजूर केली आहे.' मी त्या संदर्भात लगेचच प्रश्न केला-)

अनेक निरपराध विद्यार्थ्यांना, विद्वानांना सहजी बेल मिळत नाही. तुरुंगात खितपत पडावे लागते. या पार्श्वभूमीवर आपण या घटनेकडे कसे बघता?

तेव्हा ते म्हणाले, ''बाबा रामरहीमला ज्या वेळी ही सुट्टी तुरुंग प्रशासनाने दिली आहे ती वेळ

तुम्ही बघा, सध्या पंजाब व उत्तर प्रदेश मध्ये विधानसभेच्या निवडणुका सुरू आहेत. बाबा राम रहीमला मानणारा अजूनही मोठा समुदाय पंजाब व पश्चिम उत्तर प्रदेश राज्यात आहे. बाबाच्या भक्तांची मते आपल्या पक्षाला मिळावीत असा छुपा उद्देश या रजेमागे आम्हाला दिसतो. बाबांच्या भक्तांच्या मतावर काही राजकीय पक्षांचा डोळा आहे म्हणून हे बाबासोबत केलेले साटेलोटे आहे. नाहीतर दोन खून आणि दोन बलात्कार अशा चार फौजदारी गुन्ह्यांबद्दल आजन्म कारावासाची शिक्षा भोगत असलेल्या बाबावर प्रशासन इतके का प्रसन्न होते? का मेहेरबान होते? या रजेची नि:पक्ष चौकशी निवडून आयोगाने करावी आणि बाबाची रजा त्वरित नामंजूर करावी अशी मागणी मी केली आहे, यासंबंधी अनेक वृत्तवाहिन्यांवर मी अलीकडेच माझ्या मुलाखती दिल्या आहेत.''

■ राहुल थोरात : सतरा वर्षे तुम्ही न्यायालयीन लढाई लढला. या सर्व संघर्षाबद्दल तुम्हाला आता काय वाटतं?

□ अंशुल : ही लढाई लढणे म्हणजे मोठ्या संकटात स्वत:ला, स्वत:च्या कुटुंबाला ओढवून घेणे होतं. सरकार, पोलीस, महाबलाढ्य बाबा आणि त्याचे आर्थिक साम्राज्य हे सर्व आमच्या विरोधी असूनही आपल्या वडिलांना न्याय मिळाला पाहिजे यासाठी आम्ही झटत होतो. आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे मुलींचे राजरोस लैंगिक शोषण करणाऱ्या या बाबाला शिक्षा झालीच पाहिजे, याबाबत आग्रही होतो. या बाबाला शिक्षा झाली तरच अजून काही मुली त्याच्या शोषणापासून वाचतील, तेव्हा हे काम आपण केलेच पाहिजे, असा माझा आतला आवाज मला सांगत होता. त्यासाठी आपल्याला आपल्या वडिलांप्रमाणेच मरण आले तरी बेहत्तर असे मनोमन ठरवूनच या लढाईच्या मैदानात मी उतरलो होतो.

भारतीय संविधानातील नागरिकांच्या हक्कावर माझा अपार विश्वास होता. किती मोठा बाबा असू दे, पोलीस असू दे, सरकार असू दे, भारतीय संविधानाने दिलेले हे हक्क कोणीही आपल्याकडून हिरावून घेऊ शकत नाही, हे मला पक्के ठाऊक होते. याच संविधानाच्या हक्काच्या

२००२मध्ये 'डेरा सच्चा सौदा'चा भांडाफोड करणारे एक निनावी पत्र पीडित मुलीने लिहिले. डेऱ्यात राहणाऱ्या त्या मुलीने हे पत्र त्या काळी पंतप्रधान असलेल्या मा. अटलबिहारी वाजपेयी यांना लिहिलेले होते. त्या पत्राच्या प्रती मा. सुप्रीम कोर्ट, पंजाब-हरियाना हायकोर्ट, हरियाना पोलीस महासंचालक यांना पाठविलेल्या होत्या. हे पत्र छापण्याचे धाडस कोणतेही वर्तमानपत्र करत नव्हते. तेव्हा ते पत्र रामचंद्र छत्रपतींनी आपल्या 'पुरा सच' या सायं दैनिकांमध्ये जसेच्या तसे छापले, त्यामुळे पंजाब-हरियानात मोठी खळबळ उडाली. लोक बाबा रामरहीमच्या विरोधात कुजबूज करू लागले. त्यामुळे पहिल्यांदाच बाबा रामरहीम याच्या विरोधात काही प्रमाणात होईना पण वातावरण तयार झाले. त्यामुळे पंजाब-हरियाना हायकोर्टाने या पत्राची आपण होऊन (suo moto) दखल घेतली. या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश जिल्हा न्यायाधीशांना दिले.

पाठिंब्याने मी ही लढाई लढून जिंकू शकलो. एका मोठ्या बाबाला जन्मठेपेची शिक्षा देऊ शकलो.

या सर्व लढाईत मानसिक आधार देण्याचे, कायदेशीर लढाईत साथ देण्याचं काम ज्यांनी केले, त्यांचा मी मन:पूर्वक आभारी आहे. त्यांच्या सहकार्याची परतफेड मला करता येऊ शकत नाही.

माझ्या वडिलांसारखेच बुवाबाबांच्या हल्ल्यात प्राणांची आहुती देणाऱ्या डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या नावाने आज हा पुरस्कार मला मिळतोय याचा आनंद किती झाला आहे हे मी शब्दांत सांगू शकत नाही. मी महाराष्ट्र फाउंडेशन, मासूम संस्था, साधना साप्ताहिक, डॉ. हमीद दाभोलकर व आमचे मित्र राहुल थोरात यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

शेवटी एवढेच सांगतो डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी आणि माझे वडील रामचंद्र छत्रपती यांनी ही जी बुवाबाजी विरोधी लढाई सुरू केली आहे, ती नक्की यशस्वी होईल, या महान हुतात्म्यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही.

मुलाखतकार : **राहुल थोरात,** सांगली
९४२२४११८६२

# शेतमजूर ते डिजिटल संपादक : राम जगताप

**सोनाली नवांगुळ**



डेस्कटॉप दिसू शकेल आणि की बोर्ड वापरता येईल इतकीच जेमतेम जागा रामच्या कामाच्या टेबलावर जाणीवपूर्वक राखलीय बाकी सगळीकडे 'तातडी'नं वाचायच्या, लिहायच्या पुस्तकांची, नोंदीच्या कागदांची, नियतकालिकांची चळत. टेबलाच्या डाव्या हाताला पुन्हा 'महत्त्वाच्या' वर्तमानपत्रांची आणि मासिकांची मनुष्यउंची रास. झोपायच्या खोलीत पूर्ण भिंत व्यापलेलं पुस्तकांचं कपाट आणि आवश्यक संदर्भांची मासिकं, दिवाळी अंक, नियतकालिकं यांची मोठाली खोकी. हे त्याच्या घरातलं थेट डोळ्यांना दिसणारं दृश्य, मात्र प्रत्यक्ष रामच्या डोक्यात नांदणारे कप्पे, उपकप्पे, चोरकप्पे, कड्याकुलपं करकचून लावून किल्ली सातासमुद्रापार टाकून दिलेले कप्पे! त्यांचा विषयच लांब.

नुकती कुठं चाळिशी पार केलेल्या रामच्या केसांचा रंग उडाला नि हळूहळू करत केसही उडत चाललेत. या परिणामाला निसर्गक्रम म्हणून मोकळं होता येणार नाही इतकं नाट्यमय, कष्टमय, चिकाटीचं आणि झपाट्याचं रामचं आयुष्य!

मुद्रितशोधनापासून सुरुवात करत पत्रकारिता, लेखन, संपादन करणारा, मराठीत अलीकडे उगवलेल्या डिजिटल फीचर पोर्टलसारख्या माध्यमात घुसून ठोस उभा राहणारा अभ्यासू, चिकित्सक, चोखंदळ पत्रकार म्हणून राम जगताप आता परिचित आहे. 'तर्काचा घोडा' हे रामनं त्याच्या एका

सदराला दिलेलं नाव खरोखर चपखल आहे. अशाच तर्काच्या घोड्यावर मांड ठोकून सहसा बोलल्या न जाणाऱ्या विषयांना हात घालत ओचकारे काढणं, कधी टवाळी करणं, समाज माध्यमातील अनुनयवृत्तीला फाट्यावर मारत खडे बोल सुनावणं तो करत आलेला आहे. असं करून अप्रिय होण्याची भीती त्यानं कधी बाळगलीच नसावी. आयुष्यातील विपरीत परिस्थितीला धडका देण्यातून जे शहाणपण अंगी आलं ते टिकवून धरत तो कृती करत राहिला आहे.

मराठवाड्यातल्या जालना जिल्ह्यातील पिंपरखेड (बु) या छोट्याशा गावातल्या रामच्या लहानपणाच्या अभावाचं वर्णन 'अठरा विश्वं दारिद्र्य' या शब्दांत करणं तंतोतंत खरं असलं तरी पुस्तकी वाटेल. गल्लीतली मुलं शाळा सुटल्यावर, सुट्टीदिवशी खेळताहेत, झोपताहेत असं वातावरण आसपास असायचं तेव्हा राम, आई-बाप आणि दोन भावांसोबत खांद्यावर फावडं, घमेलं घेऊन पाईपलाईन खोदायला, वळण टाकायला, केळी नाहीतर ऊस घोळवायला निघालेला असायचा. आपले सवंगडी लहानपण मनमुराद जगताहेत आणि कामाला नाही म्हटलं तर बाप लाथाबुक्क्यांनी कुचलून काढेल, शाळा बंद करून टाकेल या भीतीनं मान मुकाट खाली खालून आपण कष्ट काढतोय याची जाणीव होऊन रडायला आलं तरी उसंत नसायची. किरणामाल गुंडाळून आलेला प्रत्येक कागद वाचून काढण्याचा त्याचा झपाटा पाहून आई कधीतरी म्हटलीही होती, 'हा उकिरड्यावरचा कागदपण वाचल्याशिवाय सोडणार नाही.' असंच वाचता वाचता सापडलेल्या गिरगावच्या पत्त्यावर पोस्टकार्ड टाकून त्यानं कधीतरी नाटकाची दोन पुस्तकं मागवली. दिवसभर घाम गाळून साठ रुपये आणि मुलं हाताखाली असतील तर त्यांचे चाळीस रुपये अशी तोटकी कमाई असताना वडिलांनी पाठ दणकून न टाकता पन्नास रुपये देऊन पार्सल सोडवलं इतकं रामचं वाचनवेड पराकोटीचं होतं. पाचवीनंतर मामाच्या पाटोदा गावात जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकायला जाण्यानं एकीकडं राम आणखी घुमा झाला, पण त्याच्या 'इतक्याशा' जगण्याला आणखी पदरही फुटले. शिक्षकांचा आवडता हुषार विद्यार्थी वाचलेलं वहीत उतरवून ठेवायला लागला. आसपासच्या बौद्ध वस्तीत चळवळीची गाणी ऐकायला, म्हणायला लागला. शाळेतल्या शिक्षकांमुळं पुस्तकांपर्यंत गाडी सरकली. वेगवेगळ्या लेखकांच्या पुस्तकातल्या उपमा आणि प्रतिमा वाचताना त्याला वाटायचं, निसर्गाचं वर्णन करण्याएवढा शांतपणा आणि स्थैर्य प्रत्यक्ष जगण्यात असतं तरी का?



मिळेल ते वाचत, मनाशी घोळवत पुस्तकांची वाट राम शोधत राहिला. तसंही शिकायचं असलं तर आपल्या आपल्या बळावर कमवून शिका असं बापानं फार लहानपणीच सांगितलं होतं, त्यामुळे

बारावीनंतर पुढं शिकण्याचा निर्णय स्वत:च घ्यायचा होता. कॉलेज कुठलं, प्रवेश कसा घ्यायचा याबद्दल काहीच गंधवार्ता नव्हती. शहरात गेलो तर गावच्या चाकोरीबद्ध जंजाळातून सुटका होईल म्हणून पुण्यात जायचं ठरवलं खरं, पण पोहोचल्यावर कळलं की प्रवेशाची तारीख केव्हाच उलटून गेलीय. त्या हुकलेल्या वर्षात गावात परतण्याऐवजी, सालगडी म्हणून फुलगावला राबणाऱ्या मधल्या भावाबरोबर रामनं पुन्हा स्वत:ला ढोरमेहनतीला जुंपलं. शेतमालकांची काचेच्या कपाटात शिस्तशीर लावलेली आजवर न पाहिलेली भरपूर पुस्तकं बघून रामचा जीव निवला. त्या काकांनी शिकवल्याप्रमाणे पेपरमधल्या महत्त्वाच्या लेखांची कात्रणं नीट कापून बैजवार लावताना राम हरखून जायचा. घरात स्वतंत्र वर्तमानपत्र येतं हेही तिथं नव्यानंच कळलेलं. याच अनुभवांचा अमीट ठसा रामच्या घराच्या कोपऱ्याकोपऱ्यात दिसतो.

१९९९ला महाविद्यालयीन शिक्षणासाठी पुण्यात येण्याआधी अनवाणी पायात किमान स्लीपर तरी हवी म्हणून पैसे वाचवणाऱ्या रामने महाविद्यालयीन शिक्षणासाठी पुण्यात कॉटबेसिसवर राहायला लागल्यावर दुर्मीळ पुस्तकं आणि नियतकालिकं विकणारी माणसं व जागा हुडकल्या. एसटीडी बूथ चालव, दही-ताक, सँडविचच्या हॉटेलात पडेल ते काम कर, लोणच्याच्या कारखान्यात राब असं करत रामनं शिक्षण पूर्ण करता करता स्वत:च्या खर्चानं पुस्तकं घ्यायला सुरुवात केली. जे जे नवे संदर्भ कानावर पडतील त्याबद्दलची पुस्तकं, अंक, कोश शोधून वाचण्याचा सपाटा लावला. अर्थात तुटपुंज्या कमाईत राहणं, खाणं आणि कॉलेजचा खर्च भागवताना जीव आधीच मेटाकुटीला यायचा, त्यात जुनी का असेनात पुस्तकं स्वखर्चानं घेणं हे वेड भलतंच होतं. शिवाय वेगवेगळ्या वाचणाऱ्या, चळवळीतल्या माणसांना त्यांची वेळ घेऊन फाफलत जाऊन भेटणं, त्यांच्याशी बोलून जगाबद्दल आणखी कळून घ्यायचा प्रयत्न करणं हे तर तो झपाटल्यासारखा करतच होता. त्याच दरम्यान कुठंकुठं लिहून, मुद्रितशोधनाचं काम करून त्याचं सुख त्याला लाभत होतं. सगळी वणवण, सगळे मनस्ताप, अस्थिरता, बेचैनी तो डायरीच्या पानांवर मोकळी करायचा. ते अक्षर अगदी ओघवतं, लयदार... अशीच काही पानं वाचली तेव्हा कळलं, वाचून झालेल्या पेपर्स आणि नियतकालिकांची रद्दी विकून या माणसानं दोन-दोन दिवसांची पोटाची रिकामी खळी कधी दूधपोहे खाऊन, कधी शेंगदाण्याचे लाडू खाऊन तर कधी नुसतीच उकडलेली अंडी खाऊन कशीबशी भरली आहे.

कधी 'लोकसत्ता' आणि 'प्रहार'सारख्या दैनिकांत रविवारच्या पुरवण्यांचं संपादन पाहिलेल्या, आयबीएन लोकमतसारख्या त्या वेळी नव्यानं आलेल्या चॅनलमध्ये निखिल वागळेंच्या हाताखाली आणखी धार चढलेल्या, निर्भीड, करारी, टोकदार सत्य लिहिणाऱ्या या माणसाच्या अबोलपणाचं खापर सहजच हुषारीच्या अहंकारावर, त्यामुळे एरवी ग्रासणाऱ्या तुच्छतावादावर, त्यातून बहरणाऱ्या शिष्टपणावर फोडणं शक्य असतं. रामची जडणघडण थोडक्यात कळली तरी लक्षात येतं, हा माणूस सावकाश खुलतो. त्याची लेखणी व चिकित्सक बुद्धी भीड बाळगणारी नव्हे, पण माणसांचं प्रेम, त्यांचा जिव्हाळा, स्पर्श, खुली चेष्टामस्करी याला सामोरं जाताना तो कवचात शिरतो. भाग्यश्री भागवत सारखी तितकीच तीक्ष्ण बुद्धीची बायको आणि त्या दोघांना पुरून उरेल अशी चळवळी उधाणलेली लेक मुद्रा आयुष्यात आल्यावर आता राम बऱ्याच प्रमाणात शांतवला आहे. कवचाचा आश्रय घेणं कमी होत चाललं आहे. आपलं कोवळेपण, मूलपण खोल दडवून ठेवणारा, आस्तेआस्ते खुलणारा राम

व्यवहारशून्यतेबाबतीत मात्र तसूभर बदललेला नाही.

पुण्यात 'साहित्यसूची', 'सत्याग्रही विचारधारा' या अंकांसाठी कामं करता करता आणि 'साधना' परिवाराच्या सान्निध्यानं पुरोगामी, ज्ञानव्रती माणसांशी त्याच्या भेटीगाठी व्हायच्या. त्यातून वाचन, विचार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, लोकशाही मूल्यं या संकल्पना अधिकाधिक स्पष्ट होत गेल्या. काम अधिक ठोस, ठाम होत गेलं. नोकरीनिमित्तानं मुंबईला गेल्यावर तर वर्तुळ वाढतच गेलं. साहित्यापासून राजकारणापर्यंत सतत अपडेट राहणं, जगभरात घडणाऱ्या घटनांचे बिंदू जोडून त्याचा अन्वयार्थ लावणं ही जडून गेलेली सवयच. या सगळ्या घुसळणीतून तयार झालेल्या चिकित्सक बुद्धीचा परिपाक म्हणजे रामनं मित्रासह संपादित केलेलं पहिलं पुस्तक 'मराठा समाज : वास्तव आणि अपेक्षा'. २००४ मधल्या भांडारकर इन्स्टिट्यूटवरील हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, मराठ्यांच्या संघटनेची महाराष्ट्रभर दहशत तयार झालेली असताना इतिहास आणि वर्तमानाकडे भेदक दृष्टीनं पाहत उघडपणे घेतलेली भूमिका रामच्या पत्रकारितेतील निष्ठेबद्दलचं बोलकं उदाहरण आहे. हे पुस्तक त्याच्या तिशीच्या आसपास प्रकाशित झालं. ज्या जातीत जन्माला आला तिची आणि स्वत:ची कठोर चिकित्सा करत त्यानं जणू भविष्यातली त्याची कार्यपद्धतच स्पष्टपणे सांगितली. पुढे कधी त्याची एकट्याची किंवा सहलेखक-संपादकासह 'मध्यमवर्ग उभा, आडवा, तिरपा', 'कर्ती माणसं', 'नोटबंदी - अर्थक्रांती की आर्थिक घोडचूक', 'मायलेकी बापलेकी' अशी पुस्तकं प्रकाशित झाली. विषय ठरला की पछाडून जात रात्ररात्र संदर्भासाठी गाडून घेणारा, मुळापर्यंत जात परंपरा तपासत, प्रश्न विचारत, चिकित्सा करत सत्याशी इमान राखण्याचा पत्रकारितेचा धर्म त्यानं कसोशीनं सांभाळलेला दिसतो.

प्रिंट मीडियातून निखिल वागळेंच्या आग्रहामुळे एकदम व्हिज्युअल मीडियात शिरलेला राम कष्टाची तयारी असल्यामुळेच कधी भांबावला नाही. या माध्यमाची ताकद, मर्यादा, पेच सगळं घेत समजून अक्षरश: त्याला भिडला. अनुभवांचा पैस विस्तारला. बघताना मान दुखून जाईल इतकी उंच,









श्रेष्ठ माणसं त्यानं अनुभवली. त्यांचं प्रेम मिळवलं. २६/११च्या हल्ल्यात अर्ध्या तासाच्या फरकानं टर्मिनसवरून परतल्यामुळे जीव वाचलेल्या रामच्या वाट्याला खरं तर सर्वसामान्यपणे यशस्वी म्हणता येईल अशी कामाची जमीन मिळाली होती. मात्र चोवीस तास आल्या बातमीला सामोरं जात, मेंदूतले संदर्भ जुळवून मांडण्याच्या तात्कालिक जगण्याला तो अपार थकला. नवं वाचण्यासाठी, पाहण्यासाठी, जगतोय त्याचं विश्लेषण करण्यासाठी जिथे उसंत नाही तिथे टिकून काय करायचं म्हणून जुन्या अनेक नोकऱ्यांप्रमाणे एका तिडीकेसरशी त्याने हीही नोकरी सोडली. सामाजिक दृष्टीने माणूस जसजसा वरच्या पातळीवर जातो, त्याचं व्यक्तिगत स्वातंत्र्य मर्यादित होत जातं याचं भान न विसरता राम स्वत:ला कायम जमिनीवर राखत राहिला. त्याच जमिनीवर आपल्या पुढच्या लेखाच्या तयारीसाठी मांडलेली पुस्तकं आणि अंक बाजूला करत आपल्या लेकीबरोबर हा तर्कदुष्ट राम कोलांट्या उड्या मारतो. ताजा होतो. - म्हणून तर लहान मुलाच्या उत्साहाने मराठीत नवं असलेलं डिजिटल फीचर पोर्टलचं वर्तमान आणि भविष्यकालीन जग व निकड समजावून घेत 'अक्षरनामा'सारखं फीचर पोर्टल पाच वर्षं यशस्वीपणे चालवून दाखवतो. त्याची क्षमता आजमावण्यासाठी स्वत:ला श्रमवतो. मात्र ही उस्तवार करताना आणि घडी पुन्हा पुन्हा बसवताना त्याचं स्वत:चं लेखन, त्यासाठीची बैठक यासाठी नेहमीप्रमाणे वेळ अपुराच पडतो आहे.

तरीही रामला खूप हात व बरेच डोळे आहेत असं मला वाटतं. जुन्या अनुभवांचा कडवटपणा मनात न बाळगणारा राम स्थितप्रज्ञ असल्याचा आवही आणत नाही. तो शंभर टक्के माणूस आहे. तसा तो उरला आहे म्हणूनच मर्म ओळखणारा व योग्य वेळी मर्मावर बोट ठेवत, वितुष्ट घेत समाजाला जागं करणारा पत्रकार म्हणून टिकू शकला आहे!

सोनाली नवांगुळ
९७६७९५१९०५

व्हिडिओवरील भाषण...

# विचारप्रक्रियेला चालना देणारं ‘फीचर’ लिखाण



नमस्कार,

मी राम जगताप. ‘अक्षरनामा’ या मराठीतील एका ‘डिजिटल डेली फीचर्स पोर्टल’चा संपादक. गेल्या सतरा-अठरा वर्षांपासून पत्रकारितेमध्ये आहे. त्याआधी काही काळ प्रकाशन व्यवसाय आणि मासिकांमध्ये मी काम केलं. नंतरच्या काळातही केलं. खरंतर पत्रकारितेमध्ये मी अपघातानेच आलो. काहीसं पॅराजंपिंग करून. म्हणजे थेट वर्तमानपत्राच्या रविवार पुरवणी विभागातच दाखल झालो.

पण खरंतर तेव्हा मराठी वर्तमानपत्रांत ‘फीचर्स जर्नालिझम’ची मोठ्या प्रमाणावर छाटणी चालू होती. मोठमोठे लेख छापायचे नाहीत, असंच वर्तमानपत्रांच्या संपादकांनी ठरवलेलं होतं. त्या विरोधात आम्ही संपादकांशी भांडून आमची फीचर्स शक्य तेवढी मोठी करायचा प्रयत्न करत होतो. एके दिवशी संपादक मला म्हणालेसुद्धा की, “तू दहा-एक वर्षं आधीच पत्रकारितेत यायला हवं होतंस. आता वर्तमानपत्रांतला मोठमोठ्या फीचर्सचा काळ संपुष्टात आला आहे.” पण मला, किंबहुना आमच्या सबंध टीमलाच ते मान्य नव्हतं. आजही मला ‘फीचर्स जर्नालिझम’चा काळ संपलाय असं अजिबात वाटत नाही. केवळ मला आवडतं म्हणून हे मी म्हणत नाही, तर खरोखरच ‘फीचर्स जर्नालिझम’चा काळ संपलेला नाही, अजूनही आशय दमदार असेल तर मोठे लेख, अभ्यासपूर्ण लेख लोकांना वाचायला आवडतात, असाच माझा ‘अक्षरनामा’चा गेल्या पाच वर्षांचा अनुभव आहे.

ही गोष्ट खरीच आहे की, नव्वदनंतर केवळ मराठीच नव्हे तर एकंदर जगभरचीच पत्रकारिता बदलली आहे. सोशल मीडियानं जगभरचं जनमानसही बदलवलं आहे. त्यामुळे अटीतटीची स्पर्धा आणि दिवसागणिक बदलणाऱ्या तंत्रज्ञानाचा झपाटा, यांमुळे छापील आणि इलेक्ट्रॉनिक पत्रकारितेला केवळ मनोरंजनाचं स्वरूप आलं आहे. इलेक्ट्रॉनिक पत्रकारितेत तर ‘फीचर्स’ला अजिबातच महत्त्व उरलेलं नाही आणि छापील पत्रकारितेतही ‘फीचर्स जर्नालिझम’ची दिवसेंदिवस खरडछाटणी होत चालली आहे. मराठीतील कितीतरी चांगली नियतकालिकं बंद पडली आहेत आणि जी चालू आहेत, त्यांची स्थिती फारशी बरी नाही.



हे सगळं खरं असलं तरी 'Long Live The King?'च्या चालीवर ‘फीचर्स जर्नालिझम चिरायू’च राहणार आहे. आपण म्हणतोच ना की, टिकून राहण्याला महत्त्व असतं आणि चिकाटीनं काम करण्यालाही. त्यामुळे मला खरोखरच मनापासून असं वाटतं की, आजच्या माहितीच्या भस्मासुराच्या काळात आणि नानाविध सत्य-असत्याच्या गदारोळात ‘फीचर्स जर्नालिझम’ हेच खऱ्या अर्थानं वाचकांचं जनमानस घडवण्याचं, त्यांना विचार देण्याचं काम करू शकतं.

कुठलीही बातमी स्फोटकासारखी असते. तिचा नीट स्फोट झाला तर समाजात थोडीफार खळबळ होते, पण नाही झाला तर काहीही होत नाही. फीचर्सचं म्हणजेच कुठल्याही लेखाचं तसं नसतं. तो जितका अभ्यासपूर्ण असतो, जितका जबाबदारीनं लिहिलेला असतो, तितका तो वाचकांना विचारप्रवृत्त करण्याचं, त्यांच्या विचारप्रक्रियेला योग्य चालना देण्याचं आणि चांगलं-वाईट ठरवायला मदत करण्याचं काम करतो.

‘अक्षरनामा’ सुरू केलं, तेव्हा आम्हाला काही मान्यवरांनी आवर्जून आणि पुन्हा पुन्हा सांगितलं होतं की, ऑनलाईन फार मोठे लेख वाचले जात नाहीत. त्यामुळे तुम्ही आठशे-हजार शब्दांपर्यंतचे लेख प्रकाशित करा. पण आज मला हे आनंदानं आणि अभिमानानं सांगायला आवडेल की, ‘अक्षरनामा’वरील बहुतांशी लेख



दोन-अडीच हजारांपासून चार-पाच हजार शब्दांपर्यंतचे असतात. ‘अक्षरनामा’ची आज जी ओळख आहे, ती या सविस्तर लेखांमुळेच.

आज सोशल मीडियाच्या धबडग्यात, फेकन्यूजच्या गदारोळात आणि व्हर्च्युअल वाक्‌युद्धात जनमानस निर्मळ, निकोप आणि विचारप्रवण करण्याचं काम ‘फीचर्स जर्नालिझम’चं करू शकतं. ‘आउटलुक’ या इंग्रजीतील प्रतिष्ठित साप्ताहिकानं २०१५ साली त्यांच्या विसाव्या वर्धापन दिनाचा विशेषांक `The Magic of Magazines' या विषयावर काढला होता. त्यात राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक मान्यवर लेखक-पत्रकारांनी एकमुखानं ‘फीचर्स-जर्नालिझम’ला भविष्यात चांगले दिवस येणार आहेत, असंच सांगितलं आहे.

वर्तमानपत्रं बातम्या व वृत्तलेख यापलीकडे जाऊन साधार, सविस्तर विवेचन-विश्लेषण करू शकत नाहीत, हे अलीकडच्या काही वर्षांत आपल्याला दिसतंच आहे. त्यांची साप्ताहिक रविवार पुरवणी आणि त्यातील लेखांचा आकारही आक्रसत गेलेला आहे. पण झालंय काय की, आपले आग्रह पुढे रेटण्यासाठी बहुतेकदा तंत्रज्ञानाचा बागुलबुवा उभा केला जातो. पण गांभीर्यानं काम करू इच्छिणाऱ्या कुठल्याही नियतकालिकाला नवं तंत्रज्ञान नेहमीच उपयुक्त ठरत आलं आहे. तंत्रज्ञान हे सर्जनशीलतेला नवा पैलू बहाल करण्याचं काम करतं.

‘अक्षरनामा’ची पत्रकारिता ही ‘समांतर-पत्रकारिता’ आहे. ‘समांतर सिनेमा’ किंवा ‘प्रायोगिक नाटक’ जसं असतं, तशीच ‘समांतर पत्रकारिता’ही असते. समांतर सिनेमा किंवा प्रायोगिक नाटक सर्वसामान्य प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्यात आर्थिक गणितं अडचणीची ठरतात. तसंच समांतर पत्रकारितेचंही असतं. मात्र ऑनलाईन माध्यमामुळे डेस्कटॉप, लॅपटॉप, टॅब, फॅब असणाऱ्यांपासून साधा स्मार्ट फोन असणाऱ्यांपर्यंत कुणालाही कुठलंही फीचर पोर्टल सहजपणे वाचता येतं.

तंत्रज्ञानाच्या या सुलभतेमुळे ‘अक्षरनामा’ला गेल्या पाच वर्षांत मिळत आलेला प्रतिसाद दिवसेंदिवस वाढतोच आहे. या पाच वर्षांची येत्या काळात पंचवीस वर्षं करण्याचं बळ ‘महाराष्ट्र फाउंडेशन’च्या या पुरस्कारानं दिलं आहे. त्यासाठी संयोजक आणि पुरस्कार निवड समितीचे मनापासून आभार. त्याचबरोबर ‘अक्षरनामा’ची मूळ संकल्पना ज्यांची आहे ते निलेश पाष्टे, ‘अक्षरनामा’ला वेळोवेळी लेखनसाह्य करणारा लेखक परिवार आणि माझ्या वेडेपणाला सांभाळून घेणारी माझी बायको - भाग्यश्री आणि मुलगी - मुद्रा यांच्याविषयी ऋण व्यक्त करून थांबतो.

धन्यवाद.

**राम जगताप**
८१०८४१३७२०

# वंचित समाजाच्या न्याय्य हक्कासाठी सातत्याने झटणारे : सुरेश सावंत

**अश्विनी रानडे**



ऐतिहासिक वास्तू कालौघात गडप होतात. तथापि, कधीतरी त्या उत्खननात सापडण्याची शक्यता असते. विचार, संकल्पना व मूल्ये मात्र अशी टिकत नाहीत. ती विस्मरणात जाणे, त्यांचा अर्थ बदलणे, ती भ्रष्ट होणे सहज शक्य असते. त्यासाठी विचार हे सतत जनतेत मांडत राहावे लागतात. बदलत्या परिस्थितीनुसार त्यांचा विकास करावा लागतो. हा उतारा आहे सुरेश सावंत यांनी लिहिलेल्या 'जनता कृतघ्न आहे?.....' या लेखातील.

विवेकवादी विचार लोप पावत चाललेल्या आणि इतिहासाचा अर्थ आपल्या सोयीनुसार लावत पुरोगामी विचार व मूल्ये भ्रष्ट करण्याचा प्रयत्न होत असलेल्या आजच्या वातावरणात वरील उतारा फार महत्त्वाचा आहे. पुरोगामी मूल्यांची जोपासना करण्याचे आणि बदलत्या परिस्थितीनुसार त्यांचा विकास करण्याचे कार्य सुरेश सावंत सातत्याने करत आहेत.

स्त्री-पुरुष समानता, अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन, अन्न अधिकार, जाती अंताची चळवळ, संविधानातील मूल्यांचा प्रसार अशा विविध विषयांवर कधी लिखाणातून तर कधी प्रचार सभांमधून, बैठकांमधून त्यांनी सक्रियपणे काम केले आहे, आजही करत आहेत.

सुरेश यांचा जन्म १९६५मध्ये मुंबईतील चेंबूर भागात असलेल्या लेबर कॅम्प जवळील झोपडपट्टीत

एका बौद्ध कुटुंबात झाला. वडील गिरणी कामगार आणि आई घर सांभाळणारी एक कष्टाळू स्त्री. घरची परिस्थिती गरिबीची. दोघांच्याही मनात गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी अपार भक्तिभाव. याचा परिणाम सुरेश यांच्यावरही होत होता. शालेय शिक्षण सुरू झाले होते. अस्पृश्यतेचे जिणे झुगारून बाबासाहेबांनी विज्ञान आणि नीतिमत्तेवर आधारित बौद्ध धर्म आपल्याला दिला याचा सार्थ अभिमान बाल वयातच सुरेश यांना वाटू लागला.

त्याच सुमारास आजूबाजूला दलित पँथरची चळवळ सुरू झाली होती. नवीन विचार कानावर पडत होते, राजकीय चर्चा ऐकू येत होत्या आणि आपणही सामाजिक - राजकीय काम केले पाहिजे असे त्यांना तीव्रतेने वाटत होते.

आपल्या शालेय जीवनातच सुरेश यांनी सामाजिक कार्याला सुरुवात केली. एस.एस.सी. परीक्षेत ७७ टक्के गुण मिळविणारा त्या वस्तीतील सुरेश हा पहिलाच विद्यार्थी. ज्या वस्तीत घर होते तिथे कोणाच्याही घरात अभ्यासाला जागा नाही, वीज नाही आणि मुख्य म्हणजे घरामध्ये शिक्षणाला पोषक असे वातावरण नाही. यावर मार्ग म्हणून त्या वस्तीतील काही जणांनी १९८० मध्ये 'प्रागतिक विद्यार्थी संघ' स्थापन केला. त्यात सुरेश यांचा पुढाकार होता. बुद्धविहारात एकत्रितपणे अभ्यास करणे, वयाने आपल्यापेक्षा लहान असलेल्या विद्यार्थ्यांना शिकवणे, निरनिराळ्या विषयांवर व्याख्याने आयोजित करणे अशी विविध कामे उत्साहाने सुरू झाली. एक प्रकारे सुरेश यांच्या सामाजिक-राजकीय कामाची सुरुवातच झाली. मुंबईत काम करत असताना गावी कोकणात बौद्ध युवा मंच ही संघटना स्थापन करून त्यांनी अंधश्रद्धेविरुद्ध आवाज उठविला.

सुरेश यांचे वडील गिरणी कामगार होते. डॉ. दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या संपाच्या काळातच ते निवृत्त झाले. घरात आई-वडील आणि धाकटा भाऊ आणि कमावणारे कोणीच नाही. त्यामुळे महाविद्यालयीन शिक्षण घेणे इच्छा असूनही त्या वेळी त्यांना शक्य झाले नाही. लोकांच्या मदतीने त्यांनी डी.एड. करून वयाच्या १९व्या वर्षी नोकरी धरली. प्रथम विलेपार्ले मधील माधवराव भागवत हायस्कूल आणि नंतर चेंबूरमधील मुक्तानंद हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षकाची नोकरी केली. मुक्तानंद शाळेतील पर्यवेक्षिका श्रीमती रजनी लिमये यांनी सुरेश सावंत यांची भेट आपले वडील भाऊ फाटक यांच्याशी घालून दिली.

भाऊ फाटक हे लाल निशाण पक्षाचे कार्यकर्ते आणि माजी शिक्षक आमदार. शिवाय सुरेश यांनी आठवी ते दहावीचे शिक्षण ज्या चेंबूर हायस्कूलमध्ये घेतले होते त्या शाळेचे भाऊ हे निवृत्त शिक्षक. सुरेश हे भाऊंना प्रथमच भेटत होते. आंबेडकरी समाजातील लोकांनी गांधीवादी, समाजवादी, कम्युनिस्ट लोकांपासून जरा जपूनच राहावे हा विचार डोक्यात पक्का असल्यामुळे भाऊंबरोबरच्या पहिल्या भेटीत सुरेश यांचा पवित्रा भाऊंना तपासून बघण्याचाच होता, त्यांना बारकाईने टिपण्याचा होता. मात्र भाऊंबरोबर झालेल्या चर्चेच्या ओघात हा पवित्रा हळूहळू बदलत गेला.

आपल्या शालेय जीवनाच्या काळात दलित पँथरच्या चळवळीने धरलेला जोर आणि त्याच वेगाने तिची झालेली वाताहत सुरेश यांनी जवळून पाहिली होती. आंबेडकरी चळवळीचे होत असणारे पतन दिवसेंदिवस त्यांना अस्वस्थ करत होते. आपल्या भोवतालचे राजकारण, निरनिराळ्या विचारसरणीचे कार्यकर्ते, त्यांची व्यवहारपद्धती इ. विषयी अधिक जाणून घेण्याची इच्छा मनात होती. या काळात

विविध विषयांवर भाऊंबरोबर झालेल्या चर्चा, त्यांनी घेतलेले अभ्यासवर्ग ऐकून सुरेश यांच्या मनात अनेक संघर्ष उभे राहिले. शंकांचे निरसन करता करता विचारांना आणि व्यवहाराला व्यापक संदर्भ चौकट मिळू लागली. मनातील बुद्ध आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा अधिक रेखीव व नेमक्या झाल्या आणि भोवतालच्या राजकीय-सामाजिक परिस्थितीचे विरोधविकासवादी पद्धतीने विश्लेषण करण्याची क्षमता त्यांच्यात तयार झाली. वंचित समाज घटकांच्या उद्धारासाठी आयुष्य वेचण्याचा शालेय जीवनातच त्यांनी घेतलेला निर्णय अधिकाधिक पक्का होत गेला.

मुक्तानंद हायस्कूलमध्ये नोकरी करता करता एकीकडे सुरेश यांनी मराठी विषयात बी.ए. आणि एम.ए. केले. विशेष म्हणजे एम. ए. ला मुंबई विद्यापीठात प्रथम वर्ग मिळविला. एखाद्या महाविद्यालयात अध्यापक व्हावे हा अनेकांनी दिलेला प्रेमळ सल्ला नाकारून त्यांनी समाज परिवर्तनाच्या चळवळीत पूर्ण वेळ कार्यकर्ता होण्याचा निर्णय प्रत्यक्षात आणायचे ठरविले.

एम. ए. करत असताना स्त्रीमुक्ती संघटनेच्या विविध उपक्रमांत ते भाग घेत असत. ज्योती म्हापसेकर यांनी लिहिलेल्या 'मुलगी झाली हो' या नाटकाच्या प्रयोगांना हजर राहत असत. 'हुंडा नको गं बाई' या नाटकात ते मुलीच्या वडिलांची भूमिका करत असत. याच दरम्यान संघटनेतील सुवर्णा भुजबळ या कार्यकर्तीशी त्यांचा परिचय झाला आणि लवकरच लग्नही झाले. केवळ आंतरजातीय नव्हे तर आंतरधर्मीय लग्न आणि तेही वरच्या जातीतील, तुलनेने बरी आर्थिक स्थिती असलेल्या कुटुंबातील मुलीशी, हे सगळेच आव्हानात्मक होते. पण सुरेश-सुवर्णा यांचे एकमेकांवरील प्रेम, विश्वास आणि त्यांच्या भोवतालच्या आमच्यासारख्या अनेक कार्यकर्त्यांची भक्कम टीम यांमुळे हे आव्हान लीलया पेलता आले.

इथे एक गोष्ट नमूद करायला हवी. १९८५च्या आसपास स्त्री मुक्ती संघटनेमध्ये सक्रिय झालेल्या आम्हा बऱ्याच कार्यकर्त्यांची लग्ने चळवळीच्या परिसरातच ठरली. दोघांपैकी एकाने अर्थार्जनाची जबाबदारी उचलायची आणि दुसऱ्याने पूर्ण वेळ सामाजिक - राजकीय कामासाठी द्यायचा ही रचना त्यातील काही जोडप्यांनी मनोमन स्वीकारली. आजतागायत ही रचना विनातक्रार सुरू आहे. सुरेश - सुवर्णा हे यातलेच एक जोडपे.



चुकीच्या रेशनिंग धोरणाच्या विरुद्ध काढलेली प्रतिकात्मक शवयात्रा

वयाच्या २५व्या वर्षी लग्न, त्याच वर्षी एम.ए. आणि त्याच वर्षी शिक्षकाची नोकरी सोडून पूर्ण वेळ कार्यकर्ता होण्याचा (फुलटाइमरशिप) निर्णय हे सर्व सुरेश यांना शक्य झाले ते पत्नी सुवर्णा, चळवळीतील इतर सहकारी आणि भाऊ फाटक यांच्या भक्कम पाठिंब्यामुळे. पूर्ण वेळ कार्यकर्ता या नात्याने सर्वांत पहिली जबाबदारी आली

ती सांगलीमधील वाळवे येथे स्वातंत्र्य सैनिक नागनाथ नायकवडी यांच्या पुढाकाराने चाललेल्या चळवळीच्या एका मुखपत्राचे 'कार्यकारी संपादक' म्हणून काम करण्याची. लाल निशाण पक्षाचे एस. के. लिमये, यशवंतराव चव्हाण आणि दत्ता देशमुख यांना नागनाथ अण्णा खूपच मानत असत. सुरेश यांनी वाळवे येथे राहून मुखपत्राचे काम करण्यास सुरुवात केली परंतु काही कारणास्तव अल्पावधीतच त्या कामातून मोकळे होऊन ते मुंबईला परतले.

स्त्री मुक्ती संघटनेचे उपक्रम, डॉ. माधव चव्हाण यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या साक्षरता चळवळीत सहभाग, जमेल तशी ट्रेड युनियनच्या कामाला मदत, लाल निशाण पक्षात कार्यकारिणी सदस्य म्हणून काम अशा विविध प्रकारे ते मुंबईत पुन्हा क्रियाशील झाले. इथे विशेष उल्लेख करायला हवा तो रेशनिंगच्या चळवळीचा. रास्त दरात स्वच्छ धान्य मिळणे हा रेशन कार्ड धारकांचा हक्क आहे, या यंत्रणेतील भ्रष्टाचार थांबला पाहिजे, यासाठी लोकांना संघटित केले पाहिजे या हेतूने मिलिंद रानडे यांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या 'रेशनिंग कृती समिती'मध्ये सुरेश यांचे भरीव योगदान आहे. १९९४ ते २००९ ही पंधरा वर्षे ते रेशनिंग चळवळीत पूर्ण वेळ काम करत होते. मुंबईत सुरू झालेल्या या चळवळीशी महाराष्ट्रातील बऱ्याच संघटना जोडल्या गेल्या. देश पातळीवरील 'अन्न अधिकार' मोहिमेचा एक भाग या नात्याने महाराष्ट्रात सुरू झालेल्या 'अन्न अधिकार अभियान' या आघाडीचा पाया रेशनिंग कृती समितीच्या कार्यामुळे घातला गेला.

महिला सक्षमीकरण, साक्षरता, रेशनिंग या सामाजिक प्रश्नावर काम चालू असताना भोवतालचे राजकीय वातावरण मात्र अस्वस्थ करणारे होते. १९९२-९३ च्या काळात बाबरी मशिदीचे प्रकरण आणि त्यानंतर उसळलेल्या दंगली सुरेशसारख्या हजारो कार्यकर्त्यांना हादरून टाकत होत्या. काळाची गरज ओळखून सर्व लोकशाही शक्तींना, गटांना एकत्र आणण्याच्या हेतूने स्थापन करण्यात आलेल्या राष्ट्रीय एकता समितीच्या कामात सुरेश पुढाकाराने सामील झाले. वस्तीत जाऊन छोट्या-मोठ्या सभा घेणे, नाका सभा घेणे, दंगली पुन्हा होऊ नयेत म्हणून धार्मिक सलोखा, सर्वधर्मसमभाव या मूल्यांचा प्रचार करणे सुरू झाले. देशात फॅसिस्ट शक्ती वाढतच होत्या. २००४ आणि २०१९मध्ये झालेल्या निवडणुकांच्या निकालातून याची प्रचिती आपल्या सर्वांनाच आली. पुरोगामी चळवळीची पीछेहाट होताना दिसत होती. आपला देश वाचवायचा असेल तर देशाचे संविधान वाचवले पाहिजे या प्रेरणेने २०१९ मध्ये इतर सहकाऱ्यांच्या समवेत 'संविधान संवर्धन समिती'ची स्थापना केली आणि या महत्वाच्या कामास चालना दिली. संविधानातील मूल्यांचा प्रचार करण्यासाठी वस्ती वस्तीत जाऊन शिबिरे घेणे, विद्यार्थ्यांसोबत बैठका घेणे, चर्चा करणे, संविधान जागर यात्रा काढणे, संविधान दिन साजरा करणे असे विविध मार्ग ते वापरत असतात. संविधानाच्या संवर्धनाचे काम करत असताना आंबेडकरी समूहाला निरनिराळ्या पुरोगामी विचार प्रवाहांबरोबर आणि गटाबरोबर जोडण्याचा प्रयत्न ते कसोशीने करतात. सध्या ते संविधान संवर्धन समितीचे काम अग्रक्रमाने करत आहेत.

विविध प्रश्नांवर प्रत्यक्षात काम करत असताना निरनिराळी मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्रे यात ते सातत्याने लिहीत असतात. त्यांचे लिखाण वाचून वाचकांच्या जाणिवा विस्तारतात आणि समज अधिक विकसित होतो असा अनुभव जवळजवळ प्रत्येकालाच येतो. विषय कितीही गंभीर असला तरी तो साध्या व सुलभ भाषेत, सर्वसामान्य लोकांना कळेल अशा भाषेत मांडण्याची हातोटी त्यांच्याकडे आहे.

नवीन काळात तयार झालेली ऑनलाईन नियतकालिके, फेसबुक पेज, व्हाट्स अप, ब्लॉग अशा डिजिटल समाज माध्यमांवरही ते सक्रिय आहेत. अक्षर प्रकाशनतर्फे त्यांच्या निवडक लेखांचे एक पुस्तक 'गुंता आणि उकल' या नावाने डिसेंबर २०१९मध्ये प्रकाशित झाले आहे. महाराष्ट्रात सुरेश यांचा एक वाचक वर्ग तयार झाला आहे आणि तो दिवसेंदिवस वाढत आहे.

या लेखाच्या सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे विचार, संकल्पना व मूल्ये मात्र अशी टिकत नाहीत. ती विस्मरणात जाणे, त्यांचा अर्थ बदलणे, ती भ्रष्ट होणे सहज शक्य असते याचे भान ठेवून सुरेश सावंत अतिशय सम्यकपणे समाजाची मानसिकता बदलण्यासाठी, वंचित समाज घटकांच्या न्याय हक्कासाठी सातत्याने काम करत आहेत. पुरोगामी विचार आणि मूल्ये यांचा प्रचार करत आहेत, ती भ्रष्ट होऊ नयेत यासाठी झटत आहेत.

स्त्रीमुक्ती, साक्षरता, रेशनिंग अशा व्यापक प्रश्नावर सामाजिक काम करणाऱ्या जनसंघटना या कोणत्याही एका राजकीय पक्षाशी जोडल्या जाऊ नयेत असा त्यांचा कटाक्ष असतो. जनसंघटना आणि पक्षसंघटना यातील फरक ते जाणतात. जनसंघटनेचे काम पक्षनिरपेक्ष पद्धतीने केले तरच ते अधिक प्रभावी होते आणि जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचते या विश्वासाने ते पक्षनिरपेक्षतेचा आग्रह धरतात.

मात्र एखाद्या राजकीय पक्षाशी आणि विचारसरणीशी बांधिलकी म्हणजे व्यक्तिगत स्वातंत्र्याचा संकोच आणि आपली मते बिनबोभाटपणे व्यक्त करत एकट्यानेच काम करणे म्हणजे बाणेदारपणा असे ते अजिबात मानत नाहीत. अशा प्रकारचा सडेतोडपणा आणि बाणेदारपणा त्यांना मान्य नाही.

सुरेश सावंत यांना मी जवळजवळ पस्तीस वर्षांपासून ओळखते. इतक्या वर्षात कधीही मी त्यांना आक्रस्ताळेपणाने व्यवहार करताना पाहिलेले नाही. ते कोणाशीतरी वरच्या आवाजात बोलताहेत, एखाद्याच्या अंगावर ओरडताहेत, एखाद्याची अवहेलना करताहेत, आरडाओरडा करताहेत असा एकही प्रसंग मला आठवत नाही. आपले मत व्यक्त करताना नम्रपणे, ठामपणे, योग्य शब्दांचा वापर करत बोलणे हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. एखाद्याला विरोध करताना, मग तो विरोधक कितीही आक्रमक असला तरी, सुरेश आपले मत निर्भीडपणे आणि शांतपणे मांडतात.

राजकीय विचारांच्या पक्केपणाइतकेच महत्त्व आपण आपल्या वृत्तीच्या घडणीलाही दिले पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. शांतपणा, नम्रपणा, सहिष्णुता आणि करुणा या वृत्तीने ते समाज परिवर्तनाच्या चळवळीत कार्यरत आहेत.

'पददलितांची पिळवणुकीतून मुक्ती व्हावी हा एकच ध्यास
मनी घेऊनी जाऊ आपण निर्मू आपला नवा समाज'

ही प्रेरणा उराशी बाळगून एक स्नेहपूर्ण, समृद्ध व सुंदर मानवसमाज निर्माण करण्यासाठी झटणाऱ्या सुरेश सावंत यांच्या कार्याला मन:पूर्वक शुभेच्छा!

अश्विनी रानडे
९८३३२८४८५३

व्हिडिओवरील भाषण...

# अशा काळात मनांची मशागत करणे हेच मुख्य काम...

मी सुरेश सावंत. मी सामाजिक कार्यकर्ता आहे. विविध कष्टकरी व पुरोगामी चळवळींशी माझा संबंध राहिला आहे. सध्या भारतीय संविधानातील मूल्यांच्या प्रचार-प्रसारात अधिक सक्रिय आहे. महाराष्ट्र फाउंडेशनचा 'कार्यकर्ता (प्रबोधन) पुरस्कार' मला मिळाला आहे. त्यासाठी महाराष्ट्र फाउंडेशनला मन:पूर्वक धन्यवाद. या पुरस्कारासाठी माझी निवड करणाऱ्या फाउंडेशनच्या महाराष्ट्र तसेच अमेरिकेतल्या निवड समितीचा मी खूप आभारी आहे.

मी ज्या बौद्ध समाजात व वस्तीत वाढलो, तिथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर दैवतासमान होते. त्यांच्या विचारांचा प्रभाव व प्रेरणा मूलभूत आहे. मी ज्या स्थितीत वाढलो, ती प्रतिकूल स्थिती केवळ माझी नाही, ती एका व्यापक समूहाची आहे. तिचे कारण वैयक्तिक नाही, तर इथल्या विषमतेवर आधारित व्यवस्थेत आहे. ती व्यवस्था बदलण्याची पहिली प्रेरणा अण्णाभाऊ साठे म्हणतात त्याप्रमाणे 'जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मला भीमराव' ही आहे. बाबासाहेबांमुळे बुद्ध, महात्मा फुले यांच्या विचारांचा परिचय झाला. पुढे पुरोगामी चळवळीशी संबंध आल्यावर मार्क्स तसेच अन्य परिवर्तनवादी विचार व प्रेरणा मला मिळाल्या.

वस्तीत प्रारंभीचे काम हे शिक्षणाचे. तो आमचाही प्रश्न होता. परस्परांना मदत करत आम्ही शिकत होतो. तसेच आमच्याहून कमी इयत्तांच्या मुलांचे शिकवणी वर्ग घेत असू. 'अत्त दीप भव' म्हणजे 'उद्धारकर्त्याची वाट न पाहता स्वत:च दिवा व्हा म्हणजे भोवतालचा अंधकार दूर होईल' या बुद्धाच्या संदेशातून आम्हाला दिशा मिळत होती. या प्रयत्नांतून आम्हाला तसेच आमच्या सोबतच्या अनेकांना शिक्षणात व करिअरमध्ये पुढे जाण्याची दिशा मिळाली. स्त्रियांवरील कौटुंबिक अन्यायाच्या सोडवणुकीतून या अडचणीत सापडलेल्या महिलांना काही प्रमाणात आमच्या कामातून आधार नक्की मिळाला.

ट्रेड युनियनच्या कामातून कामगारांचे वैयक्तिक तसेच सामूहिक प्रश्न मार्गी लागण्यात आम्ही साह्यभूत ठरलो. दीर्घकाळ रेशनच्या प्रश्नावर मी काम केले. या आमच्या लढ्यातून स्थानिक पातळीवर गरीब रेशन कार्डधारकाला नियमानुसार रेशन मिळण्याबरोबरच सरकारला काही धोरणात्मक बदल करण्यास आम्ही भाग पाडू शकलो. ज्यांचे अस्तित्व सिद्ध करण्याचे काहीही कागदोपत्री पुरावे नाहीत, अशा भटक्या, कचरा वेचक, असंघटित कामगार या अति शोषित विभागांना कोणत्याही कागदोपत्री पुराव्याशिवाय रेशन कार्ड मिळवून देऊ शकलो. परित्यक्ता, नाइलाजाने देहविक्रय करणाऱ्या महिला, तृतीयपंथी यांना रेशनच्या कक्षेत आणण्यात आमच्या लढ्याला बऱ्यापैकी यश आले. सध्या संविधानातील मूल्यांचा प्रचार हा प्रबोधनाचा मुख्यत: भाग आहे. त्याचे मोजमाप कसे करावे ठाऊक नाही. पण आम्ही संविधान दिनी हजारोंच्या संख्येने संविधान यात्रा काढू शकलो. त्यात मतभिन्नता असलेल्या लोकशाहीवादी प्रवाहांना आम्ही एकत्र आणू शकलो, ही मिळकत मानावी लागेल.

पुरस्काराने कामाची दखल घेतल्याचा आनंद नक्की असतो. चार लोकांचे लक्ष वेधले जाते. त्यांना




आमच्या कामाविषयी जाणण्याची उत्सुकता तयार होते. संपर्क वाढतात. आर्थिक साहाय्यही मदतनीस ठरते. या पुरस्काराबाबतही हेच म्हणावे लागेल.

देशातील व समाजातील वाढती असहिष्णुता, जात-धर्मावरून होणाऱ्या ताणांची तीव्रता, संविधानातील मूल्यांविषयीची जाण कमी, गैरसमज अधिक अशा काळात मनांची मशागत हा मुख्य भाग माझ्या कामाचा राहणार आहे. म्हणजेच लिखाण- लेख, पुस्तिका वगैरे. शिबिरे, अभ्यासवर्ग आणि त्या अनुषंगाने विविध उपक्रम मुख्यत: वस्ती पातळीवर आणि सोबत शाळा, महाविद्यालये या पातळ्यांवर करावे लागणार आहे. हे काम दीर्घ पल्ल्याचे असणार आहे.

धन्यवाद!

सुरेश सावंत, मुंबई
९८९२८६५९३७

# गुंतुनि गुंत्यात साऱ्या... : सिसिलिया कार्व्हालो

**ऊर्मिला पवार**



सिसिलियाला 'टिपंवणी' या तिच्या आत्मकथनाला महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार मिळाला हे वाचून फार आनंद झाला 'टिपंवणी'च्या मुखपृष्ठावर ओल्या मातीत उमटलेले, कोणताच आधार वा सुरक्षा नसलेले अनवाणी पावलांचे ठसे आपल्याला दिसतात. जणू निराधार जगण्यातला संघर्ष आपल्याला ते ठसे दाखवत आहेत असं वाटतं. 'टिपंवणी' या शब्दाला एक नाद आहे आणि तो ठिबकणाऱ्या पाण्याच्या थेंबाशी जोडलेला आहे. पाण्यासाठी करावी लागणारी वणवण... त्यातून उमटलेली वेदना आणि डोळ्यांतून झरणारी टिपं.. या आर्त तृष्णेचा, वेदनेचा ठसा मनावर उमटतो. 'टिपंवणी' मुखपृष्ठ ापासून, नावापासूनच आपल्याशी बोलू लागतं. मातीशी, माणसाशी नातं जोडणारी ही लेखिका सुरुवातीपासूनच आपल्या मनात घर करू लागते.

राखेतल्या फिनिक्स पक्ष्यासारखी ही मुलगी अनंत अडचणींना तोंड देत कशी उभी राहिली हा तिचा जीवन प्रवास थक्क करणारा आहे. या प्रवासाची सुरुवात खऱ्या अर्थाने तिने केलेल्या घरातल्या लाकडी माळ्यावरच्या स्वच्छतेतून झालेली आहे. माळ्यावर ठेवलेले चिंचेचे, भाताचे भरलेले रांजण, चुलीसाठी लागणारी लाकडं, भाताची कणगी, नको असलेले सामान असं धुळीचं साम्राज्य असलेली ती माळ्यावरची लहानशी जागा साफसूफ करून, तिथलं सामान नीट लावून या मुलीनं तिथे आपली

छोटीशी अभ्यासिका तयार केली. या तिच्या कृतीतूनच ‘स्वत:ची जागा स्वत:च निर्माण करण्याची तिची सकारात्मक वृत्ती’ही आपल्याला प्रकर्षाने जाणवते.

कॅथलिक ख्रिस्ती समाजाचे, त्यातल्या वाडवळी भाषेचे तिच्यावर जसे धार्मिक, सामाजिक संस्कार झाले तसेच वसईतल्या खास मराठमोळ्या संस्कृतीचे आणि त्यांच्या रीतिरिवाजांचेही झाले. म्हणूनच महाविद्यालयीन शिक्षणात ‘इंग्रजी की मराठी विषय घ्यावा’ या प्रश्नाला तिच्या सुप्त मनाने मराठी विषय हेच उत्तर दिलं. अर्थात भाषा कोणतीही असो पण समोर जे काही येईल त्याला पुरेपूर न्याय देण्यासाठी खडतर कष्ट करण्याची जिद्द सिसिलियात होती. सिसिलियाच्या संपूर्ण सन्मानाची कमान चढत गेलेली आहे, हे आपल्या लक्षात येतं. शिक्षणाने माणसाच्या जीवनाला आकार येऊ शकतो, आपल्या व्यक्तिमत्त्वात आपण आमूलाग्र बदल घडवू शकतो, आपलं आयुष्य एका उंचीवर नेऊ शकतो, हे सिसिलियाला पुरतं उमगलं आहे. फुले-आंबेडकरी विचारांच्या स्पर्शातून आणि संविधानाच्या आकलनातून सिसिलियानं आपलं उत्तर आयुष्य सुरू होण्यापूर्वीच हे दाखवून दिलं आहे. वसईतच नाही; तर एकूणच समाजामध्ये आधुनिकतेच्या नावाने झरझर होत गेलेले बदल सिसिलियाच्या लेखणीतून झरझर उतरले आहेत.

सिसिलियाच्या भोवतीचा साहित्यिक परिसर तिला पोषकच ठरला. बाजूच्या अनेक लेखकांशी जो काही संवाद झाला, त्यांचं जे काही व्यक्तिमत्त्व तिला दिसलं, प्रतीत झालं, त्यातून ती सजग होत, घडत गेली. त्या व्यक्तींचा उल्लेख करताना, विशेष असलेल्या पाहुण्यांसाठी पुढची रांग राखीव ठेवावी, तसा एक स्वतंत्र विभागच त्यांच्यासाठी आपल्या आत्मकथनात तिने ठेवला आहे आणि त्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त केली आहे.

तिने कोणतीही गोष्ट कुणाकडेही मागितली नाही. तिच्याकडे आत्मसन्मान आणि स्वकर्तृत्व ठासून भरलेलं आहे. जे सन्मानपूर्वक मिळालं ते तिनं घेतलं, पण समाजातल्या धर्ममार्तंडांनी दिलेल्या अपमानकारक वागणुकीमुळे पुढे त्यांनी दिलेले मानसन्मानही तिने नाकारले. मला अनेक अंगांनी सिसिलियाच्या लेखनात, कामात आणि वृत्तीतही पंडिता रमाबाईंची झाक दिसते. पंडिता रमाबाई विदुषी होत्या, समाज शिक्षिका होत्या, स्त्रियांच्या प्रश्नांबद्दल, पददलितांबाबत त्यांना आत्मीयता होती. सिसिलिया विश्वविद्यापीठातली प्राध्यापक आहे. चर्चमध्ये स्त्रियांना मिळणाऱ्या दुय्यम वागणुकीविरोधात









तिने आवाज उठवला. एकल आणि अत्याचारग्रस्त स्त्रियांना मदतीचा हात दिला. इथे एक गमतीशीर साम्य सांगायला हवं. तिची आणि पं. रमाबाईंची जन्मतारीख सारखीच आहे. ‍ तितकाच चकित करणारा मुद्दा दोघींच्या आडनावातही आहे. सिसिलियाच्या 'कार्व्हालो' या शब्दावरून सुचलेला मुद्दा असा की, येशू ख्रिस्ताला 'कॅल्व्हरी' नावाच्या 'डोंगरा'वर सुळावर चढवलं गेलं. इथे 'कॅल्व्हरी' आणि 'डोंगर' यांचं नातं आहे आणि पंडिता रमाबाई यांचे मूळ आडनाव हे 'डोंगरे' आहे. त्यामुळे इथेही 'कार्व्हालो' आणि 'डोंगरे' या दोघी आडनावानेही जवळ आलेल्या आहेत.

सत्य, क्षमा, करुणा, प्रकाश यांचं सूचन करणारं कोणतंही साहित्य वादाच्या भोवऱ्यात सापडता कामा नये, असं सिसिलियाचं परखड मत आहे. स्त्री-पुरुष समानतेबाबत सिसिलियाचं आकलनही अत्यंत पारदर्शी आहे. ख्रिस्ती धर्मीयांच्या कार्यक्रमातून ते तिने वेळोवेळी बोलून दाखवलं आहे. 'बायबल'च्या 'जुन्या करारा'त असं दाखवलं गेलं आहे की, ज्ञानवृक्षाचं फळ प्रथम नग्नावस्थेत फिरणाऱ्या इव्हने खाल्लं आणि तशाच अवस्थेतल्या आदामला खायला लावलं त्यामुळे त्या दोघांची स्वर्गातून हकालपट्टी झाली आणि ते पृथ्वीवर येऊन सामान्य माणूस म्हणून जगू लागले. या कल्पनेत आपल्या विचाराची भर घालत सिसिलियाचे वडील, पाय म्हणत की, ते फळ खाल्ल्याने त्या दोघांना अंगावरच्या वस्त्रांचं भान आलं. सिसिलियाने त्याच्याही पुढे जात मार्मिक आणि स्त्रीवादी भाष्य केलं आहे. ती म्हणते 'ज्ञानाचं फळ इव्हने म्हणजे स्त्रीने आधी खाल्लं म्हणजे स्त्रीला आधी ज्ञानप्राप्ती झाली आणि मग तिने ते ज्ञान आदामाला म्हणजे पुरुषाला दिलं. पुरुषाला ज्ञान देणारी एक स्त्री आहे.' अशा तऱ्हेचे अनेक युक्तिवाद करत सत्याची बाजू लावून धरणारी एक सन्माननीय विदुषी म्हणजेच सिसिलिया आपल्याला 'टिपंवणी'त सतत भेटत राहते.

सिसिलियाचा धर्म ख्रिस्ती आणि 'वाडवळ' मातृभाषा असूनही मराठी भाषेवरचं तिचं प्रभुत्व हे आत्मकथन वाचताना चकित करतं. श्लेष आणि यमकांची पेरणी गद्यातून करताना एक शब्द दुसऱ्या तिसऱ्या अर्थाने फिरवत अनेक ठिकाणी भाषिक सौंदर्याचा प्रत्यय दिलेला आहे. एका शब्दाला अनेक पर्याय देण्याची तिची हातोटी वाखाणण्याजोगी आहे.

सिसिलियाने काही घटना अतिशय मिस्कीलपणेही सांगितल्या आहेत. तिचं मराठी भाषेवर प्रभुत्व असल्याने चर्चमध्ये मुलांचं बारसं करताना आपापल्या बाळांची नावं ठेवण्यासाठी लोक सिसिलियाला





















विचारायला येत, इतकंच नाही तर ती कविता लिहू लागली आणि तिचं नाव पेपरमध्ये झळकू लागलं तेव्हा मृत माणसाबद्दल कवितेच्या ओळी छापण्यासाठी लोक तिच्याकडे आग्रहाने कविता मागत. ओळखीच्या ना पाळखीच्या त्या माणसावर कविता लिहायला सांगणं हा विनोद मुळात वाचण्यासारखा आहे.

तिच्या बोलण्यात करुणा आणि स्वभावात गोडव्याबरोबरच एक कठोर शिस्त आहे. त्यामुळे सिसिलियाशी बोलताना सहजता आणि संयम या दोन वृत्तींचा अनुभव येतो. तिने आपल्या आई-वडिलांची, भावाबहिणींची जबाबदारी त्यांच्याशी जोडलेल्या नाळेतून किंवा कर्तव्य म्हणूनच नाही तर मानवतेतूनही निभावलेली आहे. कोणतीही तडजोड न करता आप्तस्वकीयांवर, आम्हा मित्र-मैत्रिणींवर आणि साहित्यावर ती निर्व्याज प्रेम करत आली आहे. आपल्या अशा वागण्याला, जगण्याला एका ठिकाणी तिने व्रतस्थ योगिनीसारखं जगणं म्हटलं आहे. मला मात्र ती सुरेश भटांच्या कवितेतल्या ओळींसारखी वाटते,

*'रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा, गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा.'*

ऊर्मिला पवार
९८६९८३०४०२

व्हिडिओवरील भाषण...

# थेंबातील सौंदर्य...



सत्यजित रे यांना त्यांच्या बालवयात, रवींद्रनाथ टागोरांनी एक संदेश लिहून दिलेला होता. ''मी सर्व जगभर प्रवास केला, पण स्वत:च्या घराच्या अंगणातील झाडाच्या पानांवरील दवाच्या थेंबातलं सौंदर्य पाहायला विसरलो होतो... ते पाहिलं तेव्हा साऱ्या जगाचं प्रतिबिंब त्यात मला दिसलं... याचा अर्थ काय हे, तुला मोठा झाल्यावर कळेल.'' सत्यजित रे यांनी रवींद्रनाथांच्या या संदेशाचं सोनं केलं. मानवी जीवनातले सूक्ष्मातिसूक्ष्म भाव त्यांनी आपल्या चित्रपटांतून कसे पकडले हे तर सर्वज्ञातच आहे. तात्पर्य असं की, 'टिपंवणी' या आत्मकथनात, माझ्यासमोर उभ्या ठाकलेल्या बऱ्या-वाईट अनुभवाच्या थेंबाथेंबात मला माणसाचं, त्याच्या वृत्तीप्रवृत्तीचं, त्याच्या भावविश्वाचं आणि माझ्याही जीवनाचं दर्शन घडलं. त्या अर्थाने 'टिपंवणी' हे शीर्षकही उचितच आहे. आमच्या गावात पाण्याचं दुर्भिक्ष होतं. आटलेल्या विहिरीत तळाशी पाणी झरत झरत... वळायला खूप अवधी लागायचा. पाणी भरण्यासाठी विहिरीवर नंबर लागायचे... पाणी मिळण्यासाठीचा नंबर, कधी एक-दोन दिवसांनी लागायचा. या प्रसंगाने आम्हाला संवेदनशील व्हायला, प्रतीक्षा करायला शिकवलं. प्रतीक्षेचं फळ मोठं असतं; आणि दीर्घकाळ टिकणारं असतं, हे कळायलादेखील आयुष्याचा बराच काळ प्रतीक्षेत व्यतीत झाला.

आपला संघर्ष हा आपल्या संवेदना लवचिक बनवायला शिकवतो. दुसऱ्यांची भावभावना समजून घेण्याची जाणीव परिपक्व होऊ देतो आणि आपल्या आत डोकवण्याचीदेखील संधी देतो. संघर्षाला सामोरं जाताना आणि संवेदना तळहातावर झेलून बघताना; त्या अभिव्यक्त करताना माझा कस लागला. तथापि, मूल्यसंस्कारांतून झालेली जडणघडण, शिक्षणातून झालेला जागर, साहित्याचा अभ्यास आणि मराठी साहित्याबरोबरच अन्य भाषांतील साहित्याचं वाचन, त्याचबरोबर स्वत:ला अभिव्यक्त करण्यासाठी मिळालेलं मराठी भाषेचं अधिष्ठान, यांमुळे मिळालेली सकारात्मक ऊर्जा, विविध धर्मांच्या अभ्यासातून आणि विधायक तत्त्वांच्या आचरणातून समृद्ध होत गेलेली समज आणि समवायदृष्टी हे सारंच माझं व्यक्तिमत्त्व घडवणारं आणि संपन्न करणारं ठरलं. माझं स्वत्व आणि सत्त्व मला गवसत गेलं...

## अपारंपरिक - वैचारिक टिपंवणी (आत्मकथन)

हे आत्मकथन पहिल्या पानापासून शेवटपर्यंत अनेक अंगांनी बहरलेले, आणि वाचकाला प्रत्येक पानावर गुंगवून ठेवणारे, आणि सतत काहीतरी नवीन शिकवणारे असे आहे. स्त्रियांच्या (आणि एकूणच) आत्मकथनांमध्ये हे निश्‍चितच एक महत्त्वाचा दस्तऐवज ठरेल. यात लेखिकेचा पारदर्शक प्रांजळपणा, आणि स्पष्टवक्तेपणा तर दिसतोच, पण माणसांचे बरेवाईट पैलू पाहत, जोखत असतानादेखील सतत जागरूक असलेली करुणा, समंजसपणा, आणि बुद्धिनिष्ठ मूल्यमापन, हेदेखील जाणवते. बालपणीच्या गरिबीचे, किंवा वडिलांच्या दारूच्या नशेचे, किंवा धर्मगुरूंच्या भोंदूपणाचे चित्रण करतानादेखील ते अतिरंजित किंवा एकारलेले न करता तत्संबद्ध इतर प्रसंग किंवा मतें नोंदवून समतोल साधलेला दिसतो.

स्वत:कडे आणि इतरांकडे शक्यतो वस्तुनिष्ठ दृष्टीने पाहून सारासार विचार मांडण्याची लेखिकेची प्रामाणिक शैली आहे. जीवनाच्या प्रवासात कितीजणांचे किती प्रकारचे ऋण आपल्यावर आहे, ते तिने वेळोवेळी नोंदवले आहे. सहृदयता आणि सखोल विचार करून घेतलेले आयुष्यातील अनेक निर्णय तिने त्यांतील व्यामिश्रतेसह नीट उलगडून दाखवले आहेत. प्रथमप्रथम नन् होण्यासाठी कॉन्व्हेंटात जावे, की लग्न करून संसारात राहावे, हे द्वंद्व छळत असूनदेखील हळूहळू त्याऐवजी आपल्याकडे एक तिसरा पर्याय आहे, याची जाणीव अंकुरलेली पाहताना हे सगळे नाट्य मनोज्ञ वाटते. अगदी लहानपणच्या पोलियोग्रस्त, बुजऱ्या आणि अबोल अशा गरीब घरातील मुलीच्या व्यक्तिमत्त्वातून हळूहळू स्वयंशिस्त आणि अभ्यास यातून बहुश्रुत बनलेली, अनेक सभांमधून सहज वक्तृत्व गाजवणारी, आणि आत्मविश्‍वासपूर्ण संशोधक, इथपर्यंतचा लेखिकेचा प्रवास फारच मनोवेधक, उद्‌बोधक पद्धतीने मांडला आहे.

वसईतील वाडवळ ख्रिस्ती समाजात जन्मून, वाढून, त्यातून अभ्यासाच्या जोरावर बाहेरच्या अधिक विशाल जगात पदार्पण झाल्यावर त्यातून मराठी भाषा, साहित्य आणि वैचारिक लेखन यांच्या प्रांगणात चौफेर संचार करताना लेखिका दोन्हीकडे बुद्धिवादाच्या आणि स्त्रीवादाच्या भूमिकेतून स्वतंत्र विचार मांडत आणि स्वत:च्या पटलेल्या भूमिकेचे वैचारिक समर्थन करीत राहते, पण कुठेही त्यात, एखादे वेळी यश आले नाही तर कटुता आलेली दिसत नाही. उलट स्पर्धक, परीक्षक, नातेवाईक आणि संपर्कात आलेले इतरेजन, प्रत्येकाच्या वेगवेगळ्या पैलूंचेदेखील तिने योग्य भान ठेवलेले दिसते. आत्मकथनासारख्या तारेवरची कसरत असलेल्या लेखनात कुठेही कसलाही तीव्र स्वर न लावता ते तिने रंजक आणि चिरस्मरणीय केले आहे.

→

→

वाडवळ ख्रिस्ती लोकांची बोली, प्रमाण मराठी भाषा, इंग्रजी, हिंदी, लॅटिन आणि संस्कृत एवढ्या भाषांच्या अंगणात लेखिका सहज बागडू शकते. या पुस्तकातील भाषावैभव आणि भाषेच्या सौंदर्याची, सामर्थ्याची जाणीव अतिशय प्रगल्भ आहे. कविता, कथा आणि मिथके, यांसह लखलखीत वैचारिक साहित्याचे देखील वरदान लेखिकेला लाभलेले आहे, आणि त्या सगळ्यांसह ती आपल्याला स्वत:च्या आयुष्याच्या प्रवासात बरोबर घेऊन जाते. हे लेखन अनेक अंगांनी मराठीला समृद्ध करणारे ठरेल, यात शंका नाही.

**विद्युल्लेखा अकलूजकर**
(साहित्य पुरस्कार निवड समिती, अमेरिका, यांच्या वतीने)
+1(778)953-5346

भाषेची सेवा केली की, भाषेचं सामर्थ्य आणि सौंदर्यही प्राप्त होतं. वाडवळी ही माझी मायबोली. ती माझी पोटातली भाषा, आणि प्रमाण मराठी ही माझी पोटाची भाषा! मराठी भाषेचं अध्यापन हे केवळ अर्थार्जन करण्यापुरतं मर्यादित नव्हतं. त्यातून मराठीच्या पोटात दडलेल्या अनेक बोलींचा व त्यातून समृद्ध झालेल्या मराठी भाषेचा आणि भाषाभगिनींचा अभ्यास आणि सहवास घडत गेला. माझ्या जाणिवा त्यातून समृद्ध झाल्या. बोलभाषेला वाकवण्याची ताकद तर वाढत गेलीच परंतु शब्दांच्या व्युत्पत्ती शोधण्याकडे... मुळं खणून काढून त्यातलं उत्तर शोधण्याकडे कल होऊ लागला. अन् संस्कारक्षमता सकारात्मक व स्पंदनशील होऊ लागली.

आपण एकदा प्रवासाला निघालो की, लक्षात येतं, आपली काळजी घेणारे वाटेत अनेक जण आहेत. घनदाट सावली देणारे अनेक वृक्ष वाटेवर उभे आहेत. माझ्या लेखनप्रवासात अनेक साहित्यिकांच्या बाबतीत हा अनुभव मला आला.

अशी ही कलाकृती महाराष्ट्र फाउंडेशनच्या प्रतिष्ठाप्राप्त पुरस्कारास पात्र ठरावी याचा मनस्वी आनंद वाटतो... महाराष्ट्र फाउंडेशनच्या रूपाने एका वटवृक्षाची छायाच मिळाली आहे... त्यांचे मी मनस्वी आभार मानते.

**डॉ. सिसिलिया कार्व्हालो,** वसई
७३७८३८२०६५

# व्यवस्थेला जाब विचारणारी रणरागिणी : सुनीता भोसले

**राहुल खांडेकर**



जिचा जन्मच नाकारला गेला. पारधी म्हणून व्यवस्थेनेसुद्धा झिडकारलं. बालपण जिला जगताच आलं नाही. वडिलांच्या प्रेमापासून जी वंचित राहिली. पोटभर भाकर कधी पोटाला भेटली नाही. गावात भीक मागून घर पोसण्याचं काम करत राहिली. अनवाणी पायाने गुरं राखायची. गावकुसबाहेरील वस्तीत पोलीस येऊन कुणालाही कधी उचलतील याचा नेम नाही, याचे भीतीत तिचं जगणं. शिक्षणाची सगळी वाताहत. काही ध्येय नव्हतं, ना भविष्याची चिंता, ना जिंदगानीची चीड. सारं गुलामीचं जगणं जगत होती. नशीब गोड मानून पुढे चालत होती. अशात एक बाबा भेटतो. तिच्या जीवनाचा अर्थ समजावून सांगतो. पहिल्यांदाच तिच्याशी वस्तीतील व्यक्ती हे आदराने बोलतात, प्रेमाने विचारपूस करतात. 'आपण माणूस आहोत' याचा पहिल्यांदा प्रत्यय तिला आला. तिच्या जीवनात क्रांती झाली... आणि तिने तिच्यासारख्या अनेकांच्या जीवनात क्रांती आणण्याचं काम केलं... ही प्रेरणादायी कहाणी आहे 'क्रांती संस्थेच्या' अध्यक्षा.. सुनीता भोसले यांची.

सुनीताची घरची परिस्थिती खूप हलाखीची होती. बापाचं काम 'तितर ल्हाव्हऱ्याची शिकार' करणं आणि त्यातून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालायचा. सुनीता भोसले यांचा जन्म १९८२ मध्ये शिरूर तालुक्यातील आंबळे या गावी झाला. याच सालात अनिता- सुनीताची मोठी बहीण आणि त्यानंतर

एक भाऊ (जो मयत झाला) त्याचासुद्धा जन्म एकाच वर्षी झाल्याची शाळेच्या दाखल्यावर नोंद आहे. अनीतानंतर झालेला भाऊ वारल्यामुळे प्रेग्नंट राहिलेल्या सुनीताच्या आई व वडिलांना मुलगाच हवा होता. पूर्वी बाळंतपण घरीच होत असे. सुनीताच्या आईला कळा सुरू झाल्याने वडिलांनी पारधी प्रथेप्रमाणे पोटावर पाय देऊन मूल होण्यास मदत केली. या वेळी ताई नावाची एक बाईच आईजवळ होती, बापाला 'मुलगी' झाल्याचे कळताच तो बाप दूर जाऊन बसला आणि आईनेसुद्धा मान फिरवली. घरात पाळलेल्या कुत्र्याने अक्षरश: तिला उचललं व त्यानंतर आईने सुनीताला कुत्र्याच्या तावडीतून सोडवून आणलं. घरात नाराजीचं वातावरण होतं. त्यामुळे तिच्याकडे सतत दुर्लक्ष करण्याचं काम कुटुंबाने केलं, बापाने कधी तिला कुरवाळलं नाही की जवळ घेतलं नाही.

अशातच सुनीता चार वर्षांची असताना सुनीताच्या वडिलांचा घातपात झाला. घरची परिस्थिती खालावली, खायला अन्न मिळेनासं झालं. पारधी जमातीत सामाजिक प्रथा होती की, नवरा मेल्यानंतर त्या स्त्रीचा प्रपंच हा दिरासोबत लावून दिला जायचा. सुनीताच्या आईलासुद्धा दिरासोबत प्रपंच करण्यासाठी विचारण्यात आलं. तीन मुलं असलेल्या सुनीताच्या आईने नकार दिला, त्यामुळे सुनीताचा काका तिच्या आईला शिव्या घालून लगट करण्याचा प्रयत्न करायचा. सुनीताच्या आईचं रक्षण करण्याची जबाबदारी सुनीताची आजी आणि तिच्या भावंडांनी पार पाडली.

सुनीता नंतर झालेल्या भावाला (अविनाश) आणि अनिताला शाळेत टाकलं होतं. सुनीताला मात्र शाळेत टाकलं नव्हतं. तिला गुरं राखण्याचं काम देण्यात आलं. शाळेतून आलेल्या बहीण-भावांच्या कविता ऐकून तिलासुद्धा शाळेत जाण्याचा मोह आवरत नव्हता. सतत आईला शाळेत जाण्याचा हट्ट सुनीता करू लागली. सुनीताच्या आईला एकदा तिच्या वडिलांनी कसल्याशा भांडणातून दगड मारला आणि आईचा हात कायम अपंग झाला होता, त्यामुळं ती काम करू शकत नव्हती. अशात सर्वांना अन्न देण्याची जबाबदारी ही सुनीताचीच.

शाळेत गेल्यास अन्न कोण आणणार हा प्रश्न असल्याने सुनीताला शाळेत घालता येणं शक्य नव्हतं. सर्वांच्या जेवणाची व्यवस्था करण्याच्या अटीवर आईने सुनीताला शाळेत घातलं. शाळेतून आल्यानंतर सुनीता गावांत भाकर मागायची. कुणाच्या घरी भाकरीसाठी सडासारवण करून द्यायची. मिळेल ते काम करायची. त्याच्या बदल्यात भेटलेल्या भाकऱ्या घरी आणून सर्वांना खायला मिळत असे. पण एक गोष्ट, हरिजन वस्तीत मात्र भीक मागण्यास आईने सुनीताला बंदी केली होती. सुनीता आंबळे गावाजवळील ५ किलोमीटरवर असलेल्या नावरे गावात भरलेल्या बाजारानंतर फेकून दिलेले बटाटा, वांगी, कोबी अशा भाज्या ह्या पायी जाऊन जमा करून आणायची आणि आठवडाभर पुरवायची. गावात कधी मेलेल्या कोंबड्या, बकऱ्या घरी घेऊन येऊन त्याचे मटण वाळवून अनेक दिवस पुरवण्याचे काम करत असत. एकदा शाळेचे कपडे घेण्यासाठी सुनीताने आई जवळ हट्ट केला. पण पैसे नसल्याने ते शक्य नव्हतं. त्याच दरम्यान अविनाशला गावातील दूरच्या शेतात दोन-तीन दिवसांपूर्वी मेलेल्या बकरीची माहिती मिळाली. बकरीला किडे लागले होते, प्रचंड वास येत होता. त्याने तिला उचलून स्वच्छ केलं. तिचं कातडं काढलं आणि बाजारात २५ रुपयाला विकलं आणि त्यातून सुनीताला शाळेचा ड्रेस घेऊन दिला. शाळेतली इतर मुलांची वागणूकसुद्धा चांगली नव्हती. कोणी सुनीताला सामावून घेत नव्हतं.

एकदा सुनीताच्या वस्तीत पोलीस आले. त्यांनी संशयित म्हणून अनेकांना ताब्यात घ्यायला सुरुवात केली. आपल्याला व आपल्या मुलांनासुद्धा पोलीस घेऊन जातील या भीतीने सुनीताच्या आईने गांव सोडून शिरूरला स्थायिक होण्याचा निर्णय घेतला.

सुनीता ११ वर्षांची होती. पाचवीत शिकत होती. 'मानवी हक्क अभियानाची परिषद' अहमदनगरला आयोजित केली होती. त्या निमित्ताने 'मानवी हक्क अभियान'चे कार्यकर्ते राजेंद्र काळे यांचं शिरूरच्या पारधी वस्तीत येणं झालं. त्यांनी या परिषदेत येण्यासाठी सर्वांना निमंत्रण दिलं. या परिषदेसाठी सुनीता आपल्या आईसह उपस्थित राहिली.

'ज्या प्रमाणे आपण माणूस म्हणून जगतो त्याचप्रमाणे येथील भिल्ल, आदिवासी, पारधी हासुद्धा माणूस आहे. आपण शिकलो म्हणून आपल्याला आपल्या हक्काची आणि अधिकाराची जाणीव आहे, परंतु आदिवासी, भिल्ल, पारधी, भटके यांना अजूनही आपल्या अधिकारांची जाणीव नसल्याने त्यांच्यामध्ये नेतृत्व निर्माण होण्याची गरज आहे' असं ठसठशीत मनावर बिंबणारे जिजाचं (एकनाथ आवाड) भाषण ऐकलं. जिजा आपल्या भाषणामध्ये, दलित, आदिवासी, भटके यांच्यावरील अत्याचारांच्या संदर्भाने पोलिसांना आव्हान देत होते, न्यायाची मागणी करत होते. ते आमचे हक्क आणि अधिकार समजावून सांगत होते. या कार्यक्रमात अनेक लोक उपस्थित होते ज्यांनी पहिल्यांदा सुनीता आणि तिच्या आईला माणूस म्हणून त्यांची विचारपूस केली. त्यांच्या सोबत प्रेमाने व्यवहार केला. पहिल्यांदा सुनीताला आपण माणूस असल्याची जाणीव झाली. इथूनच पुढे सुनीताच्या आयुष्याला क्रांतिकारक कलाटणी मिळाली. सुनीताने ठरवलं की आपण या आंदोलनात सहभागी व्हायला पाहिजे, इथूनच आपण आपल्या समाजाला न्याय देऊ शकतो.

सुनीताने 'मानवी हक्क अभियाना'मध्ये काम करण्याचं ठरवलं. दोन महिन्यांनंतर मानवी हक्क अभियानाची पदयात्रा नगर ते नांदेड काढण्यात येणार होती. या पदयात्रेत सुनीता सहभागी झाली. या पदयात्रेत ती सर्वांत कमी वयाची आंदोलनकर्ती होती. त्यामुळे जिजा तिला मुलीप्रमाणे सांभाळत. सुनीता अंगावर एकच ड्रेस घालून आली होती. जिजानी तिला नवीन कपडे घेऊन दिले. तिच्यासाठी छोटंसं घड्याळ आणि चप्पलसुद्धा घेतली. ज्या गावात पदयात्रा जात होती त्या गावात जिजा सुनीताला महापुरुषांच्या प्रतिमांना हार घालण्यासाठी सांगत. उंची कमी असल्याने कार्यकर्ते सुनीताला खांद्यावर घेत आणि ती महापुरुषांच्या पुतळ्यास हार घालत असे. या पदयात्रेत सुनीताला खऱ्या अर्थाने समाजाच्या एकतेची ताकद समजली. आपले हक्क समजले. नशिबावर विश्वास असलेल्या सुनीताला पहिल्यांदा समजलं की आपलं





पालात राहणाऱ्या पारधी कुटुंबासोबत संवाद साधताना सुनीता भोसले

भविष्य घडवण्याची व्यवस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून घडवून ठेवली आहे. राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, अण्णाभाऊ साठे इत्यादी महापुरुषांनी आपलं नशीब आपण जन्माच्या अगोदरच उज्ज्वल करून ठेवलं आहे.

सुनीता पूर्ण वेळ कार्यकर्ती झाली. तिने मानवी हक्क अभियानाच्या माध्यमातून ॲट्रोसिटी, IPCची वेगवेगळी कलमं, गायरान जमिनीचे हक्क, पोलिसांशी आणि प्रशासकीय यंत्रणेशी संवाद असे प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केले. या प्रशिक्षणामुळे प्रचंड आत्मविश्वासपूर्वक सुनीता शिरूर तालुक्यातील आदिवासी, भटके, भिल्ल, पारधी, अनुसूचित जाती-जमातीच्या लोकांना न्याय देण्यासाठी कार्य करू लागली. जिजाच्या प्रेरणेने सुनीताला सामाजिक कार्य करण्यासाठी 'स्वीसेड फेलोशिप' मिळाली होती.

शिक्षण, आरोग्य, अन्याय अत्याचार निवारण आणि नागरिकत्वाचे पुरावे हे पारधी व भटक्या समाजाला मिळावेत यासाठी २०१२ मध्ये 'क्रांतिसंस्था' स्थापन केली. महात्मा फुले म्हणतात की आपल्या सर्व दु:खाचं कारण हे अज्ञान आहे. व्यवस्थेला प्रश्न विचारण्यासाठी, तिला आव्हान देण्यासाठी आपण आपलं शिक्षण पूर्ण करणं आवश्यक आहे याची जाणीव सुनीताला झाली. सुनीताचं पाचवीनंतर शिक्षण सुटलं होतं. आपण एकटे शिकण्यापेक्षा आपल्यासारखे अनेक शाळा सोडलेले विद्यार्थी आहेत. त्यांनासुद्धा आपण प्रोत्साहन देऊन शिकवण्याचं सुनीताने ठरवलं. २०१४ला चार विद्यार्थ्यांचे प्रवेश शुल्क भरून त्यांना यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात प्रवेश घेऊन दिला. स्वत:च्या ॲडमिशनला पैसे नसल्यामुळे सुनीताला त्या वर्षी प्रवेश घेता आला नाही. नंतर एका सरांनी सुनीताची १८००रुपये फी भरली, त्यामुळे तिने BA ला प्रवेश मिळवला.

२०१५ मध्ये 'आदिवासी फासेपारधी समाज संघटन'ची स्थापना केली. याचे अध्यक्ष राजेंद्र काळे तर महिला प्रमुख सुनीता भोसले यांनी महाराष्ट्रातील १८ जिल्ह्यात अन्याय अत्याचाराच्या विरोधात, नागरिकत्व पुरावा मिळवण्यासाठी, गायरान जमिनीच्या हक्कासाठी काम सुरू केले. आज जवळपास १२० विद्यार्थी शिक्षणासाठी सुनीताने दत्तक घेतले. त्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले. त्यामध्ये पारधी, आदिवासी, मातंग, बौद्ध, ओबीसी आणि काही ओपन कॅटॅगरीतील असे सगळे विद्यार्थी आहेत. त्यांची शैक्षणिक प्रगती तपासणं, त्यांच्या वह्या, पुस्तक, कपडे इत्यादी गरजा बघणं, त्यांच्या शालेय शुल्काची व्यवस्था करणं अशी अनेक कामं सुनीता आपल्या क्रांती संस्थेच्या माध्यमातून करत आहे. त्यात तिच्यापुढे, विद्यार्थ्यांनी मध्येच शाळा सोडणं, आई-वडिलांनी मुलांना मजुरीसाठी बाहेरगावी नेणं, मुलींचे बाल विवाह होणं इत्यादी आव्हानं आहेत. बालमजुरी रोखणं, बालविवाह रोखणं यासाठी बालक आणि पालक संवाद घडवून आणणं, पालकांत जागृती निर्माण करण्याचं कार्य सुनीता सतत करत आहे. कोरोना काळातील अनेक पारधी, भटके विमुक्त व आदिवासींच्या घरात दोन वेळच्या जेवणाची व्यवस्था करण्याचं काम सुनीताने समाज मदतीतून केलं.

आपला आदर्श आणि प्रेरणा हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, अण्णाभाऊ साठे, सावित्रीबाई फुले, राणी अहिल्यादेवी, माता रमाई, माता जिजाऊ इत्यादी असल्याचे सुनीता आवर्जून प्रत्येक ठिकाणी सांगते.

'एकनाथ आवाड' नसते तर सुनीताही कोणत्या तरी रस्त्याच्या सिग्नलवर आपल्या ५-६ लेकरांना घेऊन भीक मागत असती, आणि नवरा कोण्या जेलमध्ये असता असे ती सांगते. जिजानी खऱ्या अर्थाने माणूस म्हणून जगण्याच्या लायकीचं मला बनवलं असं सुनीता भावूक होऊन सांगते. सुनीता आजही अविवाहित असून फुले-शाहू-आंबेडकरी विचाराच्या कार्यकर्त्याशीच विवाह करण्याचा तिचा मानस आहे. त्यासाठी तिने अनेक तरुणांना लग्नास नकार दिला आहे.

'विंचवाचे तेल' हे तिचं प्रसिद्ध आत्मकथन आहे. येत्या काळात मुलांच्या शिक्षणासाठी हॉस्टेल अगर आश्रमशाळा निर्माण करून वंचित, आदिवासी, पारधी, भटक्या अशा समूहाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची सुनीताची कल्पना आहे. सुनीता या व्यवस्थेला शरण न जाता, तिच्याशी हातमिळवणी न करता, या व्यवस्थेशी दोन हात करते. या व्यवस्थेला जाब विचारून ती थांबत नाही तर रणरागिणीप्रमाणे आपले उपाय शोधत पुढे जात राहते.

नुकताच सुनीता भोसले हिला प्रतिष्ठित असा मानाचा महाराष्ट्र फाउंडेशनचा 'सामाजिक कार्य पुरस्कार २०२१' प्राप्त झाला. सुनीताच्या कार्याचा खऱ्या अर्थाने सन्मान झाला. सुनीता भोसलेच्या पुढील कार्यास सदिच्छा आणि मंगल कामना..!!!

राहुल खांडेकर
९८२३६२४१४३

व्हिडिओवरील भाषण...

# पारधी समाजातील मुलामुलींना सन्मान मिळावा...



मला हा पुरस्कार मी केलेल्या सामाजिक कार्यकर्ता (संघर्ष) या विभागासाठी देण्यात आला आहे. मी आत्तापर्यंत 'क्रांती' संस्थेच्या माध्यमातून सलग पाच वर्ष १४० पारधी व भिल्ल समाजातील मुलगे व मुलींना शैक्षणिक साहित्य देऊन मुख्य प्रवाहात आणले आहे. या मुलांना दर वर्षी लागणारी वह्या-पुस्तके, पेन-पेन्सिल, कंपासपेटी, दप्तर, शाळेची फी हे सर्व सलग पाच वर्ष देऊन सोबतच त्यांच्या शैक्षणिक विकासासंबंधी पाठपुरावाही केला. त्यांचे पालक, शिक्षक, मुले यांचे एकत्रित कार्यक्रम घेऊन 'बालविवाह करू नका', छोट्या मुला-मुलींना मजुरीला लावू नका' याविषयी पालक शिक्षक मुले यांच्यात जागृती निर्माण केली. या मुलांना शैक्षणिक कामासाठी व त्यांच्या पालकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आधार कार्ड, रेशन कार्ड, जातीचा दाखला, पॅन कार्ड, मतदान कार्ड अशा एकूण १ हजार लोकांना शासकीय कागदपत्रे मिळवून दिली.

पारधी व भिल्ल भटके विमुक्तांतील ज्यांचे शिक्षण अर्धवट राहिले आहे असे मुलगे आणि मुली शोधून त्यांचे पुढील शिक्षण यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातर्फे व्हावे म्हणून प्रयत्न केले. या मध्ये फीची व्यवस्था, शैक्षणिक साहित्य, प्रवास इ. मदत संस्थेमार्फत करण्यात आली. आतापर्यंत १४ मुले-मुली शिक्षण घेत आहेत. या कार्यात माझा सहभाग आहे. या निमित्ताने उच्च शिक्षण घेण्याची संधी त्यांना मिळाली आहे.

महाराष्ट्रामध्ये स्वातंत्र्यानंतरसुद्धा पारधी समजला गुन्हेगारीमध्ये गणले जात आहे व गावातील जातदांडगे व धनदांडगे यांच्याकडून पारधी समाजावर वेगवेगळ्या प्रकारचे अत्याचार केले जातात. ज्यामध्ये खून करणे, घर जाळणे, मारहाण करणे महिला अत्याचार, खोट्या गुन्ह्यामध्ये गोवणे, जमिनी हिरावून घेणे, मुलामुलींना शिक्षणापासून थांबविणे या प्रकारचे अत्याचार पारधी समाजावर वारंवार होत असतात. त्या अत्याचारांना वाचा फोडून न्याय मिळवून देण्याचे काम मी संस्थेमार्फत केले. ब्रिटिशांपासून आत्तापर्यंत पारधी समाजावर मारला गेलेला गुन्हेगारीचा शिक्का पुसून टाकण्याचा प्रयत्न

मी माझ्या कामामधून करत आहे. पारधी समाजावर चोरीचा कलंक लावून त्यांना जागोजागी बहिष्कृत करण्याचा प्रयत्न पोलिसांकडून, प्रशासनाकडून व समाजाकडून केला जात आहे; तो कलंक पुसण्याचे काम मी माझ्या संस्थेमार्फत करत आहे.

महाराष्ट्राला व देशाला पुरोगामी विचाराची परंपरा देणाऱ्या छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, छत्रपती शिवाजी महाराज, जिजाऊ माँ साहेब, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, क्रान्तिकारक समशेरसिंग भोसले यांनी केलेले सामाजिक कार्य व पेरलेले विचार या माझ्या प्रेरणा आहेत.

देश अमृतमहोत्सव साजरा करत असताना आजही पारधी समाजातील लोकांना अन्न-वस्त्र-निवारा या मूलभत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. मी करत असलेल्या कामामुळे या समाजातील मुले मुली, तरुण-तरुणी शिक्षण घेत आहेत व या गुलामीच्या साखळीला तोडण्याचे आम्ही मिळून काम करत आहोत.

पारधी समाजामध्ये आत्मभान निर्माण करून त्यांना रोजी-रोटीचे स्वतंत्र व्यवसाय निर्माण करून त्यांना देशाचे आदर्श नागरिक म्हणून ताठ मानेने उभे राहण्याची क्षमता त्यांच्यामध्ये निर्माण करत आहे. पारधी समाजात महापुरुषांचे विचार पेरण्यासाठी महापुरुषांच्या जयंत्या साजऱ्या करत आहे. ३५ गावांतील ग्रामसभेचे ठराव घेऊन शबरी घरकुल योजना व पारधी घरकुल योजनांसाठी शासकीय अधिकारी यांच्याशी बोलणी करून घरकुल व घरासाठी लागणारी जागा मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.

कोरोना काळामध्ये संस्थेच्या वतीने पारधी, भिल्ल, भटके, विमुक्त समाजांमध्ये १५ लाखांचे धान्याचे कीट वाटप करण्यात आले.

आदिवासी मांगीसोबत मीटिंग व त्यांचा महाराष्ट्रातील आदिवासी समाजातील लोकांना खावटी योजनेचे १३ लाख लोकांना रेशन किट व प्रत्येक कुटुंब प्रमुख व्यक्तीच्या खात्यामध्ये २ हजार रुपये शासकीय मदत मिळवून दिली.

पारधी समाजासाठी काम करत असताना त्यांच्यावर मारलेल्या गुन्हेगारीच्या शिक्क्याचा मला वेळोवेळी अनुभव येत गेला.

मी ३ वर्षांची असताना वडिलांचा खून झाला. त्यानंतर माझ्या आईने आम्हा भावंडांचा सांभाळ केला. माझ्या लहानपणी गावात चोऱ्या झाल्या की लगेच पोलीस घरी येऊन आईला शिव्या द्यायचे, तेही घाणेरड्या भाषेत बोलायचे, हे मी वारंवार पाहिले आहे व अनुभवले आहे. प्रियांकाताईने लहानपणापासून शिळे व खरकटे, उष्टे, खराब झालेले अन्न, भीक मागून मिळालेले अन्न खावे लागले. अशा परिस्थितीत शाळेत जाऊन शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला असता शाळेतील इतर मुलांनी तिरस्कार करून, चिडवून, अपमानित केले. वारंवार पोलीस घरी येऊन आईला व आम्हा भावंडांना त्रास देत. पोलीस आईला व आम्हाला अश्लील भाषेचा वापर करायचे व रात्री-अपरात्री घरी यायचे, या कारणामुळे शिक्षण सोडावे लागले.

महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार मला मिळाल्यामुळे, मी करत असलेल्या कामाला शाबासकी दिली आहे. मला हा पुरस्कार मिळाल्यामुळे माझ्या कामाची चर्चा महाराष्ट्रभर होऊन मला प्रोत्साहन देणारे,

मदत करणारे, मार्गदर्शन करणारे लोक मला मिळाले. आज मी १४० मुलांना शैक्षणिक कामामध्ये मदत देत आहे, पुरस्कारानंतर या मुलांची संख्या निश्चितच वाढेल.

पारधी समाजातील मुला-मुलींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी लागणाऱ्या सर्व बाबी, शिक्षण आरोग्य, उपजीविका, सन्मान मिळवून देण्यासाठी प्रयत्न करेल.

**सुनीता भोसले**
९५२७२३८६८८

# आत्मनिष्ठा कायम राखणारा जनाभिमुख लेखक : रमेश अंधारे

**अक्षयकुमार काळे**



रमेश अंधारे मूलत: ग्रामीण विभागातून आलेले व्यक्तिमत्त्व आहे. त्यामुळे त्यांच्या जाणिवेच्या अंतर्भागी ग्रामीण संस्कृतीचा ठेवा आहे. उपेक्षितांच्या, कष्टकरी जनतेच्या जीवनासंबंधी एक नैसर्गिक सहानुभूती त्यांच्या मनात आहे. अकोला जिल्ह्यातील शिर्ला या गावात त्यांचा जन्म झाला. केवळ बाराशे लोकवस्तीचे हे गाव, पण विदर्भातल्या सगळ्या कळा झळा पोटात घेऊन वसलेले. ग्रामीण जीवनदर्शन घडविण्यासाठी आवश्यक असणारा मूलभूत संस्कार अंधारेच्या व्यक्तिमत्त्वावर इथल्या सर्जक मातीनेच केला. त्यांचे आठवीपर्यंतचे शिक्षण येथेच झाले. व्यक्तिविकासाच्या पुढील टप्प्यावर जाण्याआधीची पायाभरणी इथेच झाली. अंधारेंनी फार विपुल वाङ्मयनिर्मिती केली नाही पण इतके खरे की 'पागोरा' आणि 'दगडी मक्ता' अशा दोनच कादंबऱ्या लिहून त्यांनी कादंबरी वाङ्मयाच्या क्षेत्रात आपले स्थान मात्र सुनिश्चित केले. ग्रंथाली प्रकाशनाने १९९९मध्ये प्रकाशित केलेल्या 'पागोरा' या आत्मकथनपर कादंबरीत बहुजन समाजातून पुढे येऊ पाहणाऱ्या तरुणांचे चित्रण त्यांनी केले. विकासाला प्रतिबंध करणारी प्रचलित ग्रामव्यवस्था आणि पायगुंता ठरणारी कुटुंबव्यवस्था यांच्याशी संघर्ष करून खेड्यातून नगराकडे व नगराकडून महानगराकडे झालेला प्रवास या कादंबरीत अंधारे यांनी रेखाटला आहे.

असा प्रवास करताना नायकाचा पित्याशी झालेला संघर्ष या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. हा संघर्ष एक पारंपरिक मन आणि जीवनातल्या आधुनिकतेकडे औत्सुक्याने पाहणारे, शिक्षणातच आपल्या स्वउद्धाराची बीजे आहेत याची खात्री पटलेले मन यांच्यातील आहे. असा संघर्ष रेखाटत असताना नायकाच्या व्यक्तिविकासाचे टप्पे आणि त्याच्या व्यक्तित्वाच्या इतर पैलूंचे दर्शन ते घडवतात. सतत चाललेल्या संघर्षात त्याला आपल्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख पटत जाते आणि प्राध्यापक झाल्यावर आता संघर्ष संपला म्हणून एक प्रकारची रितेपणाची जाणीवदेखील त्याच्या अंत:करणात निर्माण होते. आधुनिक सुस्थिर जीवन लाभल्याचा आनंद आणि भावी प्रगतीची आणि सुखाची स्वप्ने डोळ्यासमोर तरळत असताना आपली मुळे मात्र खुंटत चालली आहेत. ज्या मातीतून आपला मूळ पिंड घडला, पोसला गेला ती परकी होत आहेत, या जाणिवेच्या विषण्ण करणाऱ्या बिंदूवर साधलेली या कादंबरीची अखेर सहृदय वाचकाला अंतर्मुख करते.

नायकाच्या संघर्षशील मनाचे चित्रण करीत असतानाच त्याच्या सभोवताल असणाऱ्या गावखेड्याची विस्कळित, खंडित स्थिती, सततच्या नापिकीपायी झालेली दुरवस्था, हिस्सेवाटे यामुळे कमी कमी होत जाणारी शेती, माणसा-माणसांतील दुभंगलेली नाती. गावातील क्षुद्र राजकारण व त्यातील हेवेदावे, त्यातील जातीयता, वाढत जाणारा दुरावा ह्यांच्या चित्रणाने त्यांच्यातील लेखकाची समाजनिरीक्षणाची क्षमता आणि अवदशेच्या गर्भात असणाऱ्या सूक्ष्म आणि अदृश्य कारणांचा शोध घेण्याची तत्परता दिसून येते.

त्यांच्या दुसऱ्या आणि पारितोषिकप्राप्त 'दगडी मक्ता' या कादंबरीचा विषय अगदी वेगळा आहे. त्याच्या निवडीतच त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वात वेगळ्या सर्जनाचे आव्हान पेलण्याची क्षमता किती मोठी आहे, ह्याचे प्रत्यंतर येते. तिचे शीर्षकही अतिशय अन्वर्थक आहे. कष्टकऱ्यांच्या जीवनाविषयीच्या अपार सहानुभूतीतून ती आकारास आली असल्यामुळे दगडी जीवनाशी आयुष्य बांधलेल्या सर्व कष्टकऱ्यांना ती त्यांनी अर्पण केली आहे. उत्कट सहानुभवामुळे संघर्षशील पाथरवटांचे रेखाटलेले









चित्रण अतिशय हृदयस्पर्शी झालेले आहे. कथानायकाशी झालेली लेखकाची एकतानता लक्षणीय आहे. अशी एकतानता अंधारेंच्या लौकिक आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचेही अचूक निर्देशन करते. सामाजिक बांधिलकी प्राणपणाने जपणाऱ्या लेखकाचे हात आभाळाला भिडलेले असले तरी पाय मातीतच असतात आणि एखाद्या वृक्षाप्रमाणे त्याची मुळे जीवनाचा शोध घेत अधिकाधिक मृतिकागृहात कशी घुसत जातात, त्याचे प्रत्यंतर ही कादंबरी वाचताना येते.

आधी सरकारी महाविद्यालयात केलेले अध्यापन आणि नंतर शिवाजी शिक्षण संस्थेत स्वीकारलेले प्राचार्यपद हा त्यांच्या व्यावसायिक जीवनाचा आलेख असला तरी तो मूलतः शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुखांसारख्या सामाजिक व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झालेला आहे. त्यांच्याविषयी अंधारेंच्या मनात असणारी अपार भक्ती आणि उत्कट निष्ठा त्यांनी लिहिलेल्या पंजाबरावांच्या छोटेखानी चरित्रात प्रकट झाली आहे. कादंबरीकार अंधारेंच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची ही दुसरी बाजूच आहे. पंजाबराव देशमुखांविषयी असलेल्या आदराचा आणि भक्तीचा प्रत्यय त्यांनी संपादित केलेल्या 'मुद्रा महाराष्ट्राची' या ग्रंथातही येतो. भाऊसाहेबांच्या अलक्षित पैलूंचे नवे आकलन साकार करणारा एक स्वतंत्र विभाग करून आपल्या संस्कृतीच्या विविध अंगाचं तत्त्वज्ञान विशद करणाऱ्या आणि संस्कृतीच्या समग्रतेची वैविध्यपूर्ण चिंतनसूत्रे गुंफणाऱ्या या ग्रंथात चिकित्सक संपादकाची, विषयांचे आकलन करणारी समग्र व सूक्ष्म दृष्टी प्रकट झाली आहे. त्यांच्या 'मोहरा महाराष्ट्राचा' आणि 'साहित्य: समाज आणि संस्कृती' या आगामी ग्रंथांत त्यांच्या संपादकीय दृष्टीचे विवेकी दर्शन घडेल अशी अपेक्षा आहे.

ललित ग्रंथ असो की संपादित ग्रंथ असो आपली आत्मनिष्ठा कायम राखणारा जनाभिमुख लेखक म्हणून त्यांनी अर्जित केलेली ख्याती चिरस्थायी स्वरूपाची राहील यात शंका नाही.

अक्षयकुमार काळे
९३२५००५८७१

व्हिडिओवरील भाषण...

# जात : संपूर्ण भारतीय समाजाची जटिल समस्या



माझे मनोगत प्रगट करण्यापूर्वी, मी अमेरिका स्थित महाराष्ट्र फाउंडेशनचे प्रमुख मा. सुनील देशमुख आणि सर्व पदाधिकारी तसेच ग्रंथ निवड समितीचे सदस्य यांचे आभार मानतो. 'दगडी मक्ता' ही कादंबरी मैलाचा दगड ठरू शकते', या शब्दात निवड समितीने माझ्या कादंबरीचा आणि बरोबरच माझाही गौरव केला, अशी माझी भावना आहे.

या निमित्ताने 'दगडी मक्ता' या कादंबरीच्या निर्मिती प्रक्रियेविषयी, तिच्या आशयसूत्रांविषयी संक्षेपाने बोलणे अनुचित होणार नाही. भारतीय समाजात जात हे एक प्रखर सामाजिक वास्तव आहे. आपल्या देशातला हा एक अतिशय जटिल व गुतागुंतीचा प्रश्न आहे. हा प्रश्न केवळ कनिष्ठ जातींपुरताच मर्यादित नाही. तो संपूर्ण भारतीय समाजाचा प्रश्न आहे. पण आपण असे चतुर आहोत की, हे स्त्रियांचे प्रश्न, हे शेतकऱ्यांचे, हे शिक्षकांचे अशी वर्गवारी करून ते ते प्रश्न त्या त्या वर्गानेच सोडविण्याची जबाबदारी त्यांच्यावर ढकलून आपण नामानिराळे राहतो.

जातीचा संबंध एकीकडे भांडवलशाही, पितृसत्ता यांच्याशी शोधला पाहिजे. दुसरीकडे धर्म, राजकारण, शिक्षण, लग्न, जमीन, प्रबोधन यांच्याशी तपासून पाहिला पाहिजे.

जातीचे निर्मूलन न होण्याची अनेक कारणे आहेत. जातीची जाणीव आपल्या नेणिवेत रुतून बसली आहे. तिथून ती निर्मूलन करणे अशक्य आहे. आणखी काही कारणे सांगता येतील, जसे राजकीय-आर्थिक-सामाजिक लाभ, व्यक्तीची प्रतिष्ठा इ. या कारणांमुळे माणूस डी-कास्ट होणे कठीण आहे. या अभ्यासाच्या पार्श्वभूमीवर मला या कादंबरीचे आशयसूत्र सापडले.

जातींमधलं वैमनस्य, जातपंचायत, त्यातून आलेलं शोषण आणि याचा समकालीन वास्तवाशी जोडलेला धागा या आशयसूत्रांचा उलगडा करताना मला फारशी अडचण आली नाही. परंतु वास्तव, मग ते धार्मिक, राजकीय, सामाजिक कोणतेही असो, त्याला साहित्यरूप देताना ते जसेच्या तसे मांडले तर ते निबंधवजा होते. त्या वास्तवाची पुनर्निर्मिती झाली पाहिजे. त्याची पुनर्मांडणी करून उपयोग नाही. तो जीवनानुभव व कथानकाशी एकजीव व्हायला पाहिजे. त्याने कलात्मक रूप घ्यायला पाहिजे आणि त्याची वाचकाला अनुभूती यायला हवी.

या वास्तवाच्या मांडणीसाठी माझ्यासमोर दोन पर्याय होते. पहिला मार्क्वेझच्या 'मॅजिकल रिॲलिझमचा' आणि दुसरा मॅक्झिम गोर्कीच्या 'सोशॅलिस्ट रिॲलिझमचा' परंतु या अनुभवासाठी हे दोन्ही पर्याय मला उचित वाटले नाहीत. मग कथेतल्या 'बहुजन हितकारिणी परिषदेचे' नेते वर्तमानपत्रात

## ग्रंथ पुरस्कार (ललित)
## दगडी मक्ता

पाथरवट, टोकणदार, मूर्तिकार आणि वडार अशा दगडांच्या कामाशी संबद्ध असलेल्यांच्या जीवनाची ही गाथा. वऱ्हाडी आणि पाथरवटी अशा बोलींनी समृद्ध असलेली ही कादंबरी. अगदी नवीन शैलीत लिहिलेली. अर्थशून्य पण सामान्यांना पिडणाऱ्या अनेक जाचक आणि भयानक परंपरांमुळे जिणे असह्य झालेल्या, अडाणी आणि तरीही चिवटपणे जगत राहिलेल्या समाजाचा हा आतून घेतलेला आलेख आहे. अतिशय वाचनीय, सकारात्मक आणि वास्तववादी कादंबरी.

कोंडू-रुक्मीचा संसार, त्यांचा लाडका गधा लाड्या, मुलगा उमा आणि मुलगी पारू - हे सुरुवातीपासूनचे चित्र. दलितांच्या सर्वतोगामी शोषणापासून सुरुवात करूनही उमा या नायकाच्या एकदम वेगळ्या दिशेच्या प्रवासामुळे कादंबरी वाचकाला सतत नवनवीन संदर्भात आकर्षक पद्धतीने पुढे खेचत राहते. शिक्षणामुळे स्वत:च्या जगण्याचे संदर्भ बदलणारा उमा हा पाथरवटांमध्ये जन्मून स्वत:ला आणि भोवतालच्या समाजाला जिद्दीने आणि निष्ठेने चांगल्या आदर्शांकडे वळवत जातो. तरीही प्रचारकी थाट किंवा भोळसटपणा, निव्वळ आदर्शवाद वगैरेंनी ही कादंबरी डागाळलेली नाही. प्रत्येक ध्येयातील खाचखळग्यांबद्दल, अशक्यतेपासून शक्यतेपर्यंतच्या प्रवासाबद्दल सार्थ चर्चाही सहज संवादांतून प्रकटत जाते, आणि वाचकही यात सहभागी होत राहतो. नायक-नायिकांच्या ध्येयवादी, आदर्शवादी निरागस वादसंवादांइतकेच त्यात अत्यंत बेरकी, इरसाल अशा राजकीय डावपेच करणाऱ्यांचेही यथातथ्य चित्रण आले आहे.

जातपंचायतीचा जुलूम, ठेकेदारांची फसवेगिरी आणि छळवाद, बाप आणि मुलगा किंवा मुलगी यातील नात्यांचे विविध प्रकार, (कोंडू आणि उमा, भास्करराव आणि शेखर, शिवल्या आणि अरबळ्या बाप, अंजली आणि तिचे वडील सुधाकर राऊत,) तसेच मैत्रीचे अनेक प्रकार, विद्यार्थी आणि शिक्षक यांतील विविध नाती, अशा विविध अंगांनी कादंबरी समृद्ध आहे, आणि रंगत जाते.

→

→

सामाजिक सुधारणांचा एक इवलासा अंत:प्रवाह, आणि जातीपातींवर आधारलेले घट्ट, निगरगट्ट समाजवास्तव, यातील ताणतणावांची वीण हा या कादंबरीचा अंत:स्तर आहे. आंतरजातीय विवाह करणारेदेखील अनेकजण आतून किती जातीचे अभिमानी आणि प्रसंगी दुटप्पी असू शकतात, तेही यात वास्तववादी पद्धतीने उमटले आहे. यातील मुख्य आणि दुय्यम अशा अनेक पात्रांचे व्यक्तिचित्रण बदलत्या परिस्थितीशी तोंड देताना वाढत, विकसित होत जाणारे, पण मूळची नाळ न तोडणारे असे अतिशय जिवंत वाटते. उमाच्या आयुष्यात येणाऱ्या सत्त्वपरीक्षांतून तो तावून-सुलाखून निघतो, पण आपल्या जिव्हाळ्याच्या तत्त्वांना मुरड घालताना अटीतटीचा प्रश्न पडल्यावर मात्र योग्य निवड करण्यामुळे नायक म्हणून अधिकच उजळून निघतो. सत्यदर्शनाने वाचकाला अंतर्मुख करूनदेखील सकारात्मक ऊर्जा देणारी, सामान्य पठडीबाहेरची अशी ही मौलिक कादंबरी लिहिली गेली आहे.

यातील सुरुवातीची कष्टकऱ्यांच्या श्रमांची, त्यांच्या हलाखीची, आणि फसवणुकीमुळे, अडाणीपणामुळे सततच्या दारिद्र्याची वर्णने तर अतिशय भेदक आणि मर्मग्राही आहेतच, पण नंतरच्या बदललेल्या संदर्भातील वैचारिक वाद-संवाद, कृषिकीर्तने, भावपूर्ण पत्रे, कमिट्यांच्या मीटिंग्ज, टीव्हीवरील सांगोपांग मुलाखती, निवडणुकांमधील डावपेच वगैरेंचीही वर्णी यथासांग लागलेली आहे. कादंबरी सतत वाचकाची उत्सुकता ताणून ठेवते.

अलीकडच्या काळातील सवंग झालेल्या, केवळ हताश समाजाच्या दैन्यवाण्या चित्रणाच्या काळातही प्रवाहाविरुद्ध पोहण्याचा आटोकाट प्रयत्न करणाऱ्या प्रयत्नशील नायकाभोवती गुंफलेली यथातथ्य आणि तरीही सकारात्मक कादंबरी निश्चित उजवी वाटते.

**विद्युल्लेखा अकलूजकर**

(साहित्य पुरस्कार निवड समिती, अमेरिका, यांच्या वतीने)

+1(778)953-5346

लेख, मुलाखती, स्तंभलेखन, बातम्या यांचा वापर करतात.' हे लक्षात घेऊन हा प्रश्न सोडवला आणि त्यातून कादंबरी आकाराला आली.

यापूर्वी मी १९९९मध्ये 'पागोरा' ही कादंबरी लिहिली. साठ-सत्तरच्या दशकात गावखेड्यांमध्ये कुटुंबजीवन आणि शेती एकरूपच होती. म्हणून घरी शेती असेल तर थोरल्या मुलाने शेतीच करावी आणि धाकट्याने शिकावे अशी धारणा होती. या कारणाने कथानायकाचे वडील नायकाच्या शिकण्याला विरोध करतात. त्यातून कर्मठ बाप आणि धडपड्या मुलगा असा संघर्ष झडतो. कथानायक यातून संघर्ष करत वाट काढतो. पुढे प्राध्यापक होतो. पण आता आपल्या आयुष्यातील संघर्ष संपला म्हणून नायक खट्टू होतो. या टोनवर कादंबरी संपते.

याच कृषिजीवनाचा धागा पकडून मी डॉ. पंजाबराव देशमुखांचे छोटेखानी चरित्र लिहिले. तसेच महाराष्ट्राच्या सुवर्णजयंतीच्या पर्वावर आणि अमरावतीच्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या अमृत महोत्सवानिमित्त २०१० मध्ये 'मुद्रा महाराष्ट्राची'हा ग्रंथ संपादित केला. याच मालिकेत २०२०मध्ये महाराष्ट्राच्या हीरक महोत्सवानिमित्त 'मोहरा महाराष्ट्राचा' हा संपादित ग्रंथ कोरोनाच्या महामारीमुळे अद्याप प्रकाशित होऊ शकला नाही. तो एप्रिल अखेर प्रकाशित होईल. नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एम.ए. मराठीचे पाठ्यपुस्तक म्हणून 'साहित्य : समाज आणि संस्कृती' हे पुस्तकही येत्या काळात प्रकाशित होईल. काही लेखन प्रकल्प माझ्या हाताशी आहे. ते यथाशीघ्र पूर्ण करण्याचा माझा संकल्प आहे.

**रमेश अंधारे**
७७७००८४२२७

# व्यवस्थेला प्रश्न विचारणारी मुलगी : मुक्ता बाम

**वंदना भागवत**



नाटक लिहायचे तर प्रश्न विचारता यावे लागतात. गोष्टीत 'पुढे काय?' हा प्रश्न महत्त्वाचा असतो तसा नाटकातही. नाटक पुढे जाते ते प्रश्नांची उत्तरे शोधण्यातूनच. रंगमंचाची म्हणून एक भाषा असते हे खरे. पण रंगभाषेच्या गाभ्याशी असतात ते नाटककाराने उभे केलेले प्रश्न. या प्रश्नांशी नाटकातली पात्रे कशी झुंजतात आणि त्याचे कार्यकारणभाव कसे प्रस्थापित करतात याची प्रेक्षकांना उत्सुकता असते. नाटकातला विचार प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचे काम नाटकातून मांडल्या गेलेल्या प्रश्नातून - संघर्षातून- होत असते. संघर्षातून नाटक जगण्याशी थेट नाते सांगत असते. प्रत्यक्ष वावरणारी पात्रे त्यांच्या संघर्षातून जगण्याचे प्रयोजन मांडत असतात. नेमके प्रश्न विचारणे आणि त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करणे यातून नाटक उभे राहते. उत्तरे मिळण्यातील अडसर नाटककार किती चोखपणे टिपतो यावर नाटककाराची ताकद जोखता येते. नाटककार या शब्दासारखा नाटककर्ती असा शब्द रूढ झाला नाही. कदाचित नाटक लिहिण्याचे आणि दिग्दर्शित करण्याचे प्रयत्न करणाऱ्या स्त्रियांची संख्या खूपच कमी आहे म्हणून असू शकेल. पण याचा अर्थ स्त्रियांना प्रश्न विचारता येत नाहीत असा नाही; तर स्त्रियांना प्रश्न विचारण्याची मुभा आणि मोहलत मिळवण्यासाठी संपूर्ण व्यवस्थेशी झगडावे लागते. स्त्रियांनी थेट प्रश्न विचारायचे वातावरण आधुनिकतेत निर्माण झाले. त्यानंतर प्रश्न विचारणाऱ्या आणि

त्यांना विवेकी उत्तरे शोधणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढू लागली. मुक्तासारख्या नवोदित नाटककर्तीला स्त्रियांनी प्रश्न विचारण्याची परंपरा पुढे नेता येईल अशी शक्यता तिच्या एकांकिका दर्शवतात.

मुक्ताच्या पुरस्कारप्राप्त चारही एकांकिका स्त्रियांना - व्यवस्थेपेक्षा वेगळा विचार करणाऱ्यांना - पडणाऱ्या प्रश्नांशी झगडतात. त्यांची उत्तरे मिळवण्यासाठी मुक्ताच्या नाटकातील पात्रे जिथे जो विचार, जी कल्पना सापडेल तिथून खेचून आणतात. त्यासाठी त्यांना काल आणि अवकाश यांच्या मर्यादा नाहीत. मुक्ताशी बोलताना एक महत्त्वाची गोष्ट जाणवली ती अशी की मुक्ता केवळ बाह्य परिस्थितीलाच प्रश्न विचारत नाही तर ती स्वत:च्या जडणघडणीलाही प्रश्न विचारते. आत्मटीका ही तिच्या वाटचालीची साथीदार आहे. नाटककर्ती म्हणून मुक्ताची वाटचाल शाळेपासून सुरू झाली-अक्षर-नंदन शाळेत सातवीत असताना नाट्यलेखनाची जबाबदारी अनपेक्षितपणे तिच्या अंगावर पडली. ते लिहिताना खूप मजा आली. त्याला प्रथम पारितोषिक मिळाले पण त्या वेळेस नाटक हा प्रकार खूपच आव्हानात्मक आहे याची जाणीव झाली. मजाही यायला लागली. कारण तो केवळ शब्दांशी खेळ नसतो तर प्रेक्षकांच्या व्यवधानाशीही असतो हे समजले. मग फर्गसन महाविद्यालयातील नाटक-गटात दाखल झाल्यावर नवनवीन साक्षात्कार झाले. १० मुलांबरोबर काम करणारी ती एकटीच मुलगी. जुन्या बाजारातून दरवाजे उचलून आणणे, ठोक बाजारातून नेपथ्याचे सामान रात्री-अपरात्री गाडीवर टाकून घेऊन येणे इथपासून ते तिच्या लिखाणाच्या शब्दप्रधान शैलीवर तुटून पडणाऱ्या मित्रमंडळींना तोंड देणे अशी सगळी अनुभवसमृद्धी तिच्या लेखनाच्या पायामध्ये जमा होत होती. ''‘अक्षर-नंदन’सारख्या शाळेत सहकार्याने, समजून घेत, सामावून घेत, आस्थेने आपले म्हणणे मांडले तर ते ऐकले जाईलच याची खात्री असायची, ती महाविद्यालयातल्या वातावरणात नसायची. माझ्या लेखनाबद्दलच्या थेट, रोखठोक, निर्भीड प्रतिक्रिया मला महाविद्यालयातील नाटक-गटांतच ऐकायला मिळाल्या. त्यांना तोंड देत उभे राहणे मला खूप काही शिकवून गेले. आता मी ठामपणे वागू शकते. सगळ्यांची आवडती असणे आणि उत्तम नाटक उभे करणे या दोन परस्पर विरोधी गोष्टी आहेत. तेव्हा सतत सगळ्यांची आई किंवा बायको होऊन समजूत घालण्याच्या भूमिकेत असणे सोडले पाहिजे; माझ्या मनातला नाटकाचा आकार स्टेजवर आणायचा तर मी मला दिग्दर्शिका म्हणून प्रस्थापित करायला लागेल हे मी शिकले,'' असे मुक्ताने मला सांगितले.

७०च्या दशकात पुण्यातील महाविद्यालयात आणि एकूणच सामाजिक अवकाशात वेगवेगळ्या चळवळी आणि सांस्कृतिक उलथापालथींमध्ये बायकांचा आवाज सुस्पष्ट होत गेला होता. त्यात प्रश्न विचारणे आणि विचारलेले प्रश्न ऐकून घेणे असे दोन्हींचेही प्रशिक्षण समृद्धपणे होत होते. समांतर चित्रपट आणि प्रायोगिक रंगभूमीवरून अनेक प्रयोग होत होते. दिग्दर्शक आणि लेखकांशी थेट संवाद होऊ शकायचे. या मोकळेपणातून बौद्धिक आवाका वाढत गेला आणि संवादीही होत गेला. त्यातूनच बाई म्हणूनही सक्षमता वाढत होती. स्त्री चळवळी सांस्कृतिक क्षेत्रातील पुरुषसत्तेविषयी बोलत होत्या त्यांचेही पडसाद महाविद्यालयीन सांस्कृतिक व शैक्षणिक अवकाशात उमटत होते. सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळींच्या जोडीने अभ्यासक्रम आणि अभ्यासेतर उपक्रमांमधून एक संकरित आधुनिकता विकसित होत होती. वैश्विक आणि स्थानिक विचारविश्वे यांच्यात देवाणघेवाण होत होती. पाश्चात्त्य संघर्षात्मक साहित्याचे भारतीय अवकाशात अत्यंत आस्थेने वाचन आणि उपयोजन होत




होते. हिंसा, युद्धे, कंगालीकरण, बकालीकरण, शोषण, वंश-जाती-वर्ग-लिंग भेदांच्या चर्चा सार्वत्रिक होत्या. पाश्चात्त्य विचारविश्वांचा अभ्यास करत असतानाच एतद्देशीय आधुनिक परंपरा कशा उभ्या करता येतील याच्याही चर्चा त्या वेळेस होत होत्या. साहजिकच त्यातून केवळ लेखक, दिग्दर्शकच घडत होते असे नाही तर व्यापक दृष्टीचे वाचक आणि प्रेक्षकही घडत होते. कोण काम्यू? कोण ब्रेख्त? असे प्रश्न पडत नसण्याऱ्या तरुणाईचा तो कृती-काल होता.

९० च्या दशकात जागतिकीकरणाला सामोरे गेल्यानंतर सगळ्याच सामाजिक-वैचारिक चर्चांमधली गुंतागुंत वाढली. राजकारणही संख्याधारित होत गेल्याने राजकीय भूमिकांमध्ये संदिग्धता आली. भ्रष्टाचार आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाचे ताण यात सुस्पष्ट भूमिका घेण्याची गरज वाटली तरी ती नक्की कोणत्या स्थानावरून घ्यायची याबाबतीतले ताण वाढत गेले. अशा वेळेस राष्ट्रीयत्वाचा पाया विस्तारण्यापेक्षा संकोचत नेण्यातूनच ही स्पष्टता येते असा जागतिक भ्रम तयार झाला. याचा परिणाम संपूर्ण सांस्कृतिक वातावरणावर झाला. जास्तीचे वाचन करणारा, वैश्विक सर्जनशील कृती आपल्याशा करणारा, संवादाबद्दल, वेगळेपणाबद्दल असोशी असणारा वाचक आणि प्रेक्षक स्वत:चे आक्रसलेले परीघच अभिमानाने मिरवता झाला. जेव्हा राजकारण आणि विचारधारा समाज-मनाची पकड घेण्यास असमर्थ ठरतात तेव्हा सर्जनशील लेखकाची जबाबदारी वाढते. मुक्तासारख्या तरुण नाटककर्तीच्या लेखनाचे महत्त्व इथे अधोरेखित करता येईल. तिला स्वत:ला प्रस्थापित सामाजिक स्थानाचा लाभ होऊनही व्यापक आव्हानांचा विचार करणारी लेखिका म्हणून तिची दखल घेता येईल, कारण जीवन सुखकारक असेल तर सहसा संकुचित गर्वभूमी तयार करण्याचा मोह होऊ शकतो. अशा वेळेस स्वत:च्या भूमीवर उभे राहून जगाकडे कुतूहलाने बघण्याचे आणि अत्यंत भेदक प्रश्न विचारण्याचे काम तिच्या चारही एकांकिका करतात. 'विपाशा', 'टिळा', 'रंग' आणि 'ऑस्कर' या चार एकांकिकांमधून मुक्ताने परत एकदा संकरित आधुनिकतेच्या प्रकल्पाकडे पावले टाकली आहेत, असे म्हणता येईल. तीही लिंगभावाच्या स्थानावरून.

अमेरिकेतील वंशवाद आणि भारतातील जातीयता यांच्यातील दुवे शोधणारी वैश्विक मानसिकता, समलिंगी लेखकाला भोगाव्या लागणाऱ्या यातना आणि प्रेम हा शब्द संकोचत नेण्याच्या वेदना यांच्यातील साम्ये, ब्राह्मणी परंपरांमधील स्त्रीचे शोषण आणि वेश्या व्यवसायातील स्त्रीचे शोषण यांची तुलना अशांसारखे विषय मुक्तासारख्या तरुण मुलीला आव्हानात्मक वाटतात हे आश्वासक आहे. त्याचबरोबर नाटककर्ती म्हणून उभी राहताना ''मी स्वत:च्या प्रेमातून बाहेर पडले. पूर्वी आपल्याला इतकं छान वाक्य लिहिता आलं याचा आनंद व्हायचा. आता समोरच्या व्यक्तीवर मी सांगत असलेल्या गोष्टीचा काय परिणाम होईल, मला तो कसा घडवून आणायचा आहे, याचा विचार मी सतत करत

राहते,'' असे ती सांगते. ''मी अशा सामाजिक पार्श्वभूमीतून आले आहे जिथे थेट, स्पष्ट, भेदक न बोलता, आडून आडून, रूपकात्मक बोलण्याची शैली जास्त स्वीकारली जाते. कोलटकरांची भिजकी वही- त्यातली विपाशा- वाचली आणि माझ्यावरच्या भाषिक संस्कारांसमोर प्रश्नचिन्ह उभं राह्यलं. तितकी थेट भाषा रंगभूमीवर बोलायची का? ही भाषा समजू शकणाऱ्यांसाठीच नाटक लिहायचं की सर्व लोकांसाठी? नाटकातून बोध दिला गेला पाहिजे हे मान्य केलं तरी नाटकातून मनोरंजन झालंच पाहिजे तर मग भाषा कशी वापरायला हवी? शब्दांपलीकडे रंगभूमीचीही भाषा असते- नेपथ्य, इतर कलाप्रकार, वेषभूषा यांची भाषा कशी वापरायची? शब्दांची काटछाट कशी करायची? असे अनेक प्रश्न घेऊन मी त्यांची उत्तरं नाटकांमधून शोधते आहे.'' नाटके का लिहावीशी वाटतात याबद्दल बोलताना ती म्हणाली, ''पूर्वी दूरदर्शनवरच्या मराठी मालिका मी बघायचे. त्यातले स्त्रियांचे चित्रण अतिशय अस्वस्थ करणारे होते. त्यामुळे मग वेगळा विचार करणाऱ्या स्त्रिया निर्माण करण्याची आवश्यकता वाटली.''

'विपाशा' या तिच्या एकांकिकेची नायिका हायपेशिया ज्ञानाच्या भक्कम पायावर उभी असणारी स्त्री आहे. इ.स.पूर्व ३५०मध्ये जन्माला आलेली ही ग्रीक स्त्री गणितज्ञ, खगोलशास्त्रज्ञ होती. प्लेटोचा वारसा सांगणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या शाखेची अभ्यासक होती. लग्न, मुलेबाळे या पारंपरिक स्त्री-धर्मामध्ये तिला रस नाही. पेगन संस्कृतीचा वारसा सांभाळणाऱ्या तत्त्ववेत्त्यांना ख्रिश्चन धार्मिक संस्कृतीत भोगाव्या लागलेल्या यातनांचे लिंगभावी टोक म्हणजे हायपेशियाचा मृत्यू. स्त्री असूनही पारंपरिक स्त्रियांसारखी जगत नाही म्हणून संतापलेल्या पुरुषसत्तेने तिची हत्या केली. त्याची ही गोष्ट. ''पुरुषाच्या खांद्याला खांदा भिडवून चालेलही पण म्हणून बायकांचे स्तन आपण घेऊन फिरणार का?'' हा प्रश्न धर्मगुरू त्याच्या शिष्याला विचारतो. हा ख्रिश्चन धर्मगुरू मनुस्मृतीतील भाषा बोलतो - ''कौमार्यात वडिलांकडे, नंतर भावाकडे, तारुण्यात नवऱ्याकडे आणि वार्धक्यात मुलाकडे जबाबदारी असते स्त्रीची. स्त्री कधीच स्वतंत्र नसते.'' हायपेशियाची हत्या करावी असे सांगताना तो म्हणतो, ''पुरुषासारखा पुरुष कायम





ताब्यात ठेवतो स्त्रीला आणि एकदा समाज आपला म्हटला की त्यातली प्रत्येक स्त्री आपलीच नाही का? तिच्यावर वर्चस्व राखता आलं पाहिजे आणि फारच दीड शहाणी असेल तर तिला संपवताही आलं पाहिजे,'' असे तो सांगतो. हायपेशिया आपल्या मासिक रक्तस्रावाने थबथबलेले वस्त्र तिला अडवणाऱ्या पुरुषाच्या हातात देत विचारते, ''लढाईत सांडलेलं रक्त पवित्र म्हणतोस ना? मग हे माझ्या स्त्रीधर्माचं रक्त आहे. वयात आल्यापासून लढते आहे मी समाजाच्या नजरांशी. माझं कौमार्य अबाधित राखण्याची किंमत आहे हे रक्त.'' मुक्ताची हायपेशिया अशी वैश्विक होते. पुरुषसत्तेला म्हणजेच हिंसेला, स्त्रियांवरील आणि ज्ञानावरील बंधनांना, क्रौर्याला ठामपणे प्रश्न विचारते.

'ऑस्कर' ही एकांकिका १९व्या शतकात ऑस्कर वाईल्ड या आयरिश नाटककाराला समलैंगिकतेसाठी भोगाव्या लागणाऱ्या तुरुंगवासाच्या चर्चेवर उभी राहते. एकांकिका फक्त ऑस्कर वाईल्डविषयी बोलत असली तरी तिचे धागे समलैंगिक संबंधांबरोबरच प्रेम म्हणजे काय या चर्चेशी जोडले आहेत. प्रेम ही संकल्पना संकोचणे म्हणजे माणूसपणाची कल्पना संकोचणे असा रोख या एकांकिकेचा आहे. वाईल्डच्या समलिंगी असण्याच्या आरोपांवर आधारित खटल्याची पार्श्वभूमी मुक्ताने उचलली आहे. प्रत्यक्ष वाईल्डचे लेखन व त्यातील राजकारण, त्याची कलाविषयक भूमिका, त्याचा आयरिश वारसा या बारकाव्यांना बाजूला ठेवत प्रेमाची व्याख्या कशी करायची या कल्पनेभोवती ही एकांकिका फिरते. ''इतक्या वेगवेगळ्या प्रकारे, वेगवेगळ्या नात्यांमध्ये प्रेम करता येतं तर कोणाला चूक म्हणायचं? ऑड समजायचं? आणि का?'' असा प्रश्न ऑस्करच्या तोंडून ती विचारते तेव्हा हाच प्रश्न मग लव्ह-जिहादाच्या राजकारणालाही विचारता येतो.

'रंग' ही एकांकिका एकाच वेळेस स्पर्धात्मक जगण्याचे तकलुपी निकष आणि मग त्यांचे वंशवादाशी असणारे नाते यावर भाष्य करते. भांडवली अर्थव्यवस्था विक्री-व्यवस्थेच्या आक्रमकतेवर विकसित होते. त्यात अनेक पूर्वग्रहांना खतपाणी घातले जाते आणि मग ते पक्के करण्यातून पैसा मिळवता येतो. या एकांकिकेची नायिका गौरी अत्यंत आक्रमकपणे गोऱ्या रंगासाठीचे क्रीम बाजारात यशस्वी करण्याची धडपड करते आहे. पण जेव्हा वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या साहाय्याने गरोदर राहताना गफलतीने ती कृष्णवर्णीय मुलाची आई होणार असे तिला समजते तेव्हा मग तिच्यापुढे प्रश्न उभा राहतो. ते मूल त्याच्या कृष्णवर्णीय आई-बापांकडे देऊन टाकायचे का? या उपायावर तिची मातृत्व भावना मात करताना मुक्ता दाखवते. हा निर्णय कॉट्झीच्या 'लेगसी'मधील नायिकेच्या निर्णयाइतका संपूर्ण विवेकी सामाजिक भानातून घेतलेला नसला तरी जैविक प्रेरणा विवेकी बनवण्याकडे उचललेले

हे पाऊल आहे असे म्हणता येईल.

'टिळा' ही अत्यंत कठोर प्रश्न विचारणारी एकांकिका आहे. ७०च्या दशकातील मूलगामी स्त्रीवाद्यांच्या संतापाचे प्रतिध्वनी इथे उमटतात. दगडूशेठ गणपतीच्या दर्शनाला आलेली विवाहित सुमन चक्कर येऊन पडते आणि कोठीवालीच्या हाती लागते. पण घरातून बाहेर पडल्यावरच सुमन प्रामाणिकपणे नवऱ्याच्या घरालाच प्रश्न करते, ''मी तुम्हाला सोडून पळून गेले कारण मला प्रेम हवं होतं थोडं, थोडा आदर, थोडं स्वातंत्र्य... हे पाळीचे दिवस परत अंग चोरून, लाजिरवाण्यासारखं, वांझ म्हणून हिणवलं जात, नव्हतं जगायचं मला. वेगळंच वाटलं आज. पाळी सुरू आहे म्हणून ना कोणी टोचून बोललं, ना कोणी बाजूला टाकलं. ज्यांना आपण असंस्कृत म्हणतो त्यांनी तुमच्यापेक्षा सुसंस्कृतपणे वागवलं हो मला!'' विवाहसंस्थेतील स्त्रीत्वाचा अवमान आणि वेश्याव्यवसायातील स्त्रीचे निर्णय-स्वातंत्र्य असा विरोध मांडत एकांकिका पुढे जाते. वेश्या व्यवसाय करताना लग्नाची बायको व्हायचं अप्रूप वाटणाऱ्या सरलेला सुमन सांगते, ''नव्याची नवलाई संपली की कोठीवरचा व्यवहार असो वा घर, फार नाही फरक उरत.'' म्हणूनच स्वत:ला आवडेल त्याच पुरुषाबरोबर झोपणारी अमिरा तिला आवडते.

मुक्ताने लिहिलेल्या या चारीही एकांकिकांमध्ये तरुण मुलीला पडणारे प्रश्न प्रामाणिकपणे आणि निर्भयपणे मांडले आहेत. स्त्रीच्या स्थानावरून प्रश्न मांडत असताना तिला व्यवस्थेचे भान आहे. पुरुषी मूल्यांनी बनलेली व्यवस्था पारंपरिक पूर्वग्रह बळकट करत नेते, तसेच पुरुषसत्ता ही राजकीय सत्ता आणि धर्मसत्ता यांच्यातून बळ मिळवते अशी मांडणी ती करताना दिसते. २१व्या शतकाच्या या टप्प्यावर सर्व प्रकारच्या सत्ताकारणाला नव्याने प्रश्न विचारण्याची गरज आहे. कोणत्याही एका विचारधारेतून सगळ्या प्रश्नांना उत्तरे मिळणार नाहीत हे उघड आहे. पण तरुण मने संकुचित विचारांमध्ये बंदिस्त करणे, त्यांना प्रश्न विचारण्याची खुली संस्कृती नाकारणे हा धोका आज सर्वत्र जाणवतो आहे. कोंडली गेलेली मने मग विस्कटतात, विकृत विचारांचा आधार घेतात. पर्यावरणीय समस्या जटिल होत असताना आणि विषमतेची दरी रुंदावत असताना हिंसात्मक धारणा प्रबळ होत जातात. हे विस्कटलेपण सावरायचे तर विवेकाचा आधार घेणे आवश्यक आहे. त्यासाठी तरुण मुलींनी जास्तीत जास्त प्रश्न विचारायला हवेत आणि त्यांची विवेकी उत्तरे मिळवण्याचा आग्रहही धरला पाहिजे. थेट प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य घेणाऱ्या मुक्ताच्या एकांकिका भविष्यात अधिकाधिक सक्षमतेने ही परंपरा पुढे नेतील, अशी आशा आहे.

वंदना भागवत
९६५७५५८५५०

व्हिडिओवरील भाषण...

# मानवी नात्यातील सूक्ष्म गोष्टी उलगडायला आवडतात...



नमस्कार!

सर्वप्रथम, 'महाराष्ट्र फाउंडेशन अमेरिका'चे मन:पूर्वक आभार! 'रा. शं. दातार नाट्यपुरस्कार' हे नाव, त्याची रक्कम, हा पुरस्कार देणारी संस्था ह्या सर्वांमुळे हा मोठा गौरव वाटतोच पण या पुरस्काराला असलेला मोठा इतिहास आणि त्या रूपाने तुम्ही सर्वांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास ह्यामुळेही हा पुरस्कार माझ्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. बहुधा म्हणूनच, इतक्या दिग्गजांसोबत हा पुरस्कार मिळणं अजूनही स्वप्नवत वाटतं आहे.

मला लिहायला खूप आवडतं. खरंतर हे वाक्य मी अजून छान, फुलवूनही म्हणू शकेन, पण त्याचा अर्थ माझ्यासाठी तेवढाच साधा सरळ सोपा आहे. I am because I write. एखादा अनुभव घेताना, एखादा विचार मनात आल्यावर मी अस्वस्थ होते. कितीतरी शब्द मनात एकमेकांना धडकू लागतात. एखादी गोष्ट जगताना, त्या क्षणातही तिचं एक तटस्थ निवेदन मनात सुरू झाल्यासारखं होतं. सगळं अगदी घशापर्यंत आल्यासारखं वाटू लागतं आणि मग आपोआप मी लिहू लागते. मला असं वाटतं जेव्हा जेव्हा हे असं एवढं दाटून येतं तेव्हाच 'विपाशा', 'टिळा', 'ऑस्कर' आणि 'रंग' सारख्या एकांकिका जवळपास एकटाकी लिहिल्या जातात.

तसं पहायला गेलं तर मी पुण्यात अगदी साधं आयुष्य जगते. माझ्या वाट्याला 'संघर्ष' म्हणावं असं काही फार आलेलं नाही. तरी माझ्या छोट्याशा जगात जी समाजातील विषमता, स्त्री-पुरुष भेदभाव, धर्मांधता, रंगाचं राजकारण आणि दुटप्पीपणा मला दिसतो, त्यावर बोलल्याखेरीज मला राहवत नाही. मला मानवी नात्यांमधल्या सूक्ष्म गोष्टी उलगडायला आवडतं. त्यामुळेच आजुबाजूच्या व्यक्ती कितीही वेगळ्या-विरुद्ध विचारांच्या असल्या तरी त्यांच्यावर फुली मारायला, फक्त माझ्याच विचाराच्या माणसांत रहायला मला आवडत नाही. उलट अशांची विचारप्रक्रिया समजून घेतल्याने मला माझी बाजू, माझं मत समजून घ्यायला मदत होतेच पण नाटकात मांडताना एखादी गोष्ट विरोधी व्यक्तींनाही विचार करायला भाग पाडेल अशी बिनचूक कशी लिहिता येईल ह्याचाही अभ्यास होतो.

मला वाटतं लिहिण्याचे दोन भाग असतात. आपल्याला हवं ते शब्दांत मांडता येणं आणि आपल्याला हवं तेच पण समोरच्यापर्यंत पोहोचेल असं मांडता येणं. हा दुसरा भाग जमवणं अवघड. त्यात परत लिहिण्याच्या आळसापासून, 'मी का माझे शब्द बदलू?' या स्वाभिमानापर्यंत सगळं येतं. पण तरी आपला मुद्दा न सोडता तो अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी त्याचं रूप कसं असावं



हा खूप महत्त्वाचा आणि व्यावहारिक धडा मला नाटकाने दिला. नाटक हे एक जिवंत माध्यम आहे. कथा, कादंबऱ्या, इतकंच काय तर चित्रपटही लोक कसा बघतात, त्यांना काय वाटतं ही पहिली, खरी प्रतिक्रिया लेखकाला कळूच शकत नाही. पण नाटकाचं तसं नाही. नाटक सादर होताना ऐकू येणारा प्रत्येक हुंकार, हशा, उसासा मला काहीतरी शिकवतो. मला परत परत नाटक करायला भाग पाडतो.

ह्या पुरस्कारासारखी एखादी मोठी गोष्ट आयुष्यात घडली की आपण त्यातून शून्य होणं खूप महत्त्वाचं असतं असं मला वाटतं. तरच आपण पुन्हा नव्याने, प्रामाणिक तळमळीने काहीतरी लिहू शकतो. म्हणूनच ह्या पुरस्काराने दिलेलं जबाबदारीचं भान जागं ठेवत असतानाच ह्या सन्मान आणि मोठेपणाच्या वजनातून शून्य व्हायचंही मी आज ठरवते आहे.

हा पुरस्कार फक्त माझा नाही. माझे आई-बाबा, कुटुंब, माझी शाळा - अक्षरनंदन, फर्ग्युसन कॉलेज ह्यांनी केलेले संस्कार आणि कागदावरची संहिता अक्षरश: जगून तिला अर्थ देऊ पाहणारं माझं नाट्यप्रेमी वर्तुळ ह्यांच्यामुळेच हे शक्य झालं आहे.

पुरस्कार जाहीर झाल्यानंतरचा दिवस मला अजून आठवतो. एकीकडे शुभेच्छांचा वर्षाव होत असतानाच, दुसरीकडे आता पुढच्या प्रयोगाची तिकिटं जाणार आहेत ना? ह्याची चिंता करणं चालू होतं. पुरस्कार तर मोलाचा आहेच पण तुम्हा रसिक प्रेक्षकांनी असं काही वेगळं सांगू पाहणाऱ्या माझ्याच नाही तर इतरही प्रयोगांना आवर्जून उपस्थित राहणंही मोलाचं आहे असं मला वाटतं.

काही वेगळं मांडू पाहणाऱ्या - संविधानाची, खुल्या विचारांची मूल्य सांगणाऱ्या आणि त्याच वेळी रंजनही करणाऱ्या गोष्टी नाटकांतून मांडत राहण्याचं प्रोत्साहन मला दिल्याबद्दल 'महाराष्ट्र फाउंडेशन', निवड समिती व परीक्षकांचे पुन्हा एकदा आभार!

भेटूया नाट्यगृहात!

**मुक्ता बाम**
७७२००९४८०७

# उद्याच्या चळवळीचा आश्वासक चेहरा : युवराज गटकळ

**रमेश दाणे**



महात्मा गांधीजींनी महाराष्ट्र हे कार्यकर्त्यांचं मोहोळ आहे असं म्हटलं होतं. सेवाग्राम आश्रमातील वास्तवाच्या दरम्यान एकूणच महाराष्ट्रातील स्वातंत्र्याच्या चळवळीतील कार्यकर्त्यांचा आवाका बघून त्यांना तसं प्रत्यंतर आलं होतं. सुधारणावादी नेत्यांची व कार्यकर्त्यांची मोठी यादी महाराष्ट्राच्या इतिहासात उपलब्ध आहे. प्रत्येकाची आगळी वेगळी अशी कामगिरी आहे. त्यांत बहुतेकजण एके काळी गांधीजींच्या सहवासात आलेले कार्यकर्ते आहेत. महाराष्ट्रात गांधीजींचा आध्यात्मिक वारसदार आणि बहुआयामी म्हणून ज्यांचा उल्लेख होतो, ते भारतरत्न विनोबा भावे आणि मायमाउली साने गुरुजी यांनी गांधीजींचे विचार पुढे नेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या विचारांनी झपाटलेली तिसरी-चौथी पिढी महाराष्ट्रात आज कार्यरत आहे किंवा त्या विचारांनुसार जगण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यांची संख्या कमी असली तरी त्यांचा प्रभाव आणि नैतिकतेच्या संदर्भात सार्वजनिक जीवनातील त्यांचं मोठेपण प्रकर्षाने अधोरेखित होत आहे. त्या नव परंपरेत एक नाव अग्रक्रमाने जोडावं लागेल आणि ते आहे युवराज तेजमाला-श्रीहरी गटकळ याचं!

युवराजला मिळालेला महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार योग्यच म्हटला पाहिजे. त्यासाठी निवड करणाऱ्या समितीबाबत कृतज्ञता व्यक्त केलीच पाहिजे. ज्या पद्धतीने आणि ज्या जोशात युवराज

श्रीहरी गटकळ याने राजधानी दिल्लीच्या सीमेवर वर्षभर ठाण मांडून बसलेल्या शेतकऱ्यांच्या जनआंदोलनामध्ये शेतकरी प्रतिनिधींचं महाराष्ट्राच्या आणि एन.ए.पी.एम. (National Alliance of People Movementsच्या) वतीने जे नेतृत्व केलं त्यास तोड नाही. यात कुठलीही अतिशयोक्ती नाही. ही त्याची कामगिरी शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या इतिहासात निश्चितपणे नोंदली जाईल. महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळीतील लोकांना त्यांच्या या योगदानाचा सार्थ अभिमान आहे. महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या विशेषत: सेवाग्राम आश्रमातील मातीचा कलश त्याने आंदोलनस्थळी पोहचविला. त्यामुळे आंदोलनाला नैतिक बळ आणि भावनिक झालर लाभली.

युवराजची कौटुंबिक पार्श्वभूमी कष्टकऱ्यांच्या परंपरेची आहे. ऊसतोड मजूर किंवा निमबटाईने शेती करणाऱ्या अल्पभूधारक कुटुंबाची प्राथमिक समस्या असते ती पोटापाण्याची. अशा कष्टकरी परिवारात गांधी विचारांचा प्रवासी निपजतो हा केवळ योगायोग नाही. विनोबांच्या म्हणण्यानुसार तो आत्म्याचा म्हणजे मनातून उठलेला विद्रोहाचा आवाज आहे. 'सर्वोदय' अशा आत्म्याचा आवाज आहे आणि युवराजला हा आवाज त्याच्या आयुष्यात ऐन तारुण्यातच ऐकू आला, हे महत्त्वाचं! आपण ज्या क्षेत्रात काम करतो, जिथं करतो, ते काम सर्वोदयाचं असतं म्हणजेच सर्वोदयाचा विचार जगण्याचं असतं. युवराज तसा जगतो, हे स्पष्टपणे दिसतं.

अनेक आंदोलनात सहभाग, अखेरच्या माणसासाठी जीव टाकणं, त्यांची दु:खं समजून घेऊन त्यावर हळुवारपणे फुंकर घालणं हे सर्वांना जमत नाही. जे तसे जगलेले असतात किंवा ज्यांना तसा अनुभव असतो, त्यांनाच तळ-थरातल्या माणसाची कणव असते. तो साध्यासुध्या माणसांसाठीचा एल्गार असतो. युवराज गटकळ हा त्या धाटणीतला आहे. कोविड-१९मुळे लोक भयभीत होऊन घरात बसलेले होते. अशा वेळी शेकडो किलोमीटर पायी जात असलेल्या हजारो श्रमिकांची हाक



कुणाला ऐकू जात नव्हती. ती हाक ज्यांनी ज्यांनी ऐकली त्यात युवराज गटकळ हा आघाडीवर होता. जिवाची पर्वा न करता त्याने जी जी मदत शक्य होती, ती शेतकऱ्यांना केली. आम्ही ती पाहिली आहे, अनुभवली आहे. मेधाताई पाटकरांनी हे त्याचे गुण हेरले आणि या हिऱ्याची पारख केली आणि त्याच्यावर महाराष्ट्राच्या एन.ए.पी.एम.ची (राष्ट्रीय जनआंदोलनाची) जबाबदारी सोपवली. ती युवराजने प्रामाणिकपणे आणि निष्ठेने निभावली.

युवराजने उच्च शिक्षण घेऊन गांधींच्या चळवळीतील खडतर मार्ग स्वत:साठी निवडला. सर्वार्थाने तो खडतर मार्ग आहे. परंतु युवराजने तो समजून-उमजून स्वीकारलेला आहे. त्याचं कारण असावं त्याच्यातील खिलाडूवृत्ती. मुळातच शिक्षण सुरू असताना क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट खेळाडू म्हणून जी चमकदार कामगिरी त्यानं बजावली, त्यामुळे जी खिलाडूवृत्ती त्यांच्यात निर्माण झाली त्याचाच परिणाम म्हणून कुठेही वादग्रस्त न ठरता चळवळीत तो यशस्वी होऊ शकला असं आमच्यासारख्यांना वाटतं. खादीचा अंगीकार, नशामुक्तीसाठी प्रयत्न, अनेक पदयात्रा, सायकल यात्रा, वाहन यात्रा आणि त्यातून प्रबोधन कृतिकार्यक्रम असा युवराजचा आजवरचा प्रवास आहे. त्याला या पूर्वी अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यात आता हा महाराष्ट्र फाउंडेशनचा युवा-पुरस्कार. हा युवराजचा यथोचित गौरव आहे. पुरस्कारासारख्या सन्मानाने माणसं मोठी होतात, पण त्याबरोबर त्यांची जबाबदारीही वाढते. त्या जबाबदारीची नम्र जाणीव युवराज गटकळ याला आहे. विविध प्रदेशांची भटकंती हा आणखी एक युवराज गटकळ याचा पैलू आहे. त्यात शेती ही आली. म्हणजे प्रवासात निसर्ग, संस्कृती, लोकजीवनाची अधिक जवळीक निर्माण होते. अनेक पुस्तकं वाचण्यापेक्षा निसर्ग आणि माणसं वाचण्यातून माणूस प्रगल्भ आणि बहुआयामी होतो. युवराज हे त्याचं उदाहरण म्हणता येईल.

१९८०च्या दशकानंतर डाव्या आणि परिवर्तनवादी, मध्यममार्गी, विधायक चळवळींची तसेच कामगार चळवळींची मोठ्या प्रमाणावर पडझड झालेली आहे. त्यातच आता संस्था-संघटनांमध्ये सत्तालालसा, संपत्तीचा हव्यास असलेल्या लोकांची आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या छुप्या समर्थकांची गर्दी वाढत असल्याचा अनुभव येत आहे. शिवाय मागच्या पिढीने विधायक क्षेत्रात नवी पिढी यावी यासाठी फारसे प्रयत्न केले नसल्याने सगळ्याच संस्था- संघटना अलीकडे युवकांच्या शोधात आहेत. 'अलीकडचे युवक चळवळीत का येत नाहीत' यावर विचार करताना दिसत आहेत. अशा काळात युवराज गटकळ यांच्यासारखे तरुण खूप आश्वासक वाटतात. सारंच काही अद्यापी संपलेलं नाही असा दिलासा देतात. युवराज गटकळ हा उद्याच्या चळवळींचा आश्वासक चेहरा आहे, यात शंका नाही.

रमेश दाणे
९४२२२८८८३३

व्हिडिओवरील भाषण...

# चौदा वर्षांच्या पूर्णवेळ कार्यकाळात घडलो, समृद्ध झालो...



नमस्कार,

मी युवराज श्रीहरी गटकळ, सर्वप्रथम महाराष्ट्र फाउंडेशन, मासूम, साधना ट्रस्ट, पुरस्कार निवड समिती तसेच महाराष्ट्र फाउंडेशनच्या अमेरिका आणि भारतातील सर्व साथींना आदरपूर्वक धन्यवाद देतो. सोबतच NAPM, सर्वोदय आणि तमाम सहकारी, साथी व मार्गदर्शकांचेही मन:पूर्वक धन्यवाद. महाराष्ट्र फाउंडेशन युवा पुरस्कारसाठी नाव जरी माझे असले तरी NAPM आणि सर्वोदयासह परिवर्तनाच्या चळवळीतील सर्व साथींचा हा सन्मान आहे. हा पुरस्कार स्वीकारताना स्व. साथी अनीता पगारे व डॉ. एस. एन. सुब्बारावजी यांची आठवण कायम राहील.

महाराष्ट्र फाउंडेशनचा या वर्षीचा युवा पुरस्कार जरी मिळाला असला तरी गेल्या १९ वर्षांच्या सामाजिक चळवळीच्या कार्यकाळातील १४ वर्षांच्या पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून आलेले अनुभव हे ऊर्जा देणारे आहेत. जसे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. बाबा आमटे, डॉ. एस. एन. सुब्बारावजी (भाईजी), मेधा पाटकर यांच्यासह माझी अनेक प्रेरणास्थाने आहेत. मार्गदर्शन आणि कामाची दिशा मिळण्यास योग्य भूमिका प्राप्त होत आहेत. तसेच तुकोबा, ज्ञानोबा, तुकडोजी आणि गाडगे बाबांसह वारकरी संप्रदायांचेही महत्त्वाच्या टप्प्यावर दिशा मिळण्यास योगदान लाभले आहे. यापैकी बाबा आमटे, डॉ. एस. एन. सुब्बारावजी, मेधा पाटकर व डॉ. डी. जी. पारिख यांच्यासोबत प्रत्यक्ष कार्य करण्याची संधी मिळाली, सहवास लाभला. त्यामुळे वैचारिक जडणघडणीसोबत कृती कार्यक्रमाची ऊर्जा इथे प्राप्त झाली. आणखी एक प्रेरणास्थान म्हणजे माझे आई-वडील आणि आजोबा हेही आहेत. ऊसतोडणी मजुरांचे शोषण आणि अन्याय हे प्रमुख कारण परिवर्तनाच्या संघर्षात सहभागी होताना होते. त्यातूनच 'समता, सादगी, स्वावलंबन' या मंत्रासह जातिनिर्मूलन आणि सामाजिक शांतीसाठी कार्यप्रवास सुरू झाला आणि उस्मानाबादच्या अंबी या खेडेगावातून वर्धेतील सेवाग्राम आश्रमापर्यंतचा प्रवास झाला.

जनआंदोलनाच्या राष्ट्रीय समन्वयासोबत कार्यकर्ता म्हणून अनेक यात्रा व आंदोलनामध्ये सक्रिय राहून जबाबदाऱ्याही पार पाडल्या. राज्यसमन्वयक म्हणून जबाबदारी घेतली आणि CAA विरोधी आंदोलन, कोविड संसर्ग व शेतकरी आंदोलन यात एन ए पी एम चे प्रतिनिधित्व करताना मर्यादेसोबतच नेतृत्व क्षमतेतसुद्धा मजबुती प्राप्त झाली. सर्वोदयामध्ये जशी वैचारिक समृद्धी प्राप्त केली तशीच एन ए पी एमसारख्या समन्वयातील सर्व साथींच्या सक्रियतेमुळे समन्वय साधत कार्यकर्ता म्हणून घडताही आले.

आजवरच्या सामाजिक कार्यकाळात अनेक युवक व विद्यार्थी यांना बऱ्याच शिष्यवृत्ती, फेलोशिप, शैक्षणिक अर्थसाहाय्य, व्यावसायिक मार्गदर्शन, अर्थसाहाय्यासह योग्य दिशा देण्यास यशस्वी ठरलो आहे, याचे समाधान आहे. फी वाढ विरोधी आंदोलनामुळे लाखो विद्यार्थ्यांचा आर्थिक फायदा झाला. व्यसनमुक्तीच्या कार्यात अनेक लोक व्यसनमुक्त करू शकलो याचाही आनंद आहे.

आपत्तीच्या काळात उपयुक्त मदत व सामाजिक सौहार्दता निर्माण करण्यात महत्त्वाचे पाऊल टाकू शकलो. मासिक पाळीसह समाजातील रूढी-परंपरांबाबत जागृती आणि पर्यावरणविषयक जागृतीने सायकल यात्रेच्या माध्यमातून वेगळे अनुभव आले.




सिंधूर बॉर्डरवरील शेतकरी आंदोलनात युवराजचा सक्रीय सहभाग




सिंधूर बॉर्डरवर शेतकरी आंदोलनात सहभागी झाल्याबद्दल भगतसिंह यांची भाची गुरुमित कौर यांच्या हस्ते युवराजचा सत्कार

NRC-CAA विरोधी आंदोलनातील सहभाग तसेच मस्जिद परिचय कार्यक्रमामुळे धार्मिक सलोखा निर्माण करू शकलो.

हातमाग प्रशिक्षणामुळे अनेक महिलांना कोविड काळातही रोजगार निर्माण करण्याचे सकारात्मक समाधान आणि ग्रामीण रोजगारावर एक उपाय मिळाला. कोविड रिलीफमध्ये तीन किचन चालवून मजुरांना आपल्या गावी पोहचवता आले. बोडोलँड (आसाम) येथील शांती यात्रेतील अनुभव भयानक असूनदेखील संवादातून सकारात्मक राहिला. कोविड काळातील अनेक अनुभव हे दुःखद असले तरी कायम माणुसकीचे दर्शन घडविणारे राहिले आहेत. मग ते डेडबॉडीचा अंत्यविधी करण्यापासून ते कोविडग्रस्त पेशंटची देखभाल, काऊन्सलिंग करतांना प्रशासन पातळीवर कधी-कधी संघर्ष, संवाद व कधी समाधान असे अनुभव राहिले आहेत.

दिल्लीसह संपूर्ण देशभर दीड वर्षापेक्षा जास्त काळ चाललेल्या शेतकरी आंदोलनात सक्रिय सहभाग, तसेच किसान ज्योत यात्रेचे अनुभव हे कायम ऊर्जा देणारे आत्मविश्वास वाढविणारे आहेत. शेतकरी आंदोलनातील अनुभवाने सत्याग्रह, अहिंसा आणि संविधान व जनेतचा आवाज मजबूत करण्याची सकारात्मक भूमिका प्राप्त झाली. एकूणच १४ वर्षांच्या पूर्णवेळ कार्यकाळात घडता आले, समृद्ध होता आले याचे कायम समाधान आहे.

हे नक्कीच सत्य आहे की पुरस्काराने कार्यकर्त्याला उत्साह प्राप्त होत असतो आणि महाराष्ट्र फाउंडेशनच्या युवा पुरस्काराने माझ्यासारख्या कार्यकर्त्याला तर मोठी ऊर्जा, ताकद, प्रोत्साहन आणि आर्थिक पाठबळसुद्धा प्राप्त झाले आहे. ज्यामुळे माझ्या कामात आणखी सकारात्मक दृढनिश्चयासह आत्मविश्वास प्राप्त झाला आहे. मला मिळालेल्या या पुरस्कारामुळे माझ्यासह अनेक साथींना प्रोत्साहन मिळाले. जे कार्य गेली अनेक वर्षे करत आहोत ते ऊसतोडणी मजुरांच्या बाबतीतही कार्य आता सकारात्मक गतीने वाढेल आणि संघटन बांधणीलाही गती मिळेल. पुनश्च महाराष्ट्र फाउंडेशनचे धन्यवाद. पुढील संकल्पित महत्त्वाचे कार्यक्रम ते असे – गाव आणि शाळा तेथे ग्रंथालय, २० गावांमागे एक व्यसनमुक्ती केंद्र, २५ गावांमागे एक विद्यार्थी मार्गदर्शन केंद्र, कामगार साहाय्यता केंद्र, प्रत्येक ५ गावांमागे ग्रामोद्योग उत्पादन केंद्र व विक्री प्रक्रिया मार्गदर्शक केंद्र, अनेक ठिकाणी कम्युनिटी सेंटर, सामाजिक सलोखा, पर्यावरण जागृती यात्रांचे आयोजन, विविध स्पर्धा-खेळ आणि कलांच्या माध्यमातून समाजात आत्मविश्वास निर्माण करणे, आरोग्य शिक्षण आणि रोजगार व्यवस्था, परिवर्तन व महिला सामाजिक-राजकीयदृष्ट्या सक्षम-सशक्तीकरण उपक्रम म्हणजेच 'समता सादगी स्वावलंबन' संविधान समृद्धी कार्यक्रम.

युवराज श्रीहरी गटकळ

# निवड समिती

- **साहित्य पुरस्कार निवड समिती**
(भारतातील)
श्रीधर नांदेडकर (अध्यक्ष)
अविनाश सप्रे
जयश्री हरि जोशी
प्रवीण बांदेकर
मुकुंद टाकसाळे (समन्वयक)

- **रा. शं. दातार नाट्य पुरस्कार समिती**
(भारतातील)
प्रवीण भोळे (अध्यक्ष)
मनस्विनी ल. र.
दत्ता पाटील
मुकुंद टाकसाळे (समन्वयक)

- **साहित्य पुरस्कार निवड समिती**
(अमेरिकेतील)
शोभा चित्रे
सुनील देशमुख
रजनी शेंदुरे
विद्युल्लेखा अकलूजकर

- **समाजकार्य पुरस्कार निवड समिती**
(भारतातील)
निशिकांत भालेराव
सुनीती सु.र.
धनाजी गुरव
सुषमा शर्मा
विजया चौहान
विनोद शिरसाठ
रमेश अवस्थी
मनीषा गुप्ते

- **समाजकार्य पुरस्कार निवड समिती**
(अमेरिकेतील)
सुनील देशमुख
राजीव भालेराव
शोभा चित्रे
मंजुषा नाईक
मनीषा केळकर
सुनीता धुमाळे
शैला विद्वांस
अरुंधती विनोद

**महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार समन्वय समिती**

मनीषा गुप्ते (मासूम)
रमेश अवस्थी (मासूम)
मुकुंद टाकसाळे
विनोद शिरसाठ (संपादक, ‘साधना’ साप्ताहिक)
रवींद्र ठिपसे

# महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) पुरस्कार सन्मानित व्यक्ती व संस्था

## ▪ जीवनगौरव पुरस्कार ▪

नारायण सुर्वे १९९४
मेघ:शाम पुंडलिक रेगे १९९४
मालतीताई बेडेकर १९९५
य. दि. फडके १९९५
श्रीपाद नारायण पेंडसे १९९६
विष्णू भिकाजी कोलते १९९६
गो. वि. तथा विंदा करंदीकर १९९७
वसंत पळशीकर १९९७
विजय तेंडुलकर १९९८
रा. भा. पाटणकर १९९८
पु. ल. देशपांडे १९९९
रा. चिं. ढेरे २०००
भालचंद्र नेमाडे २००१
ग. प्र. प्रधान २००२
मारुती चितमपल्ली २००३
दिलीप पुरुषोत्तम चित्रे २००४
बाबूराव बागूल २००५
रा. ग. जाधव २००६
भा. ल. भोळे २००७
रावसाहेब कसबे २००८
गो. पु. देशपांडे २००९
अरुण टिकेकर २०१०
मंगेश पाडगावकर २०११
जयंत नारळीकर २०१२
कुमार केतकर २०१३
श्याम मनोहर २०१४
सुरेश द्वादशीवार २०१५
अरुण साधू २०१६
अनिल अवचट २०१७
शांता गोखले २०१८
वसंत आबाजी डहाके २०१९
महेश एलकुंचवार, २०२०

## ▪ विशेष पुरस्कार ▪

भा. रा. भागवत : बालसाहित्य १९९६
उमा कुलकर्णी : भाषांतर १९९७
बाबूराव बागूल : दलित साहित्य १९९८
वसंत दावतर : मराठी भाषा : संशोधन व समीक्षा १९९९
रा. वि. सोवनी : मराठीतून विज्ञानप्रसार २०००
गंगाधर मोरजे : लोकसाहित्य २००१
दत्ता भगत : दलित साहित्य २००२
केशव मेश्राम : दलित साहित्य २००२
रा. रं. बोराडे : ग्रामीण साहित्य २००३
भास्कर चंदनशिव : ग्रामीण साहित्य २००३
मनोहर शहाणे २००५
रत्नाकर मतकरी २००६
महादेव मोरे २००७
सानिया : कथा या वाङ्मयप्रकारासाठी २०१८
सुबोध जावडेकर : विज्ञानकथाचा वाङ्मय-प्रकारासाठी २०२०

## ■ प्रकाशन संस्था ■

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९४
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९९५
देशमुख आणि कंपनी, पुणे १९९६
मौज प्रकाशन गृह, मुंबई १९९७
साधना प्रकाशन, पुणे १९९८

## ■ नियतकालिके / अनियतकालिके ■

नवभारत, वाई १९९४
आजचा सुधारक, नागपूर १९९४
मराठी संशोधन पत्रिका, मुंबई १९९४
समाज प्रबोधन पत्रिका, पुणे १९९५
भाषा आणि जीवन, पुणे १९९५
विचारशलाका, लातूर १९९५
अर्थसंवाद, कोल्हापूर १९९६
संशोधक, धुळे १९९६
पंचधारा, हैदराबाद १९९७
परिसर-वार्ता, पुणे १९९७
मराठी विज्ञान परिषद पत्रिका, मुंबई १९९८
पुरोगामी सत्यशोधक, पुणे १९९८
ताज, मुंबई १९९९
सृष्टिज्ञान, पुणे २०००
बायजा, पुणे २००१
शब्दवेध, बुलडाणा २००४
अभिधानंतर, मुंबई २००५
परिवर्तनाचा वाटसरू २००६
पालकनीती, पुणे २००७

## ■ ग्रंथ पुरस्कार : ललित ■

ताम्रपट : रंगनाथ पठारे १९९४
दिवसेंदिवस : अनुराधा पाटील १९९४
भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा : भाऊ पाध्ये १९९५
उदकाचिया आर्ती : मिलिंद बोकील १९९५
वनवास : प्रकाश नारायण संत १९९६
एकूण कविता – दोन : दिलीप पुरुषोत्तम चित्रे १९९६
युगान्त : महेश एलकुंचवार १९९७
कार्यरत : अनिल अवचट १९९८
शुभ्र काही जीवघेणे : अंबरीश मिश्र १९९८
अधांतर : जयंत पवार १९९९
कबीर : अनुवाद – मंगेश पाडगावकर १९९९
तणकट : राजन गवस २०००
आतंक : विलास सारंग २०००
कोरडी भिक्षा : श्रीनिवास कुलकर्णी २००१
तिची कहाणी : ना. धों. महानोर २००१
गल्ली बदललेला मोर्चा : राम दातोंडे २००१
मन्वंतर : दीनानाथ मनोहर २००१
तिरिछ आणि इतर कथा : अनुवाद : जयप्रकाश सावंत २००१
उत्तरायण : रवींद्र शोभणे २००२
हिरोशिमाच्या कविता : अनुवाद : निरंजन उजगरे २००२
राहिले दूर घर माझे : शफाअत खान २००२
वकिल्या पारधी : लक्ष्मण गायकवाड २००३
जीवनायन : यशवंत मनोहर २००३

येरवडा विद्यापीठातील दिवस : कुमार सप्तर्षी २००३
राहीच्या स्वप्नांचा उलगडा : भारत सासणे २००३
आषाढमाती : श्रीकांत देशमुख २००४
खूप लोक आहेत : श्याम मनोहर २००४
पिढीजात : सतीश आळेकर २००४
भूमी : आशा बगे २००५
व्यवहाराचा काळा घोडा : अजीम नवाज राही २००५
निशाणी डावा अंगठा : रमेश इंगळे-उत्रादकर २००६
हॉटेल माझा देश : धम्मपाल रत्नाकर २००६
नंतर आलेले लोक : अरुण काळे २००७
आवानओल : अजय कांडर २००७
दर साल दर शेकडा : वीरधवल परब २००७
कुठल्याही विरामचिन्हाशिवाय : अविनाश साळापुरीकर २००७
इडा-पिडा टळो : आसाराम लोमटे २००८
मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा : प्रज्ञा दया पवार २००८
कवितान्तरण : चंद्रकान्त पाटील २००९
रिबोट : जी. के. ऐनापुरे २०१०
तृतीय पुरुषाचे आगमन : मंगेश नारायणराव काळे २०११
अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट : आनंद विंगकर २०१२
निरर्थकाचे पक्षी : नीरजा २०१२
पडझड : अशोक पवार २०१३
राखीव सावल्यांचा खेळ : किरण गुरव २०१४
तांडव : महाबळेश्वर सैल २०१४
खेळघर : रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ २०१५
विरंगी मी, विमुक्त मी : अंजली जोशी २०१६
धग असतेच आसपास : कल्पना दुधाळ २०१७
उजव्या सोंडेच्या बाहुल्या : प्रवीण बांदेकर २०१८
रिंगाण : कृष्णात खोत २०१९
तिसरा डुळा : किरण येले २०२०

## ■ ग्रंथ पुरस्कार : वैचारिक ■

आस्तिक शिरोमणी चार्वाक : आ. ह. साळुंखे १९९४
आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी : गो. म. कुलकर्णी १९९५
हिंदू-मुस्लीम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद : रावसाहेब कसबे १९९५
समाजपरिवर्तनाच्या दिशा : जनार्दन वाघमारे १९९६
जाळ्यातील चंद्र : म. वा. धोंड १९९६
नव वसाहतवाद आणि आधुनिक भारत : गोपाळ राणे १९९७
तुकाराम दर्शन : सदानंद मोरे १९९७
नारायण मेघाजी लोखंडे : मनोहर कदम १९९७
आंबेडकर : नलिनी पंडित १९९८
साहित्यविवेक : म. द. हातकणंगलेकर १९९८
काश्मीर प्रश्न : ना. य. डोळे १९९९
दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार : श्री. रं. कुलकर्णी १९९९
ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना : संपादक : विलास खोले १९९९
शोकात्म विश्वरूप दर्शन : जीवन आणि साहित्य : स. रा. गाडगीळ २०००
नवरात्र : अशोक चौसाळकर २०००
कर्मयोगी संन्यासी : नरेंद्र चपळगावकर २०००

मार्क्सचा मानव विचार : मुरलीधर पवार २००१
प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती :
म. अ. मेहेंदळे २००२
वि. स. खांडेकर : सचित्र चरित्रपट : जया दडकर
२००२
साहित्य प्रत्यय : भा. ल. भोळे २००३
महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : जीवन व कार्य
गो. मा. पवार २००५
तुकाराम : अंतर्बाह्य संघर्षाची अनुभवरूपे :
म. सु. पाटील २००५
मराठी साहित्य : इतिहास आणि संस्कृती :
वसंत आबाजी डहाके २००६
वानप्रस्थ : गणेश देवी २००७
समाचार : जयदेव डोळे २००८
बदलते विश्व : कुमार केतकर २००९
साम्राज्यवादविरोध आणि जातिविनाश :
आनंद तेलतुंबडे २०१०
महापुरुषांच्या नजरेतून स्त्री : मंगला आठलेकर
२०११
बाईमाणूस : करुणा गोखले २०१२
डाकीण : संध्या नरे-पवार २०१३
समग्र निरीश्वरवाद : शरद बेडेकर २०१५
'पाण्याशप्पथ' : प्रदीप पुरंदरे २०२०

## ▪ ग्रंथ पुरस्कार : अ-पारंपरिक ▪

जिहाद : हुसेन जमादार १९९४
आक्रोश : भीमराव गस्ती १९९५
दशक्रिया : बाबा भांड १९९६
लॉरी बेकर : अतुल देऊळगावकर १९९७
विमुक्तायन : लक्ष्मण माने १९९८
दुष्काळ आवडे सर्वांना :
अनुवाद : हेमंत कर्णिक २००४
आयदान : उर्मिला पवार २००४
खाली जमीन वर आकाश : सुनीलकुमार लवटे
२००७
तमाशा : एक रांगडी गंमत :
संदेश भंडारे २००७
कथा मुंबईच्या गिरणगावाची :
नीरा आडारकर व मीना मेनन २००८
एका साळियाने : लक्ष्मीनारायण बोल्ली २००९
आणि दोन हात : वि. ना. श्रीखंडे २०१०
दगडावरची पेरणी : सय्यदभाई २०१०
वाचणाऱ्याची रोजनिशी : सतीश काळसेकर
२०११
आपुलाचि वाद आपणासि : चंद्रकांत वानखडे
२०११
आश्रम नावाचे घर : अचला जोशी २०११
जाग मना जाग : लीला आवटे २०१२
प्लॅटफॉर्म नंबर झिरो : अमिता नायडू २०१३
चित्रव्यूह व चलत्चित्रव्यूह : अरुण खोपकर
२०१४
प्रतिमा-प्रचीती : नितीन दादरावाला २०१५
इर्जिक : अरुण जाखडे २०१६
सय : माझा कला प्रवास : सई परांजपे : २०१७
लीळा पुस्तकांच्या : नीतीन रिंढे २०१९

## ▪ रा. शं. दातार नाट्य पुरस्कार ▪

ढोलताशे : चं. प्र. देशपांडे २००३
कळा या लागल्या जीवा : किरण पोत्रेकर २००४
छोट्याशा सुट्टीत : सचिन कुंडलकर २००५
मळभ : किरण यज्ञोपवीत २००६

निब्बाण : अरुण मिरजकर २००७
ते पुढे गेले : मकरंद साठे २००८
खेळीमेळी : चंद्रशेखर फणसळकर २००९
आनंदभोग मॉल : आशुतोष पोतदार २०१०
बया दार उघड : सुषमा देशपांडे २०११
काय डेंजर वारा सुटलाय : जयंत पवार २०१२
राजकुमार तांगडे (अभिनय व लेखनासाठी) २०१३
हिंमाशू स्मार्त : जत्रेतलं जायंट व्हील २०१४
सुसाट : अजित देशमुख २०१५
अनिलकुमार साळवे (एकूण नाट्यलेखन) २०१६
समाजस्वास्थ्य : अजित दळवी : २०१७
हंडाभर चांदण्या : दत्ता पाटील २०१९
तेरवं : श्याम पेठकर २०२०

## ▪ नाट्य क्षेत्रातील विशेष कामगिरीसाठी पुरस्कार ▪
## रा. शं. दातार विशेष नाट्यपुरस्कार

अतुल पेठे २००६
मराठी रंगभूमीच्या तीस रात्री : मकरंद साठे २०१३
राजीव नाईक २०१८

## ▪ समाजकार्य सन्मान पुरस्कारांचे मानकरी – व्यक्ती व संस्था ▪

**१९९६**

- ◻ समाजप्रबोधन (संस्था) :
  महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सातारा
- ◻ समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  विलास वाघ, पुणे
- ◻ पर्यावरण-संवर्धन (व्यक्ती) :
  वासुदेवराव चित्रे, पालघर
- ◻ स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  विजया चौक, धुळे
- ◻ वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  रा. वि. भुस्कुटे, अंबरनाथ

**१९९७**

- ◻ स्त्रियांचे प्रश्न (संस्था) :
  कागद-काच-पत्रा कष्टकरी पंचायत, पुणे
- ◻ समाजप्रबोधन (संस्था) :
  लोकविज्ञान संघटना, पुणे
- ◻ स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  शुभदा देशमुख, गडचिरोली
- ◻ पर्यावरण-संतुलन / संरक्षण (व्यक्ती) :
  विजय नारकर, देवरूख
- ◻ वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  लीला पाटील, कोल्हापूर

**१९९८**

- ◻ पर्यावरण-संतुलन/संरक्षण (संस्था) :
  निसर्ग मित्र मंडळ, औरंगाबाद
- ◻ समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  जयंत गडकरी, मुंबई
- ◻ स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  बापूसाहेब नागाप्पा म्हेत्री, गडहिंग्लज
- ◻ पर्यावरण-संतुलन/संरक्षण (व्यक्ती) :
  हुमायून अब्दुलअली, मुंबई
- ◻ वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती)
  सुरेखा दळवी, पेण

**१९९९**

- ◻ प्रबोधन (संस्था) :
  समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी

- समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  मोहन हिराबाई हिरालाल, चंद्रपूर
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  रेहाना बैलिम, अमरावती
- पर्यावरण-संतुलन/संरक्षण (व्यक्ती) :
  कुसुम कर्णिक, पुणे
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  भरत कावळे, नाशिक

**२०००**
- स्त्रियांचे प्रश्न (संस्था) :
  महिला हक्क संरक्षण समिती, नाशिक
- समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  मनोहर कदम, मुंबई
- पर्यावरण-संतुलन/संरक्षण (व्यक्ती) :
  चिं. धों. आसवले, पुणे
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  संजय संगवई, पुणे.

**२००१**
- पर्यावरण-संतुलन/संरक्षण (संस्था) :
  ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स, कर्जत
- समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  मु. ब. शहा, धुळे
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  कुमुद पावडे, नागपूर
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  काळुराम दोधडे, पालघर
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  प्रभाकर म्हसकर, अंमळनेर

**२००२**
- समाजप्रबोधन (संस्था) :
  डॉ. पी. व्ही. मंडलीक ट्रस्ट, मुंबई
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  भुरीबाई मानसिंग शेळे, नंदुरबार
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  रजिया सुलताना, अमरावती
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  दत्ता इस्वलकर, मुंबई,
  डॉ. विवेक मॉंटेरो, मुंबई,
  डॉ. राम पुनियानी, मुंबई

**२००३**
- समाजप्रबोधन (संस्था) :
  कोयना जीवन हक्क संरक्षण संघटना,
  कोरेगाव, सातारा
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  रझिया पटेल, पुणे
  शेख वजीर पटेल, अमरावती
  सुरेश शिपूरकर, कोल्हापूर
  आनंद पटवर्धन, मुंबई
  उल्का महाजन, रोहा, रायगड

**२००४**
- समाजप्रबोधन (संस्था) :
  समाज विज्ञान अकादमी, पुणे
  मासूम, पुणे
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  तिस्ता सेटलवाड, मुंबई
  रमेश हरळकर, मुंबई
  पोपटराव पवार, अहमदनगर
  डॉ. मोहन देशपांडे, पुणे
  विलास भोंगाडे, नागपूर

**२००५**
- समाजप्रबोधन (संस्था) :
  लोकपंचायत, संगमनेर, जि. अहमदनगर
  श्रमिक महिला विकास संघ, वसई
- समाजकार्य सन्मान (विशेष पुरस्कार) :
  श्री. लीलाधर हेगडे, मुंबई
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  प्रा. यशवंत संत, पुणे
  श्री. लक्ष्मण माने, करंजे, जि. सातारा

श्रीमती प्रतिभा शिंदे, नंदुरबार
श्रीमती पूर्णिमा मेहेर, पालघर
श्रीमती सुषमा शर्मा, वर्धा
सत्कार : श्री. सुरेश खोपडे, मुंबई

## २००६

- समाजप्रबोधन (संस्था) :
  आंबेडकर अकादमी, सातारा
  पुणे शहर मोलकरीण संघटना, पुणे
- समाजकार्य सन्मान (विशेष पुरस्कार) :
  पन्नालाल सुराणा
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  रूपा कुळकर्णी, नागपूर
  अनंत फडके, पुणे
  वाहरू सोनवणे, नंदुरबार
  सत्कार : मनीषा वर्मा

## २००७

- समाजप्रबोधन (संस्था) :
  हॅलो मेडिकल फाउण्डेशन, अणदूर, जि. उस्मानाबाद
  स्त्री मुक्ती संघटना, मुंबई
- समाजकार्य सन्मान (विशेष पुरस्कार) :
  प्रा. एन. डी. पाटील, सातारा
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  प्रदीप प्रभू, डहाणू
  अन्वर राजन, पुणे
  राजन इंदुलकर, चिपळूण
  सत्कार : प्रकाश विश्वासराव

## २००८

- समाजकार्य जीवनगौरव (व्यक्ती) :
  डॉ. बाबा आढाव, पुणे
- समाजप्रबोधन (व्यक्ती)
  डॉ. आनंद तेलतुंबडे
- पर्यावरण संरक्षण संवर्धन (व्यक्ती) :
  कुंजबिहारी
- परिवर्तनक्षम शैक्षणिक कार्य (व्यक्ती) :
  अर्जुन कोकाटे
  दलितांचे प्रश्न : व्यंकप्पा भोसले
  सामाजिक सलोखा : सुरेश खैरनार
- युवा कार्यकर्ता : सिम्प्रित सिंग

## २००९

- जीवनगौरव (व्यक्ती) :
  व्यंकटअण्णा रणधीर
- समाजप्रबोधन : सुभाष वारे
- सामाजिक प्रश्न : बंड्या साने
- असंघटित कष्टकरी : श्रीनिवास कुलकर्णी
- युवा कार्यकर्ता : योगिनी खानोलकर

## २०१०

- जीवनगौरव (व्यक्ती) :
  नागनाथअण्णा नायकवडी
- विशेष कार्य : चंद्रकांत केळकर
- समाजप्रबोधन : सत्यपाल महाराज
- असंघटित कष्टकरी : बस्तू रेगे
- सामाजिक प्रश्न : हरीष सदानी
- युवा कार्यकर्ता : नीलेश निमकर
- लक्षवेधी प्रशासकीय कार्य :
  लक्ष्मीकांत देशमुख

## २०११

- समाजकार्य जीवनगौरव
  जी. जी. परीख
- समाजप्रबोधन : सुनीती सु. र.
- असंघटित कष्टकरी : सुभाष लोटे
- सामाजिक प्रश्न : ब्रायन लोबो
- विशेष कार्य : ज्योती म्हापसेकर
- विशेष कार्य : नीलिमा मिश्रा

### २०१२
- समाजकार्य जीवनगौरव
  ठाकूरदास बंग
- समाजप्रबोधन : माधव बावगे
- सामाजिक प्रश्न : बाळकृष्ण रेणके
- असंघटित कष्टकरी : शिवाजी कागणीकर

### २०१३
- समाजकार्य जीवनगौरव :
  रयत शिक्षण संस्था
- समाजप्रबोधन : गजानन खातू
- असंघटित कष्टकरी : धनाजी गुरव
- सामाजिक प्रश्न : डॉ. अशोक बेलखोडे

### २०१४
- समाजकार्य जीवनगौरव :
  पुष्पा भावे
- समाजप्रबोधन : रमेश गावस
- सामाजिक प्रश्न : बिंदुमाधव खिरे
- असंघटित कष्टकरी : मनीषा तोकले

### २०१५
- समाजकार्य जीवनगौरव :
  विद्या बाळ
- समाजप्रबोधन : भीम रासकर
- असंघटित कष्टकरी : पल्लवी रेणके
- सामाजिक प्रश्न : कृष्णा चांदगुडे

### २०१६
- समाजकार्य जीवनगौरव :
  हमीद दलवाई (मरणोत्तर)
- समाजप्रबोधन : देवजी तोफा
- सामाजिक प्रश्न : विजय दिवाण
- असंघटित कष्टकरी : सुशीला नाईक

### २०१७
- समाजकार्य जीवनगौरव :
  गंगाप्रसाद अग्रवाल
- समाजप्रबोधन : रुबिना पटेल
- असंघटित कष्टकरी : चेतना गाला-सिन्हा
- सामाजिक प्रश्न : अरुण जाधव

### २०१८
- समाजकार्य जीवनगौरव :
  आनंदवन
- समाजप्रबोधन : हरी नरके
- असंघटित कष्टकरी : निशा शिवूरकर
- सामाजिक प्रश्न : मतीन भोसले

### २०१९
- कार्यकर्ता पुरस्कार (प्रबोधन) : शहाजी गडहिरे
- घर बचाओ आंदोलन : जमीलाबेगम पठाण
  इताकुला
- विशेष कृतज्ञता पुरस्कार : राजेंद्र बहाळकर

### २०२०
- समाजकार्य जीवनगौरव :
  गजानन खातू
- विशेष कृतज्ञता : जतीन देसाई
- कार्यकर्ता पुरस्कार (संघर्ष) : सुधीर अनवले
- कार्यकर्ता पुरस्कार (प्रबोधन) : अरुणा सबाने
- युवा पुरस्कार : चेतन साळवे

## डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृति-पुरस्कार

विवेक सावंत / २०१३
निखिल वागळे / २०१४
उत्तम कांबळे / २०१५
अतुल पेठे / २०१६
अरविंद गुप्ता / २०१७
तर्कशील सोसायटी पंजाब / २०१८
केरळ शास्त्र साहित्य परिषद / २०१९
डॉ. के. वीरमणी, चेन्नई / २०२०

महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका)

# पुरस्कार निवडीचे निकष

मराठी ललित किंवा वैचारिक साहित्याच्या क्षेत्रांत आपल्या आयुष्यभराच्या कार्याने मोलाची भर घालणाऱ्या साहित्यिकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्याचा सन्मान करण्यासाठी एक जीवनगौरव पुरस्कार दिला जातो. दरवर्षी ललित किंवा वैचारिक यांपैकी एकाच विभागात हा पुरस्कार दिला जातो. अशाच प्रकारे एक वाङ्मयप्रकार पुरस्कार दिला जातो.

या पुरस्कारांसाठी नावांचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातात :

**जीवनगौरव व वाङ्मयप्रकार पुरस्कार : ललित साहित्याच्या संदर्भात...**

- ज्यांच्या साहित्यातून मानवी स्वातंत्र्य, समता, न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाची जाणीव व्यक्त झाली आहे,
- ज्यांच्या साहित्यातून मानवी जीवनाचं समर्थ दर्शन घडवलं गेलं आहे,
- ज्यांच्या साहित्यातून सार्वकालीन व सार्वजनिक मूल्यांचा आविष्कार झालेला आहे,
- ज्यांच्या साहित्यामुळे मराठी साहित्याच्या संचितात मोलाची भर पडली आहे किंवा ज्यांचं साहित्य मराठी साहित्याच्या इतिहासात महत्त्वाचं ठरलं आहे.

**जीवनगौरव व वाङ्मयप्रकार पुरस्कार : वैचारिक साहित्याच्या संदर्भात...**

- इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, राजकारण, अर्थशास्त्र, विज्ञान, साहित्य-संशोधन व समीक्षा यांसारख्या वैचारिक क्षेत्रांत ज्यांच्या मराठी लेखनामुळे महत्त्वाची भर पडली आहे.
- त्या त्या क्षेत्रात ज्या साहित्यकारांनी नि:स्पृह वृत्तीने व निर्भयपणे तात्त्विक सत्याचा शोध घेतला आहे.
- ज्यांची जाणीव मानवी स्वातंत्र्य, समता व न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाच्या प्रेरणेने उद्युक्त झाली आहे.
- मराठी समाजाच्या सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने ज्यांचं लेखन महत्त्वाचं ठरलं आहे.

**ग्रंथांसाठी पुरस्कार :**

समकालीन मराठी साहित्याला प्रोत्साहन म्हणून ललित आणि वैचारिक वा अपारंपरिक मराठी ग्रंथांना पुरस्कार दिला जातो. पुरस्कार दिल्या जाणाऱ्या वर्षालगतच्या मागील तीन वर्षांतील पुस्तकांचा विचार केला जातो.

**रा. शं. दातार नाट्य पुरस्कार :**

नाटक या प्रकारासाठी २००३ सालापासून हा पुरस्कार महाराष्ट्र फाउंडेशनतर्फे दिला जातो. एखाद्या महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नाविषयी आशयसंपन्न नाट्यसंहिता लिहिणाऱ्या नाटककारास हा पुरस्कार देण्याची योजना आहे. दीर्घकाळ अशी नाटकं रंगभूमीवर सादर करणाऱ्या रंगकर्मीलाही हा पुरस्कार दिला जाऊ शकतो.

**समाजकार्य पुरस्कार :**

१९९६ पासून 'समाजकार्य पुरस्कार योजना' सुरू झाली. महाराष्ट्रात परिवर्तनवादी सामाजिक कार्य करणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था यांच्या कार्याचं मोल जाणून घेऊन त्याबद्दल त्यांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करावा या हेतूने हे पुरस्कार सुरू केले.

समाजप्रबोधन, स्त्रियांचे प्रश्न व पर्यावरण-संतुलन व संरक्षण तसंच परिवर्तनक्षम शैक्षणिक कार्य, दलितांचे प्रश्न आणि जातीय सलोखा या क्षेत्रांतील व्यक्तींना प्रत्येकी पन्नास हजार रुपयांचा कार्यकर्ता पुरस्कार देण्यात येतो.

२००५ पासून समाजबदलाच्या चळवळींमध्ये अविरत काम करणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्याला वा संस्थेला समाजकार्य जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात येतं. त्याचबरोबर प्रबोधन, रचना व संघर्ष यांपैकी एका प्रकारचं विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींना एक पुरस्कार दिला जातो. या पुरस्कारांसाठी व्यक्तींच्या व संस्थांच्या नावाचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातात :

१. ज्या व्यक्ती वा संस्था आपले कार्य व विचार यांच्या साहाय्याने विवेकनिष्ठा, वैज्ञानिक दृष्टी व सामाजिक न्याय ही मूल्यं रुजवण्यासाठी सातत्याने प्रबोधनाचं कार्य करत आहेत,

२. पर्यावरण संतुलनाचा ध्यास घेऊन त्यासाठी संशोधन, प्रयोग, लोकशिक्षण, जनसंघटन यांसारख्या विविध मार्गांनी निसर्गाच्या संरक्षणाकरता ज्या व्यक्ती अविरत कार्य करत आहेत,

३. ज्या व्यक्तींच्या कार्यामुळे स्त्रियांमध्ये स्वावलंबन व स्वातंत्र्य यांविषयीच्या जाणिवा वाढत आहेत आणि अन्यायाविरुद्ध झगडण्याची त्यांची ईर्षा जागृत होत आहे,

पुरस्काराची संख्या एखाद्या वर्षी कमी-जास्त होऊ शकते. पुरस्कार समिती (अमेरिका) यांनी तो हक्क राखून ठेवलेला आहे.

**महाराष्ट्र फाउंडेशनच्या कोणत्याही पुरस्कारासाठी अर्ज करावे लागत नाहीत. निवड समित्यांचे सदस्य त्या त्या क्षेत्रातील जाणकारांशी चर्चा करून प्रत्येक पुरस्कारासाठी तीन नावांची शिफारस अमेरिकेतील निवड समितीला करतात आणि त्यातून अंतिम निवड केली जाते.**

# ‘महाराष्ट्र फाउंडेशन’विषयी

- ‘महाराष्ट्र फाउंडेशन’ ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे. १९७८ साली या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचं निवारण करून त्यांना स्वत:च्या पायावर उभं करण्याचा प्रयत्न ही संस्था गेली ३७ वर्षं करत आहे. आदिवासींमध्ये शिक्षणप्रसार, अपंगांचं पुनर्वसन, गावातील आरोग्यसेवेची सुधारणा, शेतीतील उत्पादनवाढीचे प्रयोग यांसारखे समाजोपयोगी उपक्रम करणाऱ्या ध्येयवादी संस्थांना आर्थिक व श्रमदानाचं साहाय्य ‘महाराष्ट्र फाउंडेशन’ या संस्थेद्वारे होत असतं.
- ‘महाराष्ट्र फाउंडेशन’ने भारतातील सातशे पन्नासहून अधिक गरजू मुलांना आर्थिक साहाय्य केलं आहे; सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्रातील बारा गावं दत्तक घेतली आहेत; जनकल्याण रक्तपेढीमार्फत महाड इथे ‘एड्स चिकित्सा प्रयोगशाळा’ स्थापन केली आहे. ‘पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन’साठी एक रुग्णवाहिका घेऊन दिली आहे. महाराष्ट्रातील भूकंपग्रस्तांसाठी पाच लक्ष डॉलर्सचं, तर गुजरातमधील भूकंपग्रस्तांसाठी सव्वा लक्ष डॉलर्सचं साहाय्य केलं आहे.
- ‘महाराष्ट्र फाउंडेशन’ने स्त्रियांचं सबलीकरण, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आदी क्षेत्रांत काम करणाऱ्या साठ स्वयंसेवी संस्थांना ६ लक्ष ८० हजार डॉलर्सच्या देणग्या दिल्या. याव्यतिरिक्त डिसेंबर २००४ मधील त्सुनामीची आपत्ती आणि जुलै २००५ मधला महाराष्ट्रातला पूर या दु:खद घटनांतील संकटग्रस्तांसाठी ‘महाराष्ट्र फाउंडेशन’ने तातडीने ७३ हजार डॉलर्सची रक्कम उभी केली.
- ‘महाराष्ट्र फाउंडेशन’ने ‘भारत-वैद्य’ (अनवाणी डॉक्टर) व ‘मैत्रीण’ हे दोन नवे प्रकल्पही हाती घेतले. तर ‘समाजपरिवर्तनासाठी माहिती-तंत्रज्ञान’ हा ‘फाउंडेशन’चा प्रकल्प आता दुसऱ्या टप्प्यात प्रवेश करत आहे. ‘एक गाव - एक संगणक’ हा या प्रकल्पाचा पहिला टप्पा होता व त्याद्वारे आजपर्यंत ५९ खेड्यांना त्याचा लाभ मिळवून देण्यात आला आहे.
- अशा रीतीने आजवर भारतातील चारशेहून अधिक संस्थांना ८७ लक्ष डॉलर्सहून अधिक रकमांच्या देणग्या दिल्या गेल्या आहेत. येत्या वर्षासाठी ‘महाराष्ट्र फाउंडेशन’ पुढील प्रकल्प हाती घेत आहे :

  १) मानवी अपव्यापाराचं नियंत्रण : भारतात या तऱ्हेच्या अपव्यापारातून दरवर्षी हजारो स्त्रिया वेश्या व्यवसायात आणल्या जात आहेत. त्यांतील ४० टक्के प्रमाण १८ वर्षांखालील मुलींचं आहे. हा अपव्यापार थांबवण्यासाठी विविध उपायांचा अवलंब करणं व या व्यवसायातून बाहेर येणाऱ्या मुली / स्त्रियांचं पुनर्वसन करणं या हेतूने हा प्रकल्प योजला आहे.

  २) बालिका-विवाह नियंत्रण : लातूरच्या ‘ग्रामीण विकास लोकसंस्था’च्या सहकार्याने १३ ते १६ वयोगटातील मुलींचा विवाह लावण्यास प्रतिबंध करणारा प्रकल्पही सुरू केला आहे.

३) निराधार महिला पुनर्वसन / ज्येष्ठ नागरिकांना काळजीवाहू सहकारी : या दुहेरी प्रकल्पातून निराधार परंतु सक्षम महिलांना एकाकी ज्येष्ठ नागरिकांसमवेत राहून त्यांना साथ देणं व त्यांच्या आरोग्याची काळजी घेणं यासाठी प्रशिक्षण देण्यात येईल. पर्यायाने दोन्ही घटकांना त्याचा लाभ होईल.

- 'महाराष्ट्र फाउंडेशन'ला अभिप्रेत असणाऱ्या समाजपरिवर्तनाचा वसा घेतलेल्या अनेक व्यक्ती व संस्था महाराष्ट्रात सतत कार्यरत आहेत. अशा संस्था व व्यक्ती यांच्या कार्याबद्दल वाटत असलेली कृतज्ञता अल्पांशाने का होईना, व्यक्त व्हावी या हेतूने १९९६ साली समाजकार्य पुरस्कार योजना सुरू केली.

- समाजाच्या सांस्कृतिक विकासात व समाजाच्या घडणीत साहित्य व साहित्यिक यांचा मोठा वाटा असतो. मराठी साहित्यिक व साहित्य यांचं हे ऋण अल्पाशांने फेडावं, या भावनेने 'महाराष्ट्र फाउंडेशन'ने १९९४ साली 'मराठी साहित्य पुरस्कार योजना'सुरू केली आहे.

- विशेष अभिमानाची बाब म्हणजे, या सर्व कामाची दखल घेऊन 'संयुक्त राष्ट्रसंघा'ने 'महाराष्ट्र फाउंडेशन'ला Special Consultative Status हा विशेष दर्जा दिला आहे. यामुळे 'फाउंडेशन'ला संयुक्त राष्ट्रसंघाने आयोजित केलेल्या स्वयंसेवी संघटनांच्या परिषदांना सल्लागार म्हणून उपस्थित राहता येणार आहे.

Invest in future of those with no future... So they can reinvest हे 'महाराष्ट्र फाउंडेशन'चं घोषवाक्य आहे.